कृषीवल

रायगड, रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

## भीषण अपघातात दोन ठार, पाच गंभीर

**पनवेल** : पनवेलजवळील भंगारपाडा, पंकज पार्किंगसमोरील जेएनपीटी-पनवेल येथील रोडवर एका एक्सयूव्ही गाडीने कंटेनरला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन ठार, तर पाच जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. हर्ष संतोष पाटील (२१, रा. नेरुळ) हा त्याच्या ताब्यातील काळ्या रंगाची एक्सयूव्ही ७०० क्र.एमएच-४३-सीएम-८८४७ ही कार घेऊन हयगयीने व निष्काळजीपणे चालवून समोरुन जात असलेल्या एका कंटेनरला पाठीमागून धडक मारुन झालेल्या अपघातात हितेंद्र पाटील (२२), श्रीनाथ चंद्रशेखर (२२) हे दोघे गंभीररित्या जखमी होऊन मयत झाले आहेत. तर, चालक हर्ष पाटील याच्यासह इतर पाच जण जखमी झाले आहेत.



## चेंढऱ्यात आघाडीच्या प्रचाराचा झंझावात

### उमेदवारांकडून मतदारांच्या गृहभेटीवर भर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या शेकाप व काँग्रेसच्या उमेदवारांचा प्रचार वेगात सुरु झाला आहे. अलिबागमधील प्रभाग तीनमधील नगरसेवकपदाचे उमेदवार डॉ. साक्षी गौतम पाटील आणि आनंद अशोक पाटील यांचा प्रचार शनिवारी चेंढऱ्यामध्ये करण्यात आला. यावेळी असंख्य कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. प्रचाराचा झंझावात यावेळी पाहावयास मिळाला. एक वेगळा उत्साह घेऊन कार्यकर्ते प्रचाराच्या कामाला जोमाने लागले आहेत. घरोघरी जाऊन मतदारांची भेट घेऊन मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

प्रभाग तीनमधील नगरसेवक पदाच्या उमेदवार साक्षी गौतम पाटील व आनंद पाटील हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक व शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि.२२) सायंकाळी चेंढरे परिसरात प्रचार करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजी करीत प्रचाराला •> पान २ वर

## वेधक

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**रेवदंडा** : अलिबाग तालुक्यातील नागाव-माळी बेरसे येथील भावेश प्रमोद



पाटील (२४) या तरुणाने मानसिक तणावातून घरातच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना २० नोव्हेंबर रोजी घडली. या घटनेची माहिती त्याचे वडील प्रमोद रघुनाथ पाटील (५५) यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात दिली.भावेश हा जिंदाल ड्रग्स प्रायव्हेट लिमिटेड, एमआयडीसी तळोजा या कंपनीत कार्यरत होता. काही •> पान २ वर

### साडेपाच किलो गांजा जप्त

**पनवेल** : कळंबोली रोड पाली लिंक रोडवरील एका ढाब्याजवळ, काही जण गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अंमलदार ओमकार भालेराव यांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने छापा मारून गांजा, मोबाईल व चार चाकी असा एकूण जवळपास दहा लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तर, यामध्ये चार आरोपींना अटक केली आहे.नशामुक्त नवी मुंबई या अभियाना अंतर्गत अमली पदार्थ विरोधी कारवाईच्या सूचना, आयुक्त •> पान २ वर

# 6074 शिक्षकांची आज परीक्षा

### || शिक्षक पात्रतेसाठी कसोटीचा दिवस || पनवेलमध्ये सहा केंद्रांची निर्मिती

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवारी (दि.२३) २३ नोव्हेंबरला शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) होणार आहे. टीईटी परीक्षेत कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य सरकारकडून सर्व शिक्षकांना (टीईटी) शिक्षक पात्रता देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर परीक्षा होणार आहे.



(संग्रहित छायाचित्र)

दरम्यान, परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी यंत्रणा सज्ज असून, पनवेलमधील सहा केंद्रांमध्ये ही परीक्षा घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील इयत्ता पहिली ते आठवी वर्गांवर नियुक्ती असलेल्या शिक्षकांना टीईटी (टीचर्स एलिजिबिलिटी टेस्ट) म्हणजेच शिक्षक पात्रता परीक्षा देणे अनिवार्य आहे. रायगड जिल्ह्यातून सहा हजार ७४ शिक्षक या परीक्षेला बसणार आहेत. या •> पान २ वर

### काटेकोर उपाययोजना

परीक्षा पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी व परीक्षेतील गैरप्रकारांना पूर्णविराम देण्यासाठी शिक्षण विभागाने यंदा अधिक काटेकोर उपाययोजना राबविल्या आहेत. परीक्षा परिषदेकडून बायोमेट्रिक हजेरी, परीक्षार्थींच्या चेहऱ्याची ओळख करण्यासाठी फेस स्कॅनिंग, सीसीटीव्ही यांसह यंदा प्रथमच कनेक्ट व्ह्यू व फोटो व्ह्यू या दोन प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

> **परीक्षा परिषदेकडून बायोमेट्रिक हजेरी, परीक्षार्थींच्या चेहऱ्याची ओळख पटविण्यासाठी फेस स्कॅनिंग, सीसीटीव्ही यांसह यंदा प्रथमच कनेक्ट व्ह्यू व फोटो व्ह्यू या दोन प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. एआय सीसीटीव्ही प्रत्येक केंद्रावर २४ तास रेकॉर्डिंग करणारी एआय आधारित सीसीटीव्ही यंत्रणा, चेहरा व ध्वनीतरल विचलन टिपणार आहे. परीक्षा केंद्रांना भेटी देण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. - ललिता दहिदुले, प्राथमिक शिक्षणाधिकारी, राजिप**

## शस्त्रतस्करीचा पर्दाफाश

### पाकिस्तानातून पाठवलेली शस्त्रे जप्त

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने एका मोठ्या आंतरराष्ट्रीय शस्त्र तस्करी रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या चार संशयितांना अटक केली आहे, हे पाकिस्तानातून ड्रोनद्वारे पाठवलेली अत्याधुनिक शस्त्रे कुख्यात गुंडांना देण्याच्या तयारीत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही शस्त्रे पंजाबमार्गे भारतात आणण्यात आली होती आणि ती लॉरेंश बिश्नोई, बंबीहा, गोगी आणि हिमांशू भाऊ टोळ्यांना पुरवण्यासाठी होती. जप्त केलेल्या शस्त्रांमध्ये तुर्की आणि चीनमध्ये बनवलेल्या हायटेक शस्त्रांचा समावेश आहे.

संरक्षण तज्ज्ञांनी तेजस अपघाताचे कारण सांगितले की, काही तस्कर शस्त्रास्त्रांचा मोठा साठा पोहोचवण्यासाठी दिल्लीत येणार आहेत, अशी माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर रोहिणी परिसरात •> पान २ वर

## बालकर्करोगग्रस्तांना हक्काचे निवासस्थान

### खारघरमध्ये 'होम अवे फ्रॉम होम' सुविधा

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

टाटा मेमोरियल सेंटरच्या एसीटीआरईसी यांच्या सहकार्याने सेंट जूड इंडिया चाइल्डकेअर सेंटर्सने खारघरमध्ये सर्वात मोठी 'होम अवे फ्रॉम होम' सुविधा सुरू केली आहे. ही सुविधा पूर्णपणे मोफत असणार आहे. टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांच्या उपस्थितीत शनिवार, दि. २२ नाव्हेंबर रोजी १२ मजली, २३४ युनिट्सच्या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले.

यामुळे दरवर्षी बालकर्करोगाशी सामना करणाऱ्या ७०० हून अधिक कुटुंबांना मोफत व स्वच्छ निवास उपलब्ध करून देण्यात आले आहे. पुढील २० वर्षांत ही •> पान २ वर



> **खारघर येथील हे केंद्र फक्त एक सुविधा नाही, हे एक वचन आहे. भारतातील कोणतेही मूल झोपण्यासाठी, जेवण्यासाठी किंवा सन्मानाने बरे होण्यासाठी जागा नसल्यामुळे कॅन्सरविरुद्धचा संघर्ष हरू नये. एका छताखाली २३४ युनिट्ससह आम्ही फक्त कुटुंबांना राहण्याची सोय करत नाही, तर आम्ही भविष्यसुद्धा वाचवत आहोत. - मनीषा पार्थसारथी, अध्यक्ष सेंट जूड इंडिया चाइल्डकेअर सेंटर्स**






## पनवेल प्रशासकीय भवनातील
# समस्या दुर्लक्षित
### ■ प्रांताधिकाऱ्यांच्या बैठकीतील निर्णयाला केराची टोपली

। पनवेल । प्रतिनिधी ।
प्रशासकीय भवनातील तातडीच्या समस्या सोडवण्यासाठी महिनाभरापूर्वी पनवेलचे प्रांताधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या मुख्य उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या बैठकीत स्वच्छता सोडता कोणत्याही इतर मुद्द्यावर ठोस पावले उचलली गेली नाहीत. बैठकीत भवनातील पोलीस विभागाने खोल्या हस्तांतरण, स्वतंत्र वीज मीटर, थकीत वीज देयक जमा करणे, उद्‌वाहक आणि इमारतीच्या देखभालीसंदर्भात निर्णय घेण्यात आले होते. परंतु, त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे पुरते दुर्लक्ष करण्यात आले आहे. यामुळे प्रशासकीय भवनातील समस्या सोडवण्यासाठी प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात आली आहे.

शिवसेन पक्षाचे (एकनाथ शिंदे गट) पनवेल ज्येष्ठ शिवसैनिक चंद्रशेखर सोमण यांनी ३ ऑक्टोबरला दिलेल्या निवेदनानंतर पनवेलचे उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी १७ ऑक्टोबरला बैठक बोलावली होती. या बैठकीत अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे-पाटील, पोलीस निरीक्षक ए.एच. अभंग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता निखिल गाडे, उपकोषागार अधिकारी धोत्रे, वीज महावितरण कंपनीचे अभियंता धनंजय सातपुते, नायब तहसीलदार संभाजी शेलार, शिवसेनेचे गणेश वाघिलकर, महेश सावंत, प्रसाद सोनावणे हे उपस्थित होते.

प्रशासकीय भवनातील स्वच्छतेसाठी महसूल विभागाच्या मोठ्या इमारतींप्रमाणे प्रत्येक कार्यालयाने त्यांच्या कार्यालयासमोरील स्वच्छता करण्याचा संयुक्तिक निर्णय घेण्यात आला. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि बेसमेंटमधील अस्वच्छता दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना दिल्या. तसेच एकाच वीज मीटरमुळे येणारा मोठा भार कमी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी चांडक यांनी भूसंपादन विभागातील निधीतून स्वतंत्र वीज मीटर बसविण्यासाठी ठेव रक्कम भरण्यात येईल, असेही ठरले. सार्वजनिक बांधकाम विभागाने महिन्याभरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि स्वच्छतागृहाची देखभाल करू असे सांगितले होते. मात्र, महिना उलटला तरी देखभालीची कामे सुरू झाली नाहीत.

> “जुने वीजदेयक थकल्याने ते भरण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागणी केली आहे. या रकमेतील दोन लाख रुपयांची तरतूद प्रांत कार्यालयाकडून दिली जाणार आहे. थकीत रकमेचे देयक भरल्यानंतर स्वतंत्र वीज मीटरची प्रक्रिया सुरू केली जाईल.”
> – जितेंद्र इंगळे, अप्पर तहसीलदार, पनवेल

> “बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रशासकीय भवनातील देखभाल दुरुस्तीसाठी कामे हाती घेतली जाणार आहेत. त्यासाठी खर्चाचा तपशील काढण्याचे काम सुरू आहे. स्वच्छतागृह, पाण्याची सुविधा यांसारख्या सुविधांची कामे लवकरात लवकर केली जातील.”
> – निखिल गाडे, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

> “प्रशासकीय भवनाच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्व विभागाचे प्रमुख पहिल्यांदाच एकत्र आले होते. प्रांतअधिकाऱ्यांनी बैठक घेऊन झालेल्या चर्चेतून शक्य तेवढ्या लवकर तोडगा निघणे महत्त्वाचे आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी शिवसेना शांत बसणार नाही. याचा कायमस्वरूपी पाठपुरावा करत राहील.”
> – चंद्रशेखर सोमण, स्थानिक नेते शिवसेना

अपंग व ज्येष्ठ नागरिकांना अप्पर तहसीलदारांची भेट घेण्यासाठी या भवनातील जिने वापरावे लागणार आहेत. बैठकीनंतर महिना उजाडला तरी उद्‌वाहक अद्याप सुरू होऊ शकले नाही. याहून बिकट स्थिती या भवनाच्या विजेची आहे. सर्वसामान्य वीज ग्राहकाचे एक हजारांचे वीज देयक थकल्यावर तेथील वीज जोडणी तातडीने तोडली जाते. मात्र, आठ लाखांचे वीज देयक थकीत राहणे हे सरकारच्या प्रशासकीय भवनासाठी लाजिरवाणी बाब आहे. बैठकीत ठरल्याप्रमाणे नवीन मीटरसाठी महावितरणकडून थकीत रक्कम भरण्याची अट असल्याने स्वतंत्र वीज मीटरचा प्रश्न अद्याप कायम आहे.

पनवेल शहर पोलिसांची या प्रशासकीय भवनात हक्काची जागा आहे. भवनातील तळमजल्यावरील २२ खोल्या या पोलीस विभागाच्या आहेत. मात्र, अजूनही या खोल्या हस्तांतरण करून तेथे पोलीस ठाण्याचा कारभार सुरू केला नाही.

# आंबा पीक विम्याच्या रकमेपासून शेतकरी वंचित
### ■ बागायतदारांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।
तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकरी बांधव मागील वर्षी आंबा पीक विम्याची रक्कम जमा खात्यास जमा न झाल्यामुळे शेतकरीवर्गामध्ये नाराजी असून, त्यांनी कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांच्या माध्यमातून नुकतीच जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन तक्रार दिली. यावेळी आंबा पीक विम्याचे पैसे खात्यात आलेले नाही. मात्र, नवीन पीक विमा काढण्यासाठी आग्रही केल्याचा आरोप केला आहे.



यावेळी तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच पीक विमा कंपनीच्या प्रतिनिधींसमवेत बँक ऑफ इंडिया व्यवस्थापक कुलकर्णी उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी यांनी नोव्हेंबर महिन्यात पैसे जमा होतील, असे आश्वासन दिले होते. मात्र, ते जमा न झाल्यामुळे तुमची भेट घ्यावी लागली, असे मत शेतकरी बांधव यांनी व्यक्त केले.

शेतकरी शेतीबरोबर फळ झाडे लागवड करीत असतो. मात्र, बदलत्या वातावरणामुळे आलेले पीक वाया जात असल्यामुळे झालेले नुकसान कसे भरायचे, हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. मात्र, आम्ही शेतकरी पीक विमा काढूनसुद्धा वेळेवर आमचे नुकसान भरपाई मिळत नसल्यामुळे या कंपनीसंदर्भात नाराजी व्यक्त केली. त्याचबरोबर ट्रिगरमुळे सर्वच ठिकाणी नुकसान झाल्याचे कळत नाही. यामुळे त्या ठिकाणी पाहणी करूनच शेतकरी बांधवांना लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

# महिलांना टेलरिंगचे प्रशिक्षण

। अलिबाग । प्रतिनिधी ।
बँक ऑफ इंडिया पुरस्कृत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड (RSETI) मार्फत टेलरिंग हे मोफत ३१ दिवसीय प्रशिक्षण दि.१३ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड (RSETI) मध्ये आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी रोहा तालुक्यातील खारआपटी या गावांतील ३२ महिलांनी सहभाग नोंदवला. प्रशिक्षणामध्ये ब्लाऊज, ड्रेस, वनपीस बनविणे या विषयाचे सखोल ज्ञान तसेच उद्योजकता विकास, मार्केटिंग, बँकिंग, आर्थिक साक्षरता



या सोबत प्रकल्प अहवाल या सर्व बाबी वर मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी परीक्षा घेण्यात आली. प्रशिक्षणार्थींना संबोधताना संचालक सुमितकुमार धानोरकर म्हणाले की, आपण लवकर आपल्या व्यवसायाची सुरुवात करावी यासाठी जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया व स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड (RSETI) आपल्यासोबत सदैव असेल, असे यावेळी प्रशिक्षणार्थींना आश्वस्त करण्यात आले. व सर्व महिलांना व्यवसाय सुरु करण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### विद्यार्थ्यांसाठी महामार्गावर अधिकृत थांबा बांधावा

**नागोठणे :** कोएसोच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील श्रीम. गु.रा. अग्रवाल विद्यामंदिर येथील शाळेसमोर आणि रुची होटलशेजारी नागोठण्याहून पोलादपूरच्या दिशेने आणि मुंबई कडे जाणाऱ्या एस टी बस थांबविण्यासाठी अधिकृत एस. टी. बस थांबा व प्रवासी शेड बांधावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत शिवसेना विभाग संघटक दिनेश घाग आणि युवा सेना अध्यक्ष संदीप वाजे यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या रामवाडी (पेण) येथील व्यवस्थापक यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

# पोलादपुरात देवदिवाळीपासून बैलदिवाळीचा थरार

। पोलादपूर । प्रतिनिधी ।
दाक्षिणात्य राज्यातील लोकप्रिय जलिकट्टूचा खेळ आणि युरोपियन देशात बुलफाईटचा मर्दानी खेळ सर्वांनाच ज्ञात असताना पोलादपूरच्या ग्रामीण भागात बैलदिवाळीच्या पारंपरिक मर्दानी खेळाचे आकर्षण चाकरमानी आणि स्थानिकांमध्ये आजही कायम आहे. देवदिवाळीपासून म्हणजेच मार्गशीर्ष प्रतिपदेपासून साखर येथे बैलदिवाळी साजरी करण्यात आली. आता गावागावात बैलदिवाळीचा थरार अनुभवण्यासाठी चाकरमानी मोठ्या संख्येने गावाकडे येणार आहेत.

पोलादपूर तालुक्याच्या कापडे ते कामथे रस्त्यापासून आतील गावागावात जपलेली ही बैलदिवाळीची परंपरा शेतकऱ्यांना उपयुक्तअसलेल्यामुक्याजनावरातील मरगळ म्हणजेच अकड दूर करण्याचा प्रयत्न असून, चौखूर उधळणे, शिंग



रोखणे आणि वारा पिऊन बेभान होण्याचे पिसाटल्यागत वर्तन या बैलदिवाळीनंतर बैलांमध्ये शिल्लक राहात नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. दिवाळीनंतर देवदिवाळी आली की, ग्रामदैवतांचा कौल घेऊन, देणं देऊन यंदा मार्गशीर्ष प्रतिपदेच्या दिवशी बैलदिवाळीची प्रथा सुरु झाली. पोलादपूर तालुक्यातील बोरज, साखर, लहुळसे, आडावळे खुर्द, आडावळे बुद्रुक, एरंडवाडी, ऊमरठ, मोरसडे गावच्या बारा वाड्या, बोरघर, कामथे, गोवेले, साळवीकोंड आणि अन्य गावांतही दुपारी बैलदिवाळी मोठया जल्लोषात साजरी करण्यात येत असते.

शेतातील मळणी आणि अन्य कामातून शेतकरी मोकळा झाला असून, त्याची सर्जा-राजाची बैलजोडी त्याआधीच शेतीच्या कामातून मोकळी होऊन खूप दिवस गोठ्यात चारापाणी खाणारी असल्याने बैलाच्या अंगात आलेली अकड काढण्यासाठी हा बैलदिवाळीचा उत्सव देवदिवाळीला साजरा केला जातो.

यावेळी बैलाला सजवून त्याच्या शिंगांना झुपकेदार तुरे लावून आकर्षक बनविले जाते. बैलाची वेसण ओढली की तो पुढच्या पायावर झुकून उडी मारतो. असे अनेकदा केले की बैल नाचतोय असे वाटू लागते.

या नाचणाऱ्या बैलाचे उधळणे झाले की, ग्रामस्थ त्याच्याभोवती काठया घेऊन फिरतात. या काठयांच्या टोकाला बकरीच्या अंगावरील केसांच्या झुपक्यांसह चामडे असते. यामुळे या बैलाला शिंकेची भावना होऊन तो मान जोरात खाली वर करतो आणि काठी समोर आणणाऱ्यावर शिंग रोखून धरतो. बैलांची ही प्रतिक्रिया त्यांची मरगळ अकड निघण्याचे द्योतक असते. काही ठिकाणी या उधळलेल्या बैलाच्या शिंगावरचे झुपकेदार तुरे जो कोणी तरूण काढतो; त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद त्याच्या मर्दूमकीला साजेसाच असल्याचे दिसून येते.

#### पाळीव प्राणी कत्तल प्रकरणात
## आरोपी गजाआड

। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।
मुरुड तालुक्यातील विहुर येथील अझर जावेद वाळवटकर याने घराच्या मागील बाजूस पाळीव प्राणी यांची कत्तल केली असल्याची खबर मुरुड पोलिसांना लागताच पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार करण्यात येऊन आरोपीला अटक करण्यात आली. दरम्यान, आरोपीच्या घराच्या मागील बाजूची कसून तपासणी करण्यात आली. यावेळी त्यांना काही पाळीव प्राण्यांचे अवशेष दिसून आले. क्षणाचा विलंब न जाता आरोपी वाळवटकर याला अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी त्वरित दखल घेऊन आरोपीस अटक केल्याबद्दल बजरंग दल यांच्याकडून सत्कार करण्यात आला.

# मायनी येथील प्राथमिक शाळेत पालकांचे श्रमदान

। खरोशी । प्रतिनिधी ।
आजच्या यांत्रिकी युगात श्रमदानाचे दिवस मागे पडत असताना रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मायनीकोयना येथील पालकांनी एक दिवस शाळेसाठी उत्स्फूर्त श्रमदान करून आदर्श घालून दिला. शाळा परिसर स्वच्छ करून तसेच संरक्षणभिंतीला रंगरंगोटी करून त्यांनी ग्रामीण समाजासमोर आदर्श "स्वच्छ शाळा सुंदर शाळा" असा संदेश दिला.



या श्रमदानात गावातील माता भगिनींरोबरच तरुण पालक, आजी-आजोबा अशा सर्व स्तरातील पालकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. सर्वांनी हातात कोयते, विळे, फावडी, झाडू, टोपल्या घेऊन सर्वप्रथम शाळेच्या आवारातील काटेरी झुडपे, उंच गवत, रानटी वेली काढून टाकण्यात आल्या. शाळेच्या इमारतीलगत वर्षानुवर्षे साचलेला कचरा, प्लास्टिक व इतर घाण वेचून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. त्यामुळे संपूर्ण परिसर चकाचक व मोकळा झाला. यानंतर शाळेभोवतालच्या संरक्षण भिंतीची रंगरंगोटी करण्यात आली. भिंत स्वच्छ धुवून त्यावर चुना व रंग देण्यात आला. त्यामुळे शाळेचा बाह्यरंग पूर्णपणे बदलून गेला. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला व पाहुण्याला स्वच्छतेचा व सुंदरतेचा संदेश मिळावा, हा या कार्यामागचा उद्देश असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. या उपक्रमाद्वारे शाळा ही केवळ शिक्षक विद्यार्थ्यांचीच नव्हे तर संपूर्ण गावाची आहे, ही जाणीव पालकांनी कृतीतून दाखवून दिली. शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, मुख्याध्यापक व शिक्षक यांनी श्रमदान करणाऱ्या सर्व पालकांचे मनापासून कौतुक केले. यावेळी मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी सांगितले की, आजकाल सर्व गोष्टींसाठी मजुरांची मदत घेतली जाते. अशा वेळी पालकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन शाळेसाठी एक दिवस श्रमदान केले, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

पान १ वरून

## सहा हजार ७४ शिक्षकांची आज परीक्षा

परीक्षेची तयारी शिक्षण विभागाकडून सुरु करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेलमधील कळंबोली येथील सु.ए. सो. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेलमधील सिडको कॉलनी येथील चांगू काना ठाकूर विद्यालय, के.ए. बाठींया माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेलमधील सेंट जोसेफ माध्यमिक विद्यालय, जुने पनवेलमधील सावरकर चौक येथील को.ए. सो के.व्ही. कन्या विद्यालय आणि ज्यूनिअर कॉलेज, को.ए.सो. व्ही.के. विद्यालय अशा एकूण सहा शाळांमधील केंद्रामध्ये परीक्षा घेतल्या जाणार आहेत.

पहिली ते पाचवीच्या वर्गातील शिक्षकांची परीक्षा सकाळी साडेदहा ते एक या वेळेत होणार आहे. त्यांच्यासाठी पेपर एक असणार आहे. या परीक्षेसाठी दोन हजार ५१५ शिक्षक परीक्षेला बसणार आहेत. सहावी ते आठवीच्या वर्गातील शिक्षकांची परीक्षा दुपारी अडीच ते पाच यावेळेत होणार आहे. त्यांच्यासाठी पेपर दोन असणार आहे. या परीक्षेला तीन हजार ४५९ शिक्षक बसणार आहे. पहिला आणि दुसरा पेपर प्रत्येकी दीडशे मार्कांचा असणार आहे. पहिला पेपर भाषा ३०, भाषा ३०, गणित ३०, परिसर अभ्यास ३०, बालमानस अध्यापन शास्त्र ३० गुण अशा पद्धतीने असणार आहे. दुसरा पेपर भाषा ३०, भाषा ३०, बालमानस अध्यापन शास्त्र ३० आणि गणित तसेच समाज शास्त्रसाठी प्रत्येकी ६० गुण अशा पद्धतीने असणार आहे.

केंद्र संचालकापासून अनेकांची नेमणूक परीक्षा केंद्रामध्ये करण्यात आली आहे. परीक्षेच्या कालावधीत कोणताही गैरप्रकार घडू नये म्हणून जिल्ह्यात एक नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, लिपीक, विस्तार अधिकारी यांची यामध्ये नियुक्ती करण्यात आल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

**'एआय'ची घेणार मदत**

एआय सीसीटीव्ही प्रत्येक केंद्रावर २४ तास रेकॉर्डींग करणारी एआय आधारित सीसीटीव्ही यंत्रणा चेहरा व ध्वनीतरल विचलन टिपणार आहे. फोटो व्हू प्रणालीमुळे उमेदवाराचा मूळ फोटो स्क्रीनवर दिसेल. प्रत्यक्ष बसलेला विद्यार्थी व नोंदणीतील फोटो यातील फरक एआय तंत्रज्ञानाने त्वरित शोधला जाईल. कनेक्ट व्हू प्रणालीमुळे केंद्रप्रमुख व कंट्रोल रूम यांच्यात लाईव्ह कनेक्ट राहणार आहे. बायोमेट्रिक, फेस स्कॅनिंगमध्ये विद्यार्थ्यांच्या बोटांचे छाप व चेहरा स्कॅन केला जाणार आहे. परीक्षा केंद्रांना भेटी देण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. टीईटी परीक्षेचे जिल्हास्तरीय अध्यक्ष जिल्हाधिकारी रायगड आणि उपाध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अलिबाग आहेत.

**गैरप्रकार केल्यास फौजदारी**

परीक्षेदरम्यान कोणी काही गैरप्रकार केल्यास फौजदारी करण्यात येणार आहे. परीक्षार्थींनी या सूचना लक्षात ठेवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे

## युवकाचा गळफास घेऊन आत्महत्या

दिवसांपूर्वी त्याने कंपनीला राजीनामा दिला होता. त्यामुळे तो सुमारे दीड महिना बेरोजगार होता. बेरोजगारीतून वाढत गेलेले नैराश्य आणि मानसिक तणाव यामुळे तो अधिकच एकाकी बनला.घरात कोणीही नसताना, भावेशने आपल्या बेडरूममध्ये छताच्या लोखंडी पाईपला ओढणी बांधून गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच त्याला तातडीने रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास तेथे मृत घोषित केले. या प्रकरणाचा पुढील तपास रेवदंडा पोलीस करत आहेत.

## साडेपाच किलो गांजा जप्त

मिलिंद भारंबे यांनी सर्वच विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार काम करत असताना मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अंमलदार ओमकार भालेराव यांना विश्वसनीय सूत्रांकडून माहिती मिळाली की, काही इसम हे कळंबोली परिसरात, रोडपाली लिंक रोड वरील डी डी धाब्याजवळ, गांजा विक्रीसाठी येणार आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारावर सहाय्यक आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या आदेशानुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक निरीक्षक महेश जाधव, सहाय्यक उपनिरीक्षक मंगेश वाट, पोलिस अमलदार नितीन जगताप, दिलीप ठाकूर व ओंकार भालेराव यांनी त्या ठिकाणी सापळा लावून धाड टाकली व चारही इसमांना ताब्यात घेतले. एकूण ९ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

## शस्त्रतस्करीचा पर्दाफाश

सापळा रचण्यात आला आणि आरोपींना अटक करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात अत्याधुनिक शस्त्रे जप्त केली आहेत. दरम्यान, पोलिसांनी संपूर्ण नेटवर्कचा तपास सुरू केला आहे. आरोपी उत्तर प्रदेश आणि पंजाबचे रहिवासी अटक केलेले आरोपी पंजाब आणि उत्तर प्रदेशचे रहिवासी आहेत. दिल्लीतील रोहिणी परिसरातून शस्त्रांचा हा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. काही तस्कर दिल्लीत शस्त्रे आणण्याच्या तयारीत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानंतर पथकाने सापळा रचून आरोपींना अटक केली.

## बालकर्करोगग्रस्तांना हक्काचे निवासस्थान

सुविधा अंदाजे १४,००० कुटुंबांना मदत करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. बालकर्करोगाचे उपचार अनेक वर्षे चालू शकतात आणि त्यासाठी वारंवार फॉलो-अपची गरज भासते. उपचारासाठी हजारो किलोमीटर प्रवास करून मुंबईत येणाऱ्या कुटुंबांसाठी राहण्याची व्यवस्था करणे ही एक मोठी अडचण असते. सेंट जूड्समध्ये राहणाऱ्या कुटुंबांना त्यांचे मूल पूर्णपणे कॅन्सरमुक्त होईपर्यंत सुरक्षित राहण्याची हमी दिली जाते. ही नवी सुविधा कॅन्सरवर उपचार घेणाऱ्या कोणत्याही मुलाला सुरक्षित आणि काळजी घेणारी राहण्याची जागा मिळालीच पाहिजे, या सेंट जूड्सच्या वचनाची साक्ष आहे. परवडणारी राहण्याची सोय नसल्यामुळे अनेक कुटुंबे उपचार अर्धवट सोडतात. परंतु, या सुविधेमुळे पीडित कुटुंबावर उपचार मध्येच सोडण्याची वेळ येणार नाही. टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माहितीनुसार, सेंट जूड्सच्या केंद्रांमुळे उपचार अर्धवट सोडण्याचे प्रमाण २००० च्या सुरुवातीला ३० टक्क्यांपेक्षा जास्त होते, ते आता ५ टक्क्यांपेक्षा कमी झाले आहे. या सुविधेत लायब्ररी, क्लासरूम, स्किलिंग सेंटर आणि 'सेंटर ऑफ एक्सलन्स' असेल, जे इतर स्वयंसेवी संस्थांना देशभरात 'होम अवे फ्रॉम होम'सारखी केंद्रे उभारण्यासाठी आणि चालवण्यासाठी प्रत्यक्ष प्रशिक्षण देणार आहे.

सेंट जुड्ससोबत उभा करत असलेला नवीन १२ मजली ब्लॉक २३४ पेक्षा जास्त मुलांसह त्यांच्या पालकांसाठी राहण्याची सोय देईल. यामुळे अधिक रुग्ण आमच्यासोबत राहून वेळेवर उपचार घेऊ शकतील. कॅम्पसच्या आत राहण्यामुळे, मध्यरात्री एखाद्या मुलाला अचानक त्रास झाला तरी, फक्त सुमारे १०० मीटर चालून हॉस्पिटलमध्ये पोहोचता येईल, जिथे तात्काळ उपचार मिळतील. मला फक्त उत्तम निकाल आणि मुलांबरोबर त्यांच्या पालकांच्या एकूण कल्याणात मोठा सुधारणा होईल असे दिसते.

**– डॉ. पंकज चतुर्वेदी, संचालक, एसीटीआरईसी**

## चेंढऱ्यात आघाडीच्या प्रचाराचा झंझावात

सुरुवात करण्यात आली. यावेळी अलिबागमधील सार्वजनिक जिल्हा ग्रंथालय व वाचनालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील, अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका अश्विनी पाटील, विकास पाटील, रवि आंबेकर, साधना पाटील, प्रशांत आंबेकर, सुजित रोकडे, सुशांत पाटील, बाळा पाटील, सागर आंबेकर, बाबू वेलकर, उदय ठाकूर, अश्वीन लालन, प्रकाश राठोड आदी शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरसेवक पदाचे उमेदवार साक्षी पाटील आणि आनंद पाटील यांनी कार्यकर्त्यांसमवेत चेंढरे परिसरातील घरोघरी जाऊन मतदारांची भेट घेतली. त्यांच्याशी संवाद साधत मतदान करण्याचे आवाहन केले. या उमेदवारांचे आगमन होताच, मतदारांकडून त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. अनेकांनी उमेदवारांचे औक्षण करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मतदारांकडून मिळणाऱ्या वाढत्या प्रतिसादामुळे बहुमतांनी विजयी होण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी एक वेगळा उत्साह प्रत्येक कार्यकर्त्यामध्ये दिसून आला.

# वॅगनर कोसळली कालव्यात

। माणगाव । प्रतिनिधी ।
माणगावात मारुती वॅगनर वाहनाला कारची मागावून धडक बसल्याने झालेल्या अपघातात मारुती वॅगनर वाहन कालव्यात पडून वाहनाचे नुकसान झाले. या अपघातात सुदैवाने चालक सुखरूप बचावला. सदरील अपघात माणगाव नगरपंचायत हद्दीतील साईनगर भागातील कालवा नाका येथे गुरुवार, दि. २० नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास घडला. या अपघाताची फिर्याद संजय अनंता पालांडे (५६) रा. वाकडाईनगर माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या अपघाताबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, अपघाताची तक्रार देणारे संजय अनंता पालांडे हे त्यांचे मूळ गाव शिरवली येथून विठ्ठल रखुमाई देवीची पालखी उत्सव संपल्याने रात्री माणगाव येथे त्यांचा मित्र नंदकुमार रामचंद्र जाधव यांच्या मालकीची मारुती वॅगनर वाहन क्र.एम.एच.०८ झेड १९१३ ही गाडी चालवीत घेऊन शिरवली येथून माणगाव येथे घरी येत असताना पाठीमागील बाजूकडून एक कार क्र.एम.एच.४६ एडी ३९१५ ही गाडी भरधाव वेगाने येऊन तक्रारदार यांच्या मारुती वॅगनर वाहनास पाठीमागील बाजूस धडक देऊन अपघात घडून मारुती वॅगनर गाडी कालव्यात पडून वाहनाचे नुकसान झाले. या अपघाताची माहिती समजताच माणगाव पोलीस तातडीने अपघात ठिकाणी दाखल झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. सदर अपघाताचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार घोडके करीत आहेत.

# ज्युट प्रॉडक्ट उद्यमी प्रशिक्षण



। अलिबाग । प्रतिनिधी ।
बँक ऑफ इंडिया पुरस्कृत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड (RSETI) मार्फत ज्युट प्रॉडक्ट उद्यमी हे मोफत १४ दिवसीय प्रशिक्षण दि. २९ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर या कालावधीत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड (RSETI) मध्ये आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षणासाठी रोहा तालुक्यातील झोळंबे या गावातील ३१ महिलांनी सहभाग नोंदवला. प्रशिक्षणामध्ये ज्युटपासून विविध वस्तू बनविणे या विषयाचे सखोल ज्ञान तसेच उद्योजकता विकास, मार्केटिंग, बँकिंग, आर्थिक साक्षरता यासोबत प्रकल्प अहवाल या सर्व बाबींवर मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी परीक्षा घेण्यात आली, प्रशिक्षणार्थींना संबोधताना RSETI चे संचालक सुमितकुमार धानोरकर म्हणाले की, तुम्ही दिलेल्या वेळेचा व RSETI च्या प्रयत्नाचे यश म्हणजे आपण लवकर आपल्या व्यवसायाची सुरुवात करावी यासाठी जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया व स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड (RSETI) आपल्या सोबत सदैव असेल, असे यावेळी प्रशिक्षणार्थींना आश्वस्त करण्यात आले. व सर्व महिलांना व्यवसाय सुरु करण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## निवडक



### हरवलेली बॅग महिलेला परत

**नवीन पनवेल :** वाहतूक पोलिसांच्या मदतीने एका महिलेची हरवलेली बॅग आणि त्यामधील वस्तू त्या महिलेला परत करण्यात आले. याबद्दल महिलेने पोलिसांचे आभार मानले आहेत. मळिालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि.२१) वसुधा जगे यांची बॅग खांदा कॉलनी येथे हरवली. त्याची माहिती महिलेने पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना भेटून सांगितली. त्यानंतर औदुंबर पाटील यांनी त्यांचे पीटर वाहन चालक केशव निकम आणि महिला पोलीस कर्मचारी योगिता पाटील यांना याबाबत माहिती देऊन बॅगचा शोध घेण्यास सांगितले. निकम आणि योगिता पाटील यांनी बॅगमध्ये असलेल्या मोबाईलचे लोकेशन शोधले. ही बॅग नवीन पनवेल कडे जाणाऱ्या गुरुद्वारा जवळ एका स्कूल व्हॅन चालकाला सापडली होती. ती बॅग आणि त्यामधील मौल्यवान वस्तू अल्प कालावधीत शोधून काढण्यात आल्या. बॅग मिळाल्यानंतर वसुधा ओंकार जगे यांच्या ताब्यात देण्यात आली.



### कॉलेज कुमारांची जोरदार धडक

**कोलाड :** मुंबई-गोवा मार्गावरील गोवे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर अपघाताची घटना घडली आहे. कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी अतिवेगाने मोटार सायकल चालवून गोवे येथील तरूणाला धडक देऊन गंभीर जखमी केले. या घटनेमुळे ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. मुंबई-गोवा महामार्गावरील गोवे येथील गिता द. तटकरे पॉलिटेक्निकल कॉलेज असुन येथे असंख्य विद्यार्थी मोटार सायकलवरून ये-जा करीत असतात. या रस्त्याला वेडीवाकडी वळणे असुन कॉलेजचे विद्यार्थी अतिवेगाने दुचाकी चालवत असतात. या मार्गावर स्थानिकांसह, विद्यार्थी व कामगारांची वदर्ळ असते.परंतु, अतिवेगाने जाणाऱ्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांमुळे येथील नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. याबाबत सातत्याने अतिवेगाने दुचाकीवरून जाणाऱ्या कॉलेज विद्यार्थ्यांचा बंदोबस्त करावा, याची तक्रार गावातील ग्रामस्थ व तरुणांनी कॉलेजकडे केली आहे. याचदरम्यान गोवे रस्त्यावर शुक्रवार (दि.२१) तटकरे पॉलिटेक्निकल कॉलेज कडून मोटार सायकल वरून अतिवेगान जाणाऱ्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी अनिल दहिंबेकर या दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिली. या धडकेत अनिल दहिंबेकर गंभीर जखमी झाले असुन त्यांना उपचारासाठी माणगांव येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

### धान्य मिळत नसल्याच्या तक्रारींत वाढ

**नवीन पनवेल :** पनवेल पुरवठा विभागात रेशनिंग धान्य मळित नसल्याच्या लाभार्थ्यांच्या अनेक तक्रारी येत आहेत. अनेक लाभार्थी फेऱ्या मारून वैतागले आहेत. मात्र, पुरवठा विभागाकडून रेशनिंग दुकानांवर कारवाई केली जात नसल्याचा आरोप केला जात आहे. नवीन पनवेल पंचशील नगर येथील रायबा दौलत जाधव यांना रास्त भाव धान्य दुकान क्रमांक १६ द्वारे धान्य पुरवठा केला जातो. मात्र, काही महिन्यांपासून तीन-तीन महिने धान्य पुरवठा होत नाही. धान्य घेण्यास गेले असता उद्या धान्य मळिेल, अशी उत्तरे दिली जातात. तसेच, कधी धान्य मळिाले तर ते अपुऱ्या प्रमाणात असते. याबाबत संबंधित दुकानदाराला विचारणा केली असता, तुम्ही माझी कोणाकडेही तक्रार करा, माझे कोणीही वाकडे करू शकत नाही, असे उत्तर दिले जाते. त्यामुळे त्या दुकानदाराच्या बेशिस्त वागण्याचा नेहमीच त्यांना त्रास सोसावा लागत असून त्याची चौकशी करून कारवाई करावी, अशा मागणीचे पत्र रायबा जाधव यांनी तहसीलदार यांना दिले आहे.

### रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नवीन पनवेल :** अतुल म्हात्रे ग्लोबल लर्निंग आणि रिसर्च सेंटर यांच्यातर्फे खारघर विभागातील युवक युवतींसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन शुक्रवारी (दि.२८) सकाळी साडेदहा वाजता करण्यात आले आहे. हा मेळावा खारघर प्रभाग क्रमांक सातमधील सत्याग्रह महाविद्यालय थारवाणी हेरिटेज येथे पार पडणार आहे. या मेळाव्यासाठी शैक्षणिक पात्रता आठवी ते पदवीधर, आयटीआय फिटर, वेल्डर, सीएनसी मेकॅनिस्ट, इलेक्ट्रिशन, डिप्लोमा इंजिनियर अशी असणार आहे. त्यासाठी आधार कार्ड, पॅन कार्ड आवश्यक आहेत.

# नवी मुंबई विमानतळाचे लवकरच विस्तारीकरण

## खारफुटी पुनर्रोपण, वनीकरणासारख्या पर्यावरण उपाययोजनांसाठी सिडकोची धावपळ

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिला टप्प्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. येत्या २५ डिसेंबरपासून या विमानतळावरून विमानसेवा सुरू होणार आहे. नवी मुंबई विमानतळाचे एकूण चार टप्प्यांत विस्तारीकरण होणार असून आवश्यकता भासल्यास ११६० हेक्टर क्षेत्रात पाचवा टप्पाही उभारणे शक्य असल्याचा दावा यापूर्वीच नवी ममुंबई विमानतळ कंपनीने केला आहे. मध्यंतरी नवी मुंबई विममानतळ कंपनीने सिडकोच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशातील विमानसेवा आणि नियोजित प्रवाशांच्या अभ्यासाकरिता आंतरराष्ट्रीय सल्लागार मेसर्स आयसीएफ कन्सल्टिंग (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची नियुक्ती केली होती. या कंपनीने मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) आणि नवी मुंबई विमानतळासंबंधी नवा वाहतूक अंदाज अभ्यास तयार केला.

नवी मुंबई विमानतळाची सध्याची क्षमता एकूण ६ कोटी प्रवाशांपर्यत आखण्यात आली आहे. ही क्षमता वाढवली नाही तर मुंबई शहर आणि महानगर प्रदेशाला पुढील १५ वर्षांत किमान ३ ते ६ कोटी इतक्या विमान प्रवासी क्षमतेची तूट सहन करावी लागेल, जी पुढील २५ वर्षांच्या कालावधीत ७ ते १४ कोटी पर्यत वाढेल, असा अंदाज या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. हे लक्षात घेता नवी मुंबई विमानतळाची क्षमता सहावरून ९ कोटी प्रवासी क्षमतेपर्यत वाढविण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. तसेच, या विमानतळाची मालवाहतूक क्षमताही वाढविण्यात आली आहे.

दरम्यान, नवी मुंबई विमानतळाची उभारणी करताना या संपूर्ण पट्ट्यात पर्यावरणाची मोठी उलथापालथ पहायला मिळाली. सुरुवातीच्या टप्प्यात प्रकल्पाच्या ठिकाणी असलेली उलवे टेकडी काढणे, नवीन बांधलेल्या उलवे रिसोर्स चॅनेल (यूआरसी) द्वारे उलवे नदीचे पात्र वळविणे, मोठा भराव करून खारफुटीची कत्तल या प्रकल्पात करण्यात आली आहे. त्यामुळे संरचनात्मक टेकड्या, चिखलाचे फ्लॅट, भरती-ओहोटीचे फ्लॅट आणि नदीकाठांचे रूपांतर, जमिनीचे मोठ्या प्रमाणावर सपाटीकरणाची कामे यापूर्वीच येथे करण्यात आली आहेत. दरम्यान, विमानतळाचे विस्तारीकरण करत असताना सिडकोने पर्यावरण संवर्धनाची इतर कामे युद्धपातळीवर हाती घेतली आहेत, अशी माहिती सिडकोतील वरिष्ठ सूत्रांनी दिली. सिडको आणि कांदळवन कक्षाने आतापर्यत ३७० हेक्टरवर खारफुटीचे रोपण पूर्ण केले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. यापैकी खारफुटी संवर्धन विभागाने ३१० हेक्टरवर तर सिडकोने ६० हेक्टरवर खारफुटीचे रोपण केले आहे. कोल्हेखर गावात अतिरिक्त १०८ हेक्टरवर खारफुटींचे रोपण करण्यात आले असून या संपूर्ण पट्ट्याला ना विकास क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.



### एमसीझेडएमएची मंजुरी

अदानी समूहाच्या विमानतळ कंपनीने विमानतळाची क्षमता वाढविण्यासाठी महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे नुकताच एक प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावात कंपनीने विमानतळाच्या विस्तारीकरणाची योजना सादर केली होती. तसेच पर्यावरण संवर्धनासाठी आखण्यात आलेल्या उपायांचा आराखडाही प्राधिकरणाला सादर केला होता. विमानतळ विस्तारीकरणाच्या या आराखड्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# संघर्ष समितीचा स्मार्ट मीटरला विरोध



- **म्हसळा महावितरण कार्यालयाला निवेदन**
- **तीव्र आंदोलनाचा इशारा**

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा तालुका स्मार्ट मीटरविरोधी संघर्ष समितीच्या माध्यमातून म्हसळा विद्युत महावितरण कार्यालयात स्मार्ट मिटर बसवु नये, या बाबत शुक्रवारी (दि.२१) निवेदन देण्यात आले.

या पूर्वीही याच समितीकडुन स्मार्ट मिटर बसवु नये म्हणून निवेदन देण्यात आले होते. परंतु, त्या निवेदनाला महावितरणाकडुन केराची टोपली दाखविली व आपला मनमानी कारभार सूरु ठेऊन ग्राहकांची फसवणुक करण्यात आली असल्याचे समितीकडुन सांगण्यात आले. दरम्यान, येत्या पंधरा दिवसांच्या स्मार्ट मिटर बसविण्याचे काम थांबविण्यात न आल्यास समितीच्या आणि नागरिकांच्या माध्यमातून तिव्र आंदोलन करू, असा इशारा देण्यात आल्याचे समितीचे सल्लागार संतोष पाटील यांनी सांगितले. यावेळी समिती अध्यक्ष समीर काळोखे, सल्लागार संतोष पाटील, नईम दळवी, सुरेश कुडेकर, फारूक पेनकर, नगरसेवक सुनिल शेडगे, प्रकाश घाणेकर, सुमित सावंत, अशोक पाटील, सलाऊद्दीन घराडे, नजीर जहाँगीर, प्रविण बनकर, राजु लाड, अनंत रिकामे तसेच तालुक्यातुन असंख्य ग्राहक उपस्थित होते.

> **जुने मिटर सुस्थितीत असुन देखील ग्राहकांना न विचारता स्मार्ट मिटर बसविण्यात येत आहेत. त्यामुळे ग्राहकांना वारेमाप विज बिल येत असून आर्थिक भुदंड सोसावा लागत आहे. जर का स्मार्ट मिटर बसविणे थांबविले नाही, तर होणाऱ्या परिणामांना महावितरण जबाबदार असेल.**
> **- संतोष पाटील,** सल्लागार संघर्ष समिती

# रस्त्यावरील झाडाझुडपे अपघाताला निमंत्रण



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरूडमधील एकदरा ते डोंगरी राजपुरी रस्त्यावर सातत्याने वाहनांची वदर्ळ असते. परंतु, या आडवळणाचा रस्ता झाडा-झुडपांचा वळिख्यात सापडला आहे. या रस्त्यावरील साईड पट्ट्या दिसत नसल्याने वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत असुन अपघाताची भिती व्यक्त होत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षाबाबत पर्यटक व स्थानिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकारी वर्गाने यात तातडीने लक्ष पुरवन मुरुड-राजपुरी रस्त्यावर असलेल्या झाडा-झुडपांचा वळिखा तातडीने हटवावा, अशी मागणी पर्यटकांमधून जोर धरीत आहे.



● चेंढरे येथे संपर्क कार्यालय उभारण्यात आले आहे. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, सार्वजनिक जिल्हा वाचनालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सायंकाळी कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

# नेरळमध्ये आज 'आगरी शाला' कार्यशाळा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुका आगरी समाज संघटना आणि आगरी साहित्य चळवळ यांच्या विद्यमाने आगरी बोली भाषेवर आधारित 'आगरी शाला' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा रविवारी (दि.२३) नेरळ येथील आगरी समाजाच्या सभागृहात पार पडणार आहे. या सोहळ्यात आगरी कला गौरव पुरस्कार प्राप्त मनोहर कोळंबे आणि आगरी भाषेत पीएचडी करणारे डॉ. अविनाश पाटील यांना आगरी साहित्य गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. अलिबाग अर्बन बँकेचे अध्यक्ष अनिल जोशी आणि रेश्मा जोशी यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी तालुका आगरी समाज संघटना माजी अध्यक्ष सावळाराम जाधव, एकनाथ धुळे, सुरेश टोकरे तसेच इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे, सरपंच महेश विरले, सर्वेश तरे, मोरेश्वर पाटील, आणि दया नाईक हे उपस्थित राहणार आहेत.

आगरी ग्रंथालय

# रेशन दुकानावर होणार कारवाई

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

खारघर शहरातील कोपरा येथील रेशनिंग दुकानावर कारवाई होणार आहे. कारवाईचा प्रस्ताव पुरवठा अधिकाऱ्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे पाठवले आहे. खारघरमधील कोपरा गाव येथे रेशनिंगच्या दुकानात रेशनिंगच्या धान्याची काळ्या बाजारात विक्री होत असल्याचा आरोप सिद्धेश ठाकूर यांनी केला आहे. तसे पत्र त्यांनी तहसीलदार पनवेल यांना दिले आहे. त्यानंतर या दुकानाची तपासणी झाली असता दोन क्विंटल तांदळाची तफावत आढळले असल्याचे पुरवठा अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार कारवाईचा प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना पाठवण्यात आला आहे.

# माथेरानमध्ये जिल्हाधिकाऱ्यांचा पाहणी दौरा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर रोजी होत आहे. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्याचे निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी माथेरान शहराला भेट दिली. निवडणुकीची तयारी तसेच निवडणूक यंत्रणेला सूचना देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची हि भेट होती. तर, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्याकडून तेथील कायदा आणि सुव्यवस्था यांचा आढावा घेण्यात आला. त्यांनी, माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेसाठी केवळ ४,०५५ मतदार असल्याने जिल्हाधिकारी यांच्याकडून मतदारांना आवाहन करण्यात आले. तसेच, जास्त मतदान व्हावे यासाठी स्थानिक नगरपरिषद शाळा आणि खासगी शाळांनी जनजागृती मोहीम राबवावी, अशी सूचना निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र ठाकूर आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी पालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी केली. त्याचबरोबर माथेरान शहरात वाहनांना बंदी आहे. त्यामुळे वृद्ध आणि अपंग मतदार यांच्यासाठी पर्यावरण पूरक ई-रिक्षा उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केली. त्याचवेळी शहरात आदर्श आचारसंहिता पालन करण्यासाठी लावण्यात आलेल्या चार पथकांची माहिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेतली.



# निवडणुकीला संशयाचा वारा

- **दुबार मतदारांचा उमेदवारांच्या मतांवर घाला**
- **लेखी तक्रार देऊनही निवडणूक अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष्य**

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण परिसर औद्योगिक दृष्ट्या झपाट्याने विकसित होत असताना या ठिकाणी परप्रांतीयांची वस्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, त्याच वाढीने आता गंभीर प्रश्न उभे राहत आहेत. उरणमधील परप्रांतीयांपैकी अनेकांची नावे उरण विधानसभा मतदार यादीत आणि त्यांच्या मूळ गावालाही असल्याचे उघड होत आहे. म्हणजेच एकच व्यक्ती दोन ठिकाणी मतदानाचा हक्क बजावताना दिसत आहेत. त्यामुळे ही दुबार नावे केवळ निवडणूक प्रक्रियेचा भंग नाही, तर उरणमधील उमेदवारांच्या मतांवर सरळ घाला असल्याचा सूरदेखील स्थानिकांमधून उमटू लागला आहे. या संदर्भात अनेक वेळा लेखी तक्रारी देऊनही निवडणूक आयोग पूर्णपणे निष्क्रिय असल्याचा आरोप देखील स्थानिकांकडून होत आहे. तसेच, काही जबाबदार मतदारांनी स्वत: हून अर्ज करून, माझे नाव दोन ठिकाणी असून ते एकाच ठिकाणी ठेवावेत,असे स्पष्टपणे सांगूनही आयोगाकडून दुरुस्तीची तसदी घेतली गेली नाही. त्यामुळे संपूर्ण मतदार यादीत पारदर्शकतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या उरणमध्ये परप्रांतीयांची नावांची संख्या मोठी असल्याने मतांचा ताळेबंदच बिघडू शकतो, असा भीतीचा सूर अनेक उमेदवार आणि स्थानिक नागरिकांमधून होत आहे.

**पर्यटकांना मार्ग शोधणे होणार सुकर | क्यूआर कोडचे फलक लावण्यास सुरुवात**

# मुंबई-गोवा महामार्गाची माहिती आता एका क्लिकवर

**| रायगड | प्रतिनिधी |**

कोकणातून जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गाची सर्व माहिती आता एका क्लिकवर मिळणार आहे. यासाठी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महामार्गावर ठिक ठिकाणी लवकरच क्युआर कोड लावण्यात येणार आहेत.




राज्यातील महामार्गाची सुरक्षितता आणि प्रवाशांना आवश्यक माहिती त्वरित उपलब्ध व्हावी, यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने एक महत्वकांक्षी योजना हाती घेतली आहे. राज्यातील प्रत्येक महामार्गावर क्यूआर कोड असलेली विशेष फलक लावले जाणार आहे. याप्रमाणेच मुंबई-गोवा महामार्गावर असे फलक लावण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे. महामार्गावरील या फलकावरील हा कोड स्कॅन करताच महामार्गाशी संबंधित सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर क्यूआर कोड लावण्यात येणार असून हा कोड स्कॅन करताच ठेकेदाराची संपूर्ण कामाची माहिती आपल्याला दिसणार आहे. याबरोबर केवळ महामार्गाची माहितीच नाहीत तर पेट्रोल पंप, पोलीस स्टेशन, ई-चार्जिंग स्टेशन, रुग्णालये व हॉटेलची माहिती ही एका क्लिकवर कळणार आहे.

याबरोबर या क्यूआर कोडमुळे महामार्गावरील पुढील काही किलोमीटरमध्ये येणारे टोल नाके, पंक्चर दुरुस्तीची दुकाने तसेच इलेक्ट्रिक वाहनांसाठी ई-चार्जिंग स्टेशन्स यांची अचूक माहिती मिळणार आहे. त्याचबरोबर अपघात किंवा वाहनात बिघाड झाल्यास नागरिक तत्काळ क्यूआर कोड स्कॅन करून गस्त टिम किंवा रेसिडेंट इंजिनियर यांच्याशी संपर्क साधने सहज शक्य होणार आहे. या क्युआर कोडमध्ये आपत्कालीन नंबर १०३३ असून यामुळे त्वरित मदत मिळणे सोपे होणार आहे. तसेच गस्त, टोल व्यवस्थापक, अभियंता यांचे संपर्क क्रमांक, कामाची माहिती, प्रकल्पाची लांबी, बांधकाम, देखभाल कालावधी यासह विविध माहिती आपणाला एका स्कॅनवर कळणार आहे.

क्यूआर कोडचे फलक लावण्याची सुरुवात करण्यात आली आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील रत्नागिरी जवळील हातखंबा येथे एक क्यूआर कोडचा फलक लावण्यात आला आहे. हा क्यूआर कोड स्कॅन करण्यासाठी कोणत्याही विशेष ॲपची आवश्यकता असणार नाही. या क्युआर कोडमुळे महामार्गावर होणाऱ्या अपघातांचे प्रमाणदेखिल कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**रायगड जिल्हा परिषद कृषी विभागाचा स्तुत्य उपक्रम**

# घरच्या घरी भाजीपाला लागवडीवर भर

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषद कृषी विभागाने घरच्या घरी भाजीपाला लागवडीवर भर दिला आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना परसबागेसाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे. परसबाग तयार करणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदानाच्या स्वरूपात ५ हजार रुपये दिले जाणार आहेत. ऑनलाईन अर्ज केल्यावर मंजूरी मिळाल्यानंतर हे अनुदान त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून जीवनमान उंचावणे हा उद्देश समोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून परसबागेचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

घराच्या मोकळ्या जागेत फुले, भाजीपाला लागवड करण्यास अनेकांना आवडते. लॉकडाऊनच्या काळापासून हा प्रयत्न मोठ्या प्रमाणात करण्यात आला. बाजारातील भाज्यांच्या वाढत्या दरामुळे भाजी विकत घेणेदेखील सर्वसामान्यांना परवडत नाही. काही भाज्यांची लागवड करताना रासायनिक खतांचा मारा मोठ्या प्रमाणात केला जातो. भाज्या खाल्यानंतर आरोग्यावर त्याचा परिणाम होतो. हा प्रश्न कायमचा मार्गी लावण्याबरोबरच नागरिकांना घरच्या घरी विषमुक्त भाजी तयार करता यावी, यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागाने पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांनी घरच्या घरी भाजीपाला लागवड केल्यास त्याबाबत अर्ज ऑनलाईन केल्यावर शेतकऱ्यांना थेट अनुदान दिले जाणार आहे. त्यासाठी परसबाग योजना सुरु करण्यात आली आहे. परसबाग लागवड करण्यास प्रोत्साहीत करण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. या योजनेच्या माध्यमातून थेट ५ हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. शेतक-यांनी योजनांचा लाभ घेण्यासाठी महा-डीबीटी पोर्टलच्या संकेतस्थळावर अर्ज दाखल करावा. या योजनेअंतर्गत ऑनलाईन अर्ज स्वीकृतीपासून लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची सुविधा पोर्टलद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. एकत्रित संगणकीय सोडत पध्दतीने लाभार्थी निवडण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

# एसटीचा प्रवाशांच्या जीवाशी खेळ

## दररोज बसमध्ये होतोय बिघाड

**। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।**

**सुधागडसह पेण तालुक्यातील डोंगरदरीत राहणाऱ्या नागरिकांसाठी एसटी ही जीवनवाहिनीच मानली जाते. शाळा, कॉलेज, ऑफिस, बाजारपेठ, दवाखाने या ठिकाणी जाण्यासाठी येथील नागरिक मोठ्या प्रमाणावर एसटीवर अवलंबून असतात. परंतु, एसटी महामंडळाच्या निष्काळजी धोरणामुळे प्रवाशांच्या जीवितावर गंभीर संकट ओढावत आहे. दररोजच येथील डोंगराळ भागात प्रवासादरम्यान एसटीमध्ये काहीना काही बिघाड होतच असतो. त्यामुळे येथील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**




सुधागड सह पेण तालुक्यात मोठ्या प्रमाणात डोंगराळ भाग असून येथील नागरीक दळणवळणासाठी पुर्णपणे एसटी बसवर अवलंबून असतात. शाळा, कॉलेज, ऑफिस, बाजारपेठ, दवाखाने या ठिकाणापासून दुरवर असल्यामुळे खासगी वाहनाने ये-जा करणे परवडण्यासारखे नसते. त्यामुळे एसटी ही त्यांची जीवनवाहीनीच झाली आहे. परंतु, तीच जीवनवाहीनी आता त्यांचा काळ बनतेय की काय, अशी भीती प्रवासी वर्गाच्या मनात बसत आहे. त्याला कारण म्हणजे पाली-महागाव-कवेला वाडी, पाली-घोडगाव-खेमवाडी, पेण-घोडगाव, पेण-खेमवाडी तसेच लगतच्या डोंगराळ मार्गांवर धावणाऱ्या एसटी बसेसमध्ये दररोज काहीना काही बिघाड होतच आहेत. चालू बसचा कधी ब्रेक फेल, क्लच प्लेट निकामी, टायर पंचर तर कधी ऑइल पाईप फुटणे अशा गंभीर घटना सातत्याने घडत असतात.

त्यामुळे बस रस्त्यामध्येच थांबविण्याची नामुष्की चालकावर येते. तीव्र चढ-उतार, खोल दऱ्या आणि वळणावळणाचे धोकादायक रस्ते अशा परिस्थितीत बस बंद पडणे म्हणजे प्रवाशांच्या जिवाशी थेट खेळच, अशी तीव्र प्रतिक्रिया स्थानिकांमधून व्यक्त होत आहे. यापूर्वी स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि नियमित प्रवाशांनी अनेक वेळा महामंडळ प्रशासनाला औपचारिक निवेदन देत समस्या मांडल्या आहेत. परंतु, त्यावर प्रशासनाकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे रोजचा बस बिघाड, विलंब, प्रवासातील भीती आणि असुरक्षिततेमुळे नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

### चालक-वाहकांकडून असमाधानी उत्तर

प्रवाशांनी संबंधित चालक व वाहकांकडे तक्रार मांडल्यास त्यांच्याकडून असमाधानी उत्तर दिले जाते. ते सांगतात की, या सर्व गोष्टी आमच्या हातात नाहीत. तक्रार करायची असेल तर थेट अधिकाऱ्यांकडे जा. आम्हाला जे वाहन दिले जाते ते चालवण्याशिवाय आमच्याकडे पर्याय नाही. अशा प्रतिक्रियेमुळे प्रवाशांचा रोष आणखीच वाढत आहे. जर चालक-वाहक असहाय असतील तर मग या परिस्थितीची जबाबदारी नेमकी कोण घेणार, हा प्रश्न अधिक गंभीर बनत आहे.

### प्रवासी वर्गात भीतीचे वातावरण

येथील डोंगरपट्टी भागातील रस्ते अरुंद असल्याने एखाद्या बसमध्ये बिघाड झाल्यास त्या किठाणी वाहतूक कोंडीची समस्या उद्भवून वाहनांच्या मोठ्याचा मोठ्या रांगा लागतात. रात्रीच्या वेळी बस बंद पडल्यास प्रवाशांना अंधारात थांबावे लागते. विशेषतः महिला व विद्यार्थ्यांमध्ये यामुळे भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. काही ठिकाणी बस चढावर अचानक बंद पडल्यावर ती मागे घसरण्याचीही घटना घडली आहे. त्यामुळे ही मोठ्या दुर्घटनेला निमंत्रण देणारी परिस्थिती आहे. त्यामुळे महामंडळाने आमचा जीव धोक्यात घालणे बंद करावे. बसची तांत्रिक तपासणी वाढवावी, चालकांना योग्यवेळी बदलावे आणि जुन्या गाड्यांच्या ऐवजी नवीन व सक्षम बस द्याव्यात, अशी प्रतिक्रीया स्थानिकांसह प्रवासी वर्गातून उमटत आहेत.

## मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन नगरपरिषदेच्यावतीने गुरुवारी (दि.२०) एसव्हीइपी कार्यक्रमांतर्गत भव्य मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. लोकशाही बळकटीकरण आणि १०० टक्के मतदानाचे महत्त्व जनमानसात पोहोचविण्याच्या उद्देशाने ही रॅली काढण्यात आली होती. या रॅलीला श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय येथून सुरुवात करून शहरातील प्रमुख मार्गावरून जात समुद्रकिनाऱ्यावर समाप्त झाली. हा उपक्रम निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार महेंद्र वाकलेकर, मुख्याधिकारी जीवन पाटील आणि नायब तहसीलदार मनोज माने यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. तसेच, नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. या रॅलीमध्ये एकूण २५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

## निवडक

### रोहा येथे चंपाषष्ठी उत्सवाला सुरूवात



**कोलाड** : रोहा शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या धनगराळी येथील खंडोबा मंदिरात श्री चंपाषष्ठी उत्सवाला शुक्रवार दि.२१ नोव्हेंबरपासुन सुरुवात झाली आहे. या मंदिरात दररोज चंपाषष्ठी उत्सवानिमित्ताने पूजा अर्चा, आरती, भजन, कीर्तन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, हा उत्सव बुधवार दि.२६ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. या उत्सवादरम्यान पूजार्चन, लघुरुद्राभिषेक, मानपान, तळी भंडार, महाआरती, खंडेराय महाराज पालखी मिरवणूक होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री खंडेराय देवस्थान रोहे विश्वस्त मंडळ अध्यक्ष संतोष खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली संजय कवितके, संभाजी लाळगे, सुनील भादेकर, हेमंत शेवाळे, नंदकुमार भादेकर, किशोर पाडसे, सचिन कुरकुंडे आदी परिश्रम घेत आहेत.

### उर्दू हायस्कूलच्या पटांगणाची स्वच्छता




**नागोठणे** : नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज समोरील प्रांगण स्वच्छ करण्याचे काम नुकतेच नागोठणे ग्रामपंचायतीकडून पूर्ण करण्यात आले. नागोठणे एज्युकेशन सोसायटीचे सचिव लियाकत कडवेकर यांच्या मागणीनुसार नागोठणेचे उपसरपंच अखलाक पानसरे यांनी तत्काळ उर्दू हायकुलचे पटांगणाची साफसफाई करून घेतली. त्यामुळे हायस्कूलमधील मुलांना खेळण्यासाठी हे पटांगण उपलब्ध झाले आहे.त्याचबरोबर उर्दू हायस्कूल समोरील जागेतून जाणाऱ्या सांडपाण्याच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करुन हे सांडपाणी हायस्कूलच्या बाहेरील जागेतून जाण्यासाठी व्यवस्था करावी, अशी मागणीही लियाकत कडवेकर यांनी नागोठणे ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



### नेरळमधील शाळांना संगणक वाटप

**नेरळ** : नेरळचा राजा सार्वजनिक गणेश मंडळ ही एक सेवाभावी संस्था आहे. त्यांच्याकडून विविध सामाजीक कार्यक्रम राबवले जातात. तसेच, या गणेश मंडळाकडून ग्रामीण भागातहज गरजू मुलांना शैक्षणिक साहित्यांचे देखील वाटप केले जाते. दरम्यान,नेरळचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व एच.डी.एफ. सी. सिक्युरीटीज मंबई यांच्याकडून ग्रामीण भागांतील २५ जिल्हा परिषद शाळांना संगणक वाटप करण्यात आले. या शाळा नेरळममील अती दुर्गम भागातील आहेत. अशा शाळांना किंवा या शाळेमध्ये शिकणारे जे विद्यार्थी आहेत त्या विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण कशाप्रकारे घेता येईल, या विचाराने नेरळ परिसरातील पंचवीस जिल्हा परिषद शाळांना संगणक वाटप करण्यात आले.



### शेलघरच्या विकासकामांची पाहणी

**चिरनेर** : शेलघरमध्ये साई मंदिराची उभारणी होत आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू ठेवली आहे. साई मंदिरात भाविकांना जाणे सुलभ व्हावे, यासाठी सिडको अधिकाऱ्यांसोबत महेंद्र घरत यांनी शेलघरचा दौरा केला. विकासकामांबाबत काही पर्याय सुचवले. तसेच, शेलघर-गव्हाण रस्ता तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. यावेळी सिडकोचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सिडकोचे सहायक कार्यकारी अभियंता भूषण पाटील म्हणाले, शेलघरच्या तलावाला भिंत टाकून बाजूने साईभक्तांसाठी रस्ता तयार करता येणे शक्य आहे. त्यासाठी आम्ही प्राथमिक स्वरूपात कामाला सुरुवात केली आहे, लवकरच हा प्रस्ताव सिडकोच्या वरिष्ठांकडे पाठवून त्याला मंजुरी मिळाल्यावर ते काम मार्गी लागेल.

## सुरेश पालकरांना पुरस्कार जाहीर

**श्रीवर्धन** : रायगड जिल्हा सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश पालकर यांची 'कै. बी.जी. देशमुख जीवन गौरव' या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा सोहळा दि.१२ डिसेंबर रोजी पुणे येथील भारतीय विद्यापीठच्या विधी महाविद्यालय सभागृहात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी पोलीस महासंचालक जयंत उमराणीकर, भारती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.शिवाजीराव कदम तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## माजी विद्यार्थी संघाची स्थापना

**। उरण । प्रतिनिधी ।**

शाळेकडून झालेल्या जडणघडणीची जाणीव ठेवून माजी विद्यार्थ्यांकडून शाळेबद्दल ऋण व्यक्त करण्यासाठी शाळेच्या विकासात महत्वाचा हातभार लावत असतात. या माजी विद्यार्थ्यांच्या सहयोगातून शाळेच्या गुणवत्ता विकासास अधिक चांगल्या प्रकारे चालना मळ्रि शकते. त्यासाठी तु. ह. वाजेकर उच्च माद्यमिक विद्यालय फुंडेचे अध्यक्ष कृष्णाजी कडू यांच्या अध्यक्षतेखाली माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. यावेळी गोपाल पाटील, दिपक ठाकूर, भार्गव पाटील यांनी आपले अनुभव सांगत, शाळा उत्कर्षाकडे वाटचाल करत असताना आपले सर्वांचे योगदान असणे गरजेचे आहे, असे सांगितले. त्यानंतर माजी विद्यार्थी संघाची नवीन कार्यकारिणी स्थापन करण्यात आली. त्यात अध्यक्ष भार्गव पाटील, उपाध्यक्ष दीपक ठाकूर, सचिव बी. बी. साळुंखे, सल्लागार मच्छिंद्र घरत, कोषाध्यक्ष सुरज ठाकूर, आर. पी. ठाकूर, सदस्य गोपाल पाटील, कुणाल पाटील यांची निवड करण्यात आली. या सभेस एच. एम. धुरी, एस. जे. माळी व इतर सेवक उपस्थित होते.

## कौशल्यवृद्धी कार्यशाळेचे आयोजन




**। रसायनी । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील कौशल्य विकास प्रशिक्षण देणारे साधन व्यक्ती, विद्यार्थी व कर्मचारी यांच्याकरिता सी.एस.आर जे.एन.पी.टी यांच्या आर्थिक सहकार्यातून दोन दिवसीय कौशल्यवृध्दी व क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आत्मनिर्भर भारतसाठी अशा प्रशिक्षणाची नितांत गरज असल्याचे मत अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले. यावेळी जे.एस.एस. रायगड व सी.एस.आर जे.एन.पी.टी.मुळे व्होकल फॉर लोकल संकल्पनेला प्रेरणा दिली जात असल्याचे मत संचालक डॉ. विजय कोकणे यांनी व्यक्त केले. तसेच, नरेन जाधव यांनी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले. यावेळी जन शिक्षण संस्थानचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे, नरेन जाधव, प्रतिक्षा चव्हाण, सोनिया पाटील यांच्या उपस्थितीत लाभार्थी व प्रशिक्षकांना कार्यशाळा व प्रशिक्षण वर्गाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

## पूरग्रस्त विद्यार्थ्यांना सुधागड विद्यासंकुलची शैक्षणिक मदत

**। सुतारवाडी । प्रतिनिधी।**



परतीच्या मान्सून पावसाने महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरील अनेक जिल्हांना झोडपून काढून पूरग्रस्त वातावरण निर्माण केले होते. अशातच या बीड जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये व विद्यार्थ्यांच्या घरांमध्ये पाणी शिरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यांचे नुकसान झाले होते. याची जाणीव ठेवून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक-शिक्षेत्तर कर्मचारी यांना शैक्षणिक साहित्य जमा करण्याचे आवाहन केले होते. त्या प्रमाणे विद्यार्थी व शिक्षक-शिक्षेकेत्तर कर्मचारी यांनी शैक्षणिक साहित्य जमा केले. ते शैक्षणिक साहित्य बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांच्या कडे नुकतेच सुपुर्द केले.

कळंबोली येथील सुधागड विद्या संकुल नेहमीच राष्ट्रीय आपत्तीमध्ये मदत करण्यात पुढे असते. या वर्षी परतीच्या मान्सून पर्जन्याने बीड जिल्ह्यातील नागरिकांची शेती, घरे दारे, व्यवसाय यांचे अतोनात नुकसान झाले. महाराष्ट्र शासन त्याच बरोबर विविध संस्था-संघटना यांनी मुलभूत गरजा असणार्या वस्तू पूरग्रस्थांना पोहचवल्या मात्र शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याचे झालेले नुकसान त्यामुळे त्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणूनच संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी विद्यार्थी, शिक्षक व स्वतः शैक्षणिक साहित्य जमा केले. यामध्ये खोडरबर पासून ते दप्तरापर्यंत साहित्याचे ३०० किट तयार करून ते २४ मोठ्या बॉक्समध्ये टाकून बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल तहसिलदार नरेंद्र कुळकर्णी यांच्या मार्फत बीड जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांच्या कडे सुपुर्त केले. यावेळी जिल्हाधिकारी जॉनसन यांनी सुधागड विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, विद्यार्थी व शिक्षक-शिक्षेकेत्तर कर्मचारी यांचे कौतुक करून तसे कौतुक प्रमाणपत्र देवून आभार मानले.

## नढाळ शाळेत स्पर्धांचे आयोजन



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद विभागातील नढाळ येथील एचडी पाटील इंग्रजी माध्यम शाळा आणि संस्कृती संवर्धन प्रतिष्ठाना तर्फे निरनिराळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या शाळेतील इयत्ता ४ थी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जोपासना करण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी रामायणातील पात्रांचे वस्त्र परिधान केले होते. तसेच, इयत्ता पाचवी साठी संतकथा, इयत्ता सहावीसाठी चित्रकला-रामायणातील पात्रे व प्रसंग, इयत्ता सातवीसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा व महाभारत आणि इयत्ता आठवीसाठी निबंध स्पर्धा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका निशा श्रीवास्तव-पोलेकर, शिक्षक व उपस्थितांनी अथक परिश्रम घेतले.

## दिघोडे रस्त्यावर वाहतुकीला अडथळा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



दिघोडे गव्हाण फाटा हा रस्ता वाहतुकीला अपुरा पडत असल्याने या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम होऊन, सुद्धा हा रस्ता वाहतुकीला अपुरा पडत आहे. या रस्त्यावरील असलेल्या कंटेनर यार्ड वाल्यांची स्वतः ची पार्किंग व्यवस्था नसल्याने गाड्या रस्त्यावर उभ्या केल्या जात असल्यामुळे, वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. तसेच, या रस्त्याच्या कडेला डेब्रिज कचरा देखील पडला आहे. तसेच, या रस्त्यावर भंगार वाल्यांनी आपली दुकाने थाटली आहेत. या बरोबर रस्त्यावर पान टपरी व इतर दुकानाची अतिक्रमे वाढली आहेत. तसेच, दिघोडे नाक्यावरील वळण हा अवजड कंटेनर वाहतुकीला बंदी असलेला फलक तसेच वाहतूक विभागाने लावलेला कंटेनर वाहतुक बंदी असलेला फलक व पुढे शाळा असलेला फलक हा येथील रस्त्याचे काम चालू असताना ठेकेदारांनी काढून टाकला. सार्वजनिक बांधकाम विभागाचे ठेकेदारावर अंकुश नसल्याने, या रस्त्याचे काम पूर्ण होऊन सुद्धा रस्त्यावरील काढलेले फलक लावण्याची तसदी ठेकेदार घेत नाहीत. या सर्व समस्यांबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे पनवेल कार्यकारी अभियंता यांच्याशी संवाद साधल्यानंतर त्यांनी या सर्व समस्या एका महिन्यात सोडविल्या जातील, असे आश्वासन दिले होते. मात्र, एका महिन्या नंतर पुन्हा त्यांना या समस्याची आठवण करून देण्यात आली. यावेळी त्यांनी येत्या आठ दिवसांत दिघोडे येथील वळण रस्ता हा अवजड वाहनाना बंदी असलेला बोर्ड तसेच इतर काढलेले फलक लावण्यात येतील. त्याचबरोबर दिघोडे गव्हाणफाटा येथील अतिक्रमणे काढून टाकण्याची ग्वाही सार्वजपिक विभागाच्या पनवेल कार्यकारी अभियंत्यांनी दिली.

## जिल्ह्यात वासुदेवाचे दुर्मिळ दर्शन

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**



'वासुदेव आला हो, वासुदेव आला' हे गाणे कानावर पडले की पहाटे गाव जागविणारा वासुदेव आठवतो. गळ्यात कवड्या-मण्यांच्या माळा, अंगावर रंगीबेरंगी कपडे, दोन्ही हातात तांब्याचे कडे, हातामध्ये चिपळ्या, कपाळावर व कंठावर गंधाचे टळि आणि डोक्यात मोरपिसाची टोपी असा त्याचा पेहराव असायचा. पूर्वी पहाटे तो घरोघरी फिरत असे. आता मात्र वासुदेव लुप्त होण्याच्या मार्गावर असून त्यांचे दर्शन दुमर्ळिच झाले आहे.

ग्रामीण भागात वासुदेवाचे महत्व विशेष होते. परंतु, आता त्याचे मुळात दर्शनच दुमर्ळि झाले आहे. त्यामुळे 'वासुदेव आला हो, वासुदेव आला' हे स्वर कानी पडतच नाहीत. त्यामुळे कृष्णाचा अवतार मानल्या जाणाऱ्या वासुदेवाला संगणक युगात थारा नाही, असे यावरून स्पष्ट होत आहे. वासुदेव केवळ शहरातूनच नव्हे तर खेड्यातूनही हद्दपार झाला आहे. पूर्वी भात कापणी झाली की वासुदेव घरोघरी जाऊन धान्य मागायचा, बच्चे कंपनी वासुदेवाच्या आवाजाने पहाटे उठून त्याच्या मागे फिरायची. 'सकाळच्या पहारी आली वासुदेवाची स्वारी' अशी गाणी म्हणत आपल्या दोन्ही हातातील चिपळ्या वाजवत वासुदेव धान्य मागत होते. वासुदेव ही पिढ्यानं पिढ्या चालत आलेली एक परंपरा आहे. मात्र, ही परंपरा टिकविण्यासाठी सध्या कोणीही धजावत नाही. शहरीकरणात फ्लॅट संस्कृतीमुळे वासुदेवाला इमारतीत प्रवेश मळित नसल्याने शहरातून तर तो केंव्हाच हद्दपार झाला आहे. मात्र, गावाकडे काही प्रमाणात वासुदेवाचे दर्शन होत असून उत्सुकतेपोटी वासुदेवाला पाहून मान सन्मान दिला जात आहे.

## पाचही मापदंडांवर उल्लेखनीय कामगिरी | स्वदेस फाऊंडेशनतर्फे गावांचा सन्मान

# म्हसळ्यातील पेडांबे ठरले 'स्वप्नातील गाव'

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील पेडांबे या गावाने स्वच्छ, सुंदर, स्वास्थ्य, साक्षर व समृद्ध अशा पाचही मापदंडांवर उल्लेखनीय कामगिरी करत आराखड्यातील ८७ टक्के कामे पूर्ण केली आहेत. त्यामुळे या गावाचा स्वदेस फाऊंडेशन तर्फे 'स्वप्नातील गाव' म्हणून सन्मान करण्यात आला आहे.

स्वदेस फाऊंडेशन तर्फे स्वच्छ, सुंदर, स्वास्थ्य, साक्षर व समृद्ध अशा पाचही मापदंडांवर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गावाला 'स्वप्नातील गाव' म्हणून सन्मानित करते. याच पार्श्वभूमीवर म्हसळा तालुक्यातील पेडांबे गावातील नागरिक, तरूण आणि मुंबईत राहत असलेले पेडांबेकर यांनी उत्तुंग एकजूट दाखवत गावाच्या सर्वांगीण विकासाचे नियोजन एकत्रितपणे केले होते. यादरम्यान, चित्रे व सुविचारांनी सजलेल्या गावातील भिंती, आकर्षक रांगोळ्या आणि शुशोभिकरण यामुळे गावाचे सौंदर्य अधिक खुलून आले आहे. या उपक्रमांमुळे पेडांबे गावाने स्वप्नातील गाव प्रकल्पात आपले वेगळे स्थान निर्माण केले. पेडांबेकरांनी स्वदेस फाऊंडेशनच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता उपक्रम, आरोग्य जनजागृती, रस्ते-सांडपाणी व्यवस्थापन, वृक्षारोपण, तरुणांचे कौशल्य विकास अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. त्यामुळे स्वदेश फाऊंडेशन तर्फे पेडांबे गावाला 'स्वप्नातील गाव' म्हणून घोषित करण्यात आले. गट विकास अधिकारी माधव जाधव यांनी गावाचे अभिनंदन व कौतुक केले.तसेच, सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी तंटामुक्त पेडांबे गावाचे अभिनंदन करून सायबर गुन्हे यावर मार्गदर्शन केले. या सर्वांगीण विकासामुळे पेडांबे गावाने स्वप्नातील गाव करण्यात अभिमानाची मान उंचावली आहे.

दरम्यान, समारंभाच्या दिवशी लेझीम व खालू वादकांच्या तालावर निघालेल्या भव्य मिरवणुकीने गाव दुमदुमून गेले होते. यावेळी असणारा महिलांचा सहभाग, तरुणांचे योगदान आणि ज्येष्ठांचे मार्गदर्शन या तिन्हींच्या एकत्रित प्रयत्नांनी पेडांबेने विकासाचा नवा आदर्श ठेवला आहे. या कार्यक्रमावेळी म्हसळा गट विकास अधिकारी माधव जाधव, सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, स्वदेस फाऊंडेशन व्यवस्थापक शिवतेज ढवळ, नजीर शिकलगार, विशाल वरुटे, सरपंच जयदास भायदे, उपसरपंच हरिश्चंद्र जंगम, चांगदेव सानप, अजित कांगणे, नरेंद्र काजारे, सागर जाधव, स्वराली जाधव, विजया जाधव, सविता पाटील, भिकू पाटील, मच्छिन्द्रनाथ महाडिक, धोंडू दाभेकर, प्रभाकर पाटील, अशोक अधिकारी तसेच गाव विकास समिती सदस्य आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२३ नोव्हेंबर**

१) श्री.प्रभाकर राजाराम सुर्वे
२३-११-१९४३
मु.नाईक-आळी, अलिबाग

## मंगळसूत्र खेचून दोघेजण पसार

**पनवेल** : पायी जात असलेल्या एका ज्येष्ठ नागरिक महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून दोघेजण मोटार सायकली वरून पसार झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. श्रेयसी श्रीकांत कर्वे (वय ६७ रा. पदमवती सोसायटी) या विघ्नेश मेडिकल समोर स्वामी नित्यानंद मार्ग पनवेल येथून पायी जात असताना मोटार सायकली वारूळ आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील जवळपास २ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून ते पसार झाले आहेत या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खड्डे भरण्यासाठी ग्रामस्थांचे श्रमदान

**● जय हनुमान क्रीडा मंडळाचा अनोखा उपक्रम ●नागरिकांचा प्रवास सुखकर करण्याचा प्रयत्न**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत मुरबाड रस्त्यावरील खड्डे बुजवून एक अनोखा उपक्रम जय हनुमान क्रीडा मंडळाच्या वतीने ग्रामस्थांनी श्रमदान करून खड्डे भरले. ग्रामस्थांनी सरकारच्या निर्दयी भूमिकेमुळे आणि खड्डे भरले जात नसल्याने होणारे अपघात लक्षात घेऊन खड्डे भरण्यास सुरुवात केली आहे.



कर्जत मुरबाड रस्त्यावरील खड्ड्यांकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. कर्जत मुरबाड रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यात या राज्यमार्ग रस्त्यावर कशेळे भागात जय भवानी माता मंदिर, भाऊसाहेब राऊत विद्यालय मंदिर समोरील रस्त्यावरील खड्डे यामुळे वारंवार अपघात यामध्ये टू व्हीलर चालक पडून एकाचा मृत्यू झाला आहे.तर अनेक जण गंभीररित्या जखमी झाले आहेत.

याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याने तर झोपेचे सोंग घेतलेला दिसून येत आहे. मोठमोठे अपघात होताना दिसत आहेत.तरीही या मोठ्या खड्ड्यांकडे दुर्लक्ष करून एमएमआरडीसी या होणाऱ्या अपघातांना सर्वस्वी जबाबदार असून त्यांच्यावर कुठलीही कारवाई होताना दिसत नाही, हे लक्षात घेऊन कशेळे येथील जय हनुमान क्रीडा मंडळ हे दरवर्षी सामाजिक उपक्रम राबवत आपल्या स्वखर्चाने व मेहनतीने स्वतः अशा प्रकारचे खड्डे भरण्याचे काम करत आहे. शनिवार (दि.२२) नोव्हेंबर रोजी सामाजिक बांधिलकी जपत समाजाची सेवा करण्यासाठी या मंडळाने पुढाकार घेत रस्त्यावरील खड्डे बुजवत नागरिकांचा प्रवास सुखकार करण्याचा प्रयत्न केला आहे. या उपक्रमामुळे प्रवासी वर्गात समाधान व्यक्त केले आहे.

या रस्त्याचे खड्डे भरण्यासाठी जय हनुमान क्रीडा मंडळ कशेळेचे अध्यक्ष आत्माराम खंडागळे, केदार गावकर, अरुण हरपुडे, रामदास घरत, संजय जाधव, दत्ता खराट, रवींद्र शेळके, रवींद्र मते, मारुती शेळके, सदानंद मते, मधुकर राणे, प्रवीण मते, सुधीर मते, संदीप खंडागले, मंगेश फराट, ज्ञानेश्वर शेळके, मंगेश भोईर, अनंता म्हसे,युवराज मेढे, संजय मते, शिरीष मेढे, प्रभाकर दिसले, सचिन फराट,संदीप ठोंबरे, प्रतीक फराट, या सर्वांनी अंग मेहनत करून खड्डे बुजवण्याचे काम केले.

# भारतीय एज्युकेशनतर्फे लसीकरण जनजागृती



**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या वेलशेत येथील शैक्षणिक संकुलातील फार्मसी कॉलेजच्या वतीने ६४ व्या नॅशनल फार्मसी सप्ताहाच्या निमित्ताने नागोठणे शहरात जनजागृती रॅली काढून लसीकरण संदर्भात जनजागृती करण्यात आली. या लसीकरण मोहिमेत फार्मसीचे महत्व पटवून देण्यात आले. या रॅलीची सुरुवात नागोठणे गावची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणात नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नरेश थळकर यांच्या हस्ते करण्यात आली. या जनजागृती रॅलीत प्राचार्य डॉ. आशिष पगारीया, डॉ. समीर पवार, अनघा सामंत, प्रा. जयेंद्र राणे, प्रा. सुरज मोकल, राजेश सुतार, भारत कामथे, अथर्व पाटील यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विध्यार्थी सहभागी झाले होते.

## इसम बेपत्ता



**पनवेल** : बिल्डिंग खालून येतो असे सांगून घराबाहेर पडलेला एक इसम अद्याप घरी न परातल्याची घटना करंजाडे वसाहतीमध्ये घडली असून याबातची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. महादेव शिवाजी सोनावणे (वय ४० वर्षे रा. से-०४ करंजाडे) असे या इसमाचे नाव असून त्याचा रंगाने सावळा, उंची ५ फुट ३ इंच, अंगाने मजबुत, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे मध्यम वाढलेले, डोळे -काळे, नाक पायात काळ्या रंगाची चप्पल, मराठी, हिंदी भाषा अवगत आहे. या इसम बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोहवा युवराज म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.

## ओवळे ते शिर्डी पदयात्रेचे आगमन



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

श्री साई सेवा मंडळ ओवळेतर्फे दरवर्षीप्रमाणे साईभक्तांची ओवळे-पनवेल ते शिर्डी पदयात्रा उत्साहात सुरु झाली. या पालखी दिंडीचे आगमन तालुक्यातील खिडूकपाडा गावात झाले. कार्यक्रमाची सुरुवात रथ पूजनाने करण्यात आली. यावेळी आण्णा भोईर, सुरेश भोईर यांनी रथ पूजन तसेच पालखी पूजन केले. या पालखी सोहळ्याचे स्वागत ठिकठिकाणी झाले. खिडूकपाडा येथील साई मंदिराची स्थापना सन २०१० साली झाली त्यावेळेपासून ओवळे येथून निघणाऱ्या साईंच्या पदयात्रेचे याठिकाणी आगमन होत असून याठिकाणी ग्रामस्थांच्यावतीने साईंची सेवा करण्याचे भाग्य दिल्याबद्दल मंडळाचे आभारी असल्याचे मत यावेळी खिडूकपाडा साई मंदिराचे प्रभुदास उर्फ आण्णा भोईर यांनी व्यक्त केले. यावेळी पालखी निघताना अनेक साईभक्त बंधू-भगिनींनी पदयात्रेत सामील होऊन प्रेमळ निरोप दिला. यावेळी ओम साई रामच्या घोषणांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.

# बँक ऑफ बडोदा अलिबाग शाखेचे स्थलांतर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारतातील अग्रगण्य सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपैकी एक असलेल्या बँक ऑफ बडोदाच्या अलिबाग शाखेचे नवीन, अत्याधुनिक आणि ग्राहकस्नेही अशा सुख सागर भवन येथे स्थलांतर करण्यात आले आहे. या नव्या शाखेचे उद्घाटन जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आले.



नवीन शाखा परिसर अधिक प्रशस्त, सुव्यवस्थित आणि आधुनिक सुविधांनी परिपूर्ण आहे. ग्राहकांना अधिक वेगवान, सुरक्षित आणि तंत्रज्ञानाधिष्ठित बँकिंग सेवा देण्याच्या हेतूने हे स्थानांतर करण्यात आले असल्याचे बँक अधिकाऱ्यांनी सांगितले. उद्घाटन सोहळ्यास बँक ऑफ बडोदा मुंबई झोनचे प्रमुख सुनील कुमार शर्मा, नवी मुंबई विभागाचे प्रादेशिक प्रमुख मनिष कुमार सिन्हा, बँकेचे अन्य वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, ग्राहक आणि अलिबाग परिसरातील मान्यवर नागरिक उपस्थित होते.

## आनंदी शिर्के यांचे निधन



**कोलाड** : रोहा तालुक्यातील गोवे येथील रहिवाशी आनंदी दगडू शिर्के यांचे बुधवार (दि १९) नोव्हेंबर रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, एक मुलगी, तीन सुना, पुतणे, नातवंडे, पतवंडे व मोठा शिर्के परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवार (दि.२८) नोव्हेंबर तर उत्तरकार्य विधी रविवार (दि. ३०) नोव्हेंबर रोजी त्यांच्या गोवे येथील निवास्थानी होणार आहेत.

## वाजेकर विद्यालयात आरोग्य शिबीर

**उरण** : उरण तालुक्यात शिक्षण क्षेत्रात प्रसिद्ध असणाऱ्या नामांकित तुकाराम हरी वाजेकर विद्यालय फूंडे येथे आरोग्य शिबीर मोठया संपन्न झाले. या शिबिराला नागरिक व पालक, विद्यार्थी यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.तुकाराम हरी वाजेकर विद्यालय फूंडे अनिवासी रयत गुरुकुल प्रकल्पाअंतर्गत आरोग्य शिबीराचे आयोजन वोक्हार्ड फाउंडेशन तर्फे करण्यात आले आहे.त्यामध्ये मुलांची तपासणी, मार्गदर्शन व औषधाचे वाटप मोफत करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक तसेच वोक्हार्ड फाऊंडेशनचे प्रतिनिधी व डॉक्टर उपस्थित होते.

## मोहोपाडा ग्रामपंचायत राज्यात प्रथम

**रसायनी** : रायगड जिल्ह्यात सर्वाधिक लोकसंख्या असणारी वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीची ओळख आहे. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांचा सहभाग वाढवण्यास त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी माझी वसुंधरा ६.० अभियान सर्वत्र राबविले जात आहे. यात कोकणातील ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांनी माझी वसुंधरा ६.० मध्ये ८६०१ ई-शपथ घेवून राज्यातून प्रथम क्रमांक पटकावला. याप्रसंगी उमा मुंढे, दिपक कांबळे, भुषण पारंगे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, संदिप मुंढे, रसिका खराडे, प्रतिक्षा राऊत, मयुरा गोपाळे, प्रशाली खाने, वेदीका पाटील, माया पाटील, कविता मांडे, आदीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २३ ते २९ नोव्हेंबर २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### मनावर संयम ठेवा

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात ग्रहांचा प्रभाव तुमचे शिक्षण, तुमची संतान, तुमचे प्रेम संबंध आणि तुमच्या शारीरिक सुखांवर पडेल. तुम्ही आपले वाहन घेण्यात सक्षम व्हाल म्हणून, तुम्हाला वाहन खरेदी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे म्हणजे एक उत्तम वाहनाचे स्वामी बनू शकाल. या कालावधीत वेळी तुम्ही उच्च कोटीच्या सुखांचा आनंद घ्याल आणि आपल्या सुख सुविधांवर चांगले खर्च ही कराल. तुम्हाला नोकरी बदलल्याने बरेच लाभ मिळू शकतात आणि तुमच्या करिअरसाठी हे परिवर्तन बरेच चांगले सिद्ध होईल. दुसरीकडे, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची संधी प्राप्त होऊ शकते यामुळे त्यांच्या लांबवर जाऊन प्रतिक्षित उच्च शिक्षणाची कामना पूर्ण होऊ शकते. विद्यार्थी यावर्षी बऱ्याच परीक्षेत चांगले प्रदर्शन करतील आणि परिणाम स्वरूप खूप चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हाल. **महिलांना :** आपण थोड मनावर संयम ठेवा चांगल्या घटना घडणार आहेत त्याचा फायदा करून घ्या, आठवड्याचा शेवटी धनलाभ होईल. घरात शांतता ठेवा. **शुभ दिनांक** : २३,२४.

### समाजात प्रतिष्ठा मिळेल

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला जर तुम्ही नोकरी करतात तर, तुम्हाला आपल्या कामावर पूर्ण रूपात लक्ष द्यावे लागेल अन्यथा तुमच्या कार्यालयात तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो. व्यावसायिक भागीदारीमध्ये अनेक आव्हानांचा सामना करतील. परदेशात व्यापार करणाऱ्या लोकांसाठी हा कालावधी बरेच अनुकूल राहू शकते. याकलावधीत तुमचे अनेक विदेशी संपर्क स्थापित होतील ज्याचा तुम्हाला दूरगामी लाभ प्राप्त होईल. तुमचा सामाजिक स्तर वाढेल आणि समाजात तुम्हाला चांगली प्रतिष्ठा मिळेल. याकालावधीत तुम्ही अनेक महत्वाच्या पदांवर असलेल्या लोकांसोबत संबंध स्थापित कराल, जे भविष्यात तुम्हाला बरेच उपयोगाचे ठरतील. आता तुम्हाला स्वतंत्र वाटेल आणि तुम्ही प्रामाणिकपणे अनेक निर्णय घ्याल. **महिलांनाः** तुम्हाला एका गोष्टीची काळजी घेणे गरजेचे आहे की, बऱ्याच वेळा तुमचे निर्णय चुकीचे ही असू शकतात म्हणून, कुणी वरिष्ठ आणि अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊन काही कार्य करा अन्यथा बऱ्याच लाभ स्थानात हानी उचलावी लागू शकते. जर सांभाळून चालले तर, सोपे होईल. **शुभ दिनांक** : २५,२६.

### मान सन्मान मिळेल

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला हा कालावधी तुमच्या जीवनासाठी चांगल्या कालावधीचा एक महत्वपूर्ण सिद्ध होईल यावेळी तुम्हाला काही नवीन व्यवसाय सुरु करण्यापासून सावध राहावे लागेल कारण, अशी शक्यता आहे की, जर तुम्ही काही कार्य सुरु कराल तर, तुम्हाला त्यात यश कदाचित कमी मिळू शकते. यासाठी तुम्हाला आपल्या क्षेत्राच्या अनुभवी आणि मुख्य लोकांच्या सहयोग प्राप्ती हेतू प्रयत्न करावे लागतील आणि ते तुमची मदत करतील. या सर्वांच्या व्यतिरिक्त ही परिस्थिती अशी बनू शकते की, तुम्ही इच्छा असतांना ही त्यांच्या सल्ल्याचा उपयोग करण्यात सक्षम राहणार नाही आणि तुम्हाला काही नुकसान उचलावे लागू शकते. याकालावधीत तुम्हाला आपल्या कार्याने अनेक प्रवासास जावे लागू शकते त्यात अधिकांश यात्रा यशस्वी राहतील **महिलांनाः** तुमच्या कुटुंबातील समस्या सोडविण्यास तुम्हाला पुढाकार घ्यावा लागेल. यामुळे आपणास समाजात मान सन्मान मिळेल, आपणास अनेकबाबीमध्ये सहज यश मिळेल. त्यात आपण पारंगत व्हाल. **शुभ दिनांक** : २७,२९.

### धनाचा सदुपयोग करा

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला प्रवासामध्ये तुम्हाला समस्या ही येतील म्हणून, वेळ राहताच या बाबतीत विचार करा आणि पूर्ण प्लॅनिंग सोबत कुठल्या ही यात्रेवर जा म्हणजे कुठल्या प्रकारच्या असुविधा होणार नाही. या राशीत तुम्हाला पैतृक संपत्ती प्राप्त होण्याची चांगलीच शक्यता आहे तसेच अचानक काही ही अप्रत्यक्षित लाभ मिळू शकतो. आठवडा संपता संपता शेवट पासून तुमच्या खर्चात अप्रत्यक्षात वृद्धी होईल या कारणाने ही तुम्हाला काही फायनान्शिअल समस्यांमधून जावे लागू शकते म्हणून, जी वेळ तुमच्यासाठी उपयुक्त आहे त्या वेळी धनाचा सदुपयोग करा आणि त्याला अर्जित करण्याचा पूर्ण प्रयत्न करा म्हणजे कठीण वेळेत तुम्हाला कुठल्या ही प्रकारच्या समस्यांनी त्रास होणार नाही. **महिलांना :** या कालावधीत तुम्हाला परदेशी संपर्काने अधिक लाभ मिळू शकतो म्हणून, पूर्ण प्रयत्न करा की, तुमच्या व्यवसायाचा संबंध विदेशातून अथवा विदेशी लोकांनी ठेवल्यास तुमची आर्थिक स्थिती बऱ्याच प्राणात सुदृढ होईल. यावेळी जर काही वाद चालत आहे तर, त्यात तुम्हाला यश मिळेल सोबतच त्याने तुम्हाला आर्थिक लाभ ही मिळू शकतो. **शुभ दिनांक** : २३,२९.

### आरोग्यावर खर्च करा

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला या कालावधीत तुम्हाला आपल्या जीवनसाथीच्या आरोग्यावर चांगला खर्च करावा लागू शकतो कारण, अशी शक्यता आहे की, त्यांच्या आरोग्य संबंधित समस्या राहील म्हणून, यावेळी तुम्हाला मुख्य रूपात आपल्या मित्राचे प्रबंधनबरेच विचारपूर्वक केले पाहिजे म्हणजे विपरीत परिस्थितीमध्ये ही तुम्हाला कुठल्या प्रकारच्या फायनान्शिअल समस्येतुन जावे लागणार नाही. यावेळी तुम्हाला आपल्या धनाची गुंतवणूक खूप गरज असल्यासच केली पाहिजे. शेअर्स, सट्टा बाजार, लॉटरीमध्ये जर तुम्ही पडले नाही तरच उत्तम कारण, या कालावधीत या कार्यांच्याद्वारे तुम्हाला आर्थिक हानी होण्याची शक्यता दिसत आहे म्हणून, यावेळी तुम्हाला धन संबंधित गोष्टींमध्ये आणि आर्थिक जीवनाला घेऊन बरेच विचारपूर्वक चालावे लागेल आणि आपल्या समाजाचापरिचय द्यावा लागेल. **महिलांना :** कुठल्या ही व्यक्तीला पैसे देऊ नका ज्यांच्याकडून परत मिळण्याची शक्यता कमी आहे अर्थात, प्रत्येक रिस्क घेण्यासाठी तुम्हाला या वेळी विचार करावा लागेल अन्यथा तुम्हाला दिलेले धन परत मिळण्यात समस्या होऊ शकते. **शुभ दिनांक** :२४,२८.

### भविष्यासाठी योजना बनवा

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला याकालावधीत मिश्रित परिणाम प्राप्त होतील. तुमच्या संचार कौशल्यात आणि संबंधात विस्तार होईल आणि तुम्ही प्रकृती आणि जीवनात खूप काही शिकाल. काही नवीन मित्र ही भेटतील. सुरुवातीमध्ये तुम्ही भविष्य हेतू अनेक योजना बनवाल ज्यामध्ये तुम्हाला यश प्राप्ती होईल आणि लांब वेळेपासून आटकलेल्या तुमच्या अनेक इच्छेची पूर्ती होईल तसेच तुम्हाला आपल्या जीवनात प्रेम आणि रोमान्सचे स्वागत करण्यासाठी तयार राहिले पाहिजे. जर तुम्ही नात्यामध्ये आधीपासून आहे या वर्षी तुमच्या विवाहाची कामना ही पूर्ण होऊ शकते. **महिलांना :** यामध्ये जर तुम्ही प्रयत्न करत आहात तर, आपल्या प्रयत्नांना थोडे वाढावा आणि ईश्वर कृपा आणि त्यांच्या आशीर्वादाने तुम्ही यावेळी एक चांगला जीवनसाथी प्राप्त करण्यात यशस्वी व्हाल. या राशीतील लोकांची व्यावसायिक भागीदारीच्या प्रभावाने बराच होईल तथापि, कुणी इतर व्यक्ती सोबत आपल्या वित्तीय संसाधनांना जोडण्याच्या आधी तुम्हाला बराच स्टडी केला पाहिजे. **शुभ दिनांक** : २५,२६.

### नवीन संधी प्राप्त होईल

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला यावेळी मिश्रित परिणाम प्राप्त होतील. तुम्हाला या कालावधीत काही नवीन संधीची प्राप्ती होईल आणि त्या संधींना आपल्या पक्षात मोडण्यासाठी तुमच्या जवळ पूर्ण ऊर्जा आणि सहनशक्ती ही असेल. तुम्ही जे कुठले काम करण्यास घ्याल त्यात तुम्हाला यश मिळेल आणि सुचारू रूपात तुमचे सर्व उद्यम चालत राहतील. याकालावधीत सुरवातीमध्ये या राशीला सुरवातीमध्ये सर्वात आधी. या राशिच्या अनुसार यावेळी तुम्ही लहान दूरची यात्रा अधिक कराल आणि या यात्रेपासून तुम्हाला लाभ होईल. सुरवातीमध्ये तुम्ही तीर्थ यात्रेवर जाऊ शकतात. याच्या व्यतिरिक्त समाजसेवेने जोडलेल्या कामानिमित्ताने ही काही यात्रा करू शकतात. मध्यानंतर तुमचे विदेश यात्रेचे चांगले योग बनतील. **महिलांना :** यावेळी बऱ्याच लांब वेळेपासून आटकलेली तुमच्या अनेक मनोकामना पूर्ण होतील यामुळे तुमचे मनोबल ही वाढेल. तुम्ही घर बनवण्यात अथवा प्रॉपर्टी खरेदी करण्यासाठी लोन घेऊ शकतात. तुम्ही अनेक विषयात रुची घ्याल आणि त्यांच्या बाबतीत जाणण्याची इच्छा ठेवाल. **शुभ दिनांक** : २७,२८

### आव्हानांचा सामना कराल

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आत्ता तुम्ही या दिशेमध्ये प्रयत्नात राहून भरपूर फायदा उचलण्यास तयार व्हा. जर तुम्ही नोकरी करतात तर, तुम्हाला मनासारखे स्थानांतरण मिळू शकते. जर तुम्ही आपल्या घरापासून दूर राहून नोकरी करतात तर, यावेळी तुम्ही त्यांना घराजवळ येऊ शकतात. जर तुम्ही काही व्यवसाय करतात तर, त्यावेळेत तुम्हाला अनेक यात्रेवर जावे लागेल जे तुमच्या व्यावसायिक संबंधांना मजबूत बनवाल. जर तुम्ही कुठल्या रचनात्मक कार्यात लागलेले आहे तर, हे सर्व तुमचे आहे. अनुसार यावेळी तुम्हाला काही लहान-मोठी समस्या आणि बाधेचा ही सामना करावा लागेल आणि काही कठीण समस्येतून जावे लागेल. तुम्ही बरेच उत्साहात राहाल. **महिलांना :** आपल्या ऊर्जेच्या बळावर प्रत्येक आव्हानांचा सामना कराल आणि त्यावर यश प्राप्त कराल परंतु, तुम्हाला लक्ष दिले पाहिजे की, अत्याधिक आवेगाला पूर्ण करण्यासाठी तुमच्या आसपासचे लोक प्रभावित होतील म्हणून, धैर्य पूर्वक काम करा. काही कठीण कार्यांना तुम्हाला पूर्ण करावे लागेल यामुळे तुम्हाला जीवनात पुढे जाण्याचे मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळेल. **शुभ दिनांक** : २३,२९

### कामाचे कौतुक होईल

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही स्थान परिवर्तनाचा अनुभव कराल. अर्थात काही लोकांची ट्रांसफर होईल आणि काही लोकांना नोकरीमध्ये बदलात यश प्राप्त होईल. जर तुम्ही व्यवसाय करतात तर, प्रगती प्राप्त कराल. सुरुवातीमध्ये बरेच मजबूत संकेत देतील. तुम्हाला आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सहयोग मिळेल. तुम्ही आपल्या कार्य कौशल्याचे परिचय द्याल. तुम्हाला आपल्या कार्य क्षेत्रात बऱ्याच कामासाठी तुमचे कौतुक होईल याच्या व्यतिरिक्त जर तुम्ही मोठ्या कंपनी सोबत काम करत आहे तर, तुमचे प्रदर्शन तुम्हाला पुढे घेऊन जाईल याराशीसाठी आर्थिक दृष्टिकोनाने चांगले आहे कारण, या वेळेत धन आवक लागोपाठ कायम राहिल्याने तुम्हाला आपल्या हातामध्ये धन आगमन वाटेल आणि तुमचे आर्थिक जीवन उन्नत होईल. **महिलांना :** यावेळी तुम्ही नवीन वाहन खरेदी करू शकतात. बऱ्याच वेळेपासून तुमचे धन आटकलेले असेल आणि त्याला त्याला मिळवण्यात तुम्हाला समस्या येत असेल तर, तुम्हाला ते धन यावेळी परत प्राप्त होऊ शकते. व्यवसायात गुंतवणूक करण्यासाठी हे वर्ष बरेच लाभदायक आहे. याच्या व्यतिरिक्त तुम्हाला अचानक नफा प्राप्त होऊ शकतो. **शुभ दिनांक** : २४,२५

### धन अर्जित कराल

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला काही कलात्मक अभिरुची मध्ये अधिक वेळ लावू शकतात. हा कालावधी तुमच्यासाठी उत्तम सिद्ध होईल कारण, या वेळी तुम्ही आपल्या क्षेत्रात स्थापित होण्याची अपेक्षा ठेऊ शकतात जिथे एकीकडे तुम्ही अधिकात अधिक लाभ प्राप्त करण्याचा प्रयत्न कराल तेच ग्रहांची स्थिती अत्याधिक खर्चाकडे इशारा करते म्हणून, यावेळी तुम्हाला आपले वित्तीय प्रबंधन खूप विचार पूर्वक करावे लागेल आणि पैशाची देवाण घेवाणीत आधी पूर्ण विचार करणे उत्तम असेल. बऱ्याच वेळा तुम्हाला असे वाटेल की, विना प्रयत्नाने ही तुमचे धन व्यय झाले यापासून वाचण्यासाठी तुम्हाला एक चांगले बजेट बनवण्याची योजना केली पाहिजे. त्यावर अंमलबजावणी ही नक्कीच करा अन्यथा तुम्ही आर्थिक समस्यांना सामोरे जाऊ शकतात. सुरुवातीपासून महिन्याच्या शेवटपर्यंत आणि नंतर विशेष रूपात तुमच्या जवळ पैशांचा चांगला स्रोत असेल आणि तुम्ही चांगले धन अर्जित करू शकाल. **महिलांना :** तुम्हाला आपल्या भाग्याची साथ मिळेल तसेच काही लोकांना वारसा किंवा पैतृक संपत्ती प्राप्त होण्याची शक्यता दिसत आहे. या कालावधीत तुम्हाला धन कमावण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल. **शुभ दिनांक** :२४,२६

### मित्रांचे सहकार्य मिळेल

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला हे शक्यतेचे दिवस आहे आणि तुमच्यावर ते सामर्थ्य आहे की, तुम्ही आपल्या बळावर कठीणातील कठीण लक्ष्य मिळवू शकतात. जर आपल्यावर काही लांब वेळेपासून कर्ज चालू असेल तर, यावेळी तुमच्याकडून पूर्णपणे चुकवण्यात यशस्वी व्हाल आणि निश्वास सोडाल. भाऊ-बहिणींसोबत उत्तम संबंध कायम ठेवा आणि कुठला ही वाद वाढू देऊ नका. लक्षात ठेवा भाऊ बहिणींच्या मदतीने तुम्ही पुढे जाऊ शकाल. तुम्हाला मित्रांचे सहयोग प्राप्त होईल जे तुम्हाला सकारात्मक विचारांसोबत पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करेल. तुमच्या कौटुंबिक जीवनासाठी बरेच शुभ राहण्याची शक्यता आहे. कुटुंबात परस्पर ताळमेळ मजबूत होईल. **महिलांना :** एकमेकांच्या मदतीने आपण कौटुंबिकरूपात संपन्नता प्राप्त कराल तसेच एकमेकांच्या प्रति मानसन्मान मध्ये वृद्धी ही होईल. सुरुवातीमध्ये कुटुंबात सुख आणि शांती तसेच सद्भावनेचे वातावरण राहील आणि तुम्हाला ही आपल्या कुटुंबाचे पूर्ण सहयोग मिळेल तसेच तुम्ही स्वयं आपल्या कुटुंबाच्या प्रति सर्व कर्तव्यांचे निर्वाहन चांगल्या प्रकारे करतील. **शुभ दिनांक** : २६,२७

### समस्यांतून मुक्ती मिळेल

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात जर तुम्ही आपल्या व्यापार किंवा कुठल्या अन्य कामासाठी कुटुंबापासून दूर राहतात तर, बऱ्याच प्रमाणात तुम्हाला या समस्यांतून मुक्ती मिळू शकते. तुम्ही आपल्या वाणीच्या बलावर लोकांना आपले बनवाल आणि त्यांच्याशी मनातील मळ दूर करून शांती आणि सद्भाव स्थापित करू शकतात. या राशीतील जातकांना यावेळी काही आनंद आणि काही आव्हाने दोघांना सोबत ठेऊन पुढे जावे लागेल. जर तुम्ही प्रत्येक आव्हानांचा हिंमतीने सामना करण्यात यशस्वी झाले तर, तुमच्यासाठी हा कालावधी उत्तम होण्यास कोणीच रोकु शकणार नाही. प्रभाव मुख्य रूपात तुमच्या कार्य क्षेत्रात, तुमच्या कौटुंबिक जीवनात, तुमच्या वाणी, तुमच्या स्वास्थ्य आणि संतानवर पडेल. **महिलांना :** मनाचाप्रभाव विशेष रूपात तुमच्या स्वास्थ्य आणि खर्चांवर पडेल आणि तुमच्या खर्चात अप्रत्यक्षित रूपातवृद्धी होऊ शकते. एक ग्रह स्वास्थ्य कारणाने तुम्हाला चिंतीत करू शकते परंतु, जर तुम्हाला विदेशात जाण्याची इच्छा आहे तर, तुमची इच्छा पूर्ण होऊ शकते. विशेषतः गल्फकंट्रीजमध्ये तुम्ही आरामात जाऊ शकाल. **शुभ दिनांक** :२५,२९.

# रब्बीतील कडधान्य पिकांना बाधा

- उन्हाळ्यामध्ये गावठी कडधान्यांना मागणी
- पाण्यामुळे बी कुजण्याची शक्यता



। महाड । प्रतिनिधी ।

अवकाळी पावसाने रायगड जिल्ह्यातील भात शेती उध्दवस्त झाली आहे. रब्बी हंगामात केल्या जाणाऱ्या कडधान्य शेतीलाही यामुळे बाधा निर्माण झाल्याने जिल्ह्यातील शेतकरी कोलमडला आहे. भात पिक नुकसानीमध्ये अडकलेल्या शेतकऱ्याला आता कडधान्ये शेती नुकसानीला देखील सामोरे जावे लागणार आहे. जिल्ह्यामध्ये यावर्षी ८६ हजार हेक्टर क्षेत्रावर भात पिकाची लागवड करण्यात आली आहे. खरीप हंगामातील भात पिकानंतर येथील शेतकरी वाल, पावटा, मूग, मटकी, हरभरा अशा कडधान्यां बरोबरच भुईमूग शेतीही मोठ्या प्रमाणात करत असतो. गेल्या काही वर्षांमध्ये जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कडधान्य व भुईमूग सारख्या नगदी पिकाने उत्पन्नाचा हातभार लावलेला आहे.

महाड व गोरेगाव परिसरातील वाल, पावटा तसेच पोलादपूरमधील मटकी, जिल्ह्यातील इतर ठिकाणी होणारी मूग व चवळी अशी कडधान्ये इतर भागांमध्ये आवर्जून विकली जातात. याशिवाय दरवर्षी उन्हाळ्यामध्ये गावठी कडधान्यांची मोठ्या प्रमाणात बेगमी केली जाते. परंतु आता या नगदी पिकांच्या लागवडीवर ही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अवेळी पडणाऱ्या या पावसाने परत जाण्याचे नाव न घेतल्याने रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये भात शेतीला मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी कापलेले पीक भिजून गेले तर काही ठिकाणी शेतकऱ्यांनी पावसाच्या भीतीने भात पीक न कापल्याने येथील पिकांमध्ये दाणा कुजून गेलेला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याचे फारच मोठे नुकसान झालेले आहे. शेतीचे पंचनामे देखील सुरु झाले असलेले तरी त्यातून फारशी नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या पदरात पडणार नाही. पावसाने परतीची वाट न धरल्याने आता या पिकांची लागवड कशी करायची हा प्रश्न शेतकऱ्यांपूढे उभा राहिलेला आहे.

भात कापणी झाल्या झाल्या शेतकरी त्याच शेतामध्ये कडधान्य लागवड करत असतात. परंतु काही ठिकाणी भात शेतात आहे तर काही ठिकाणी जमीन अजूनही ओली असल्याने कडधान्य लागवड करणे अवघड होऊन बसले आहे. कारण कडधान्य बी कुजण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जिल्ह्यात १४ हजार क्षेत्रावर कडधान्य लागवड जिल्ह्यात सुमारे १४ हजार क्षेत्रावर कडधान्य लागवड केली जाते. कडधान्य लागवड मात्र जिल्ह्यातील सर्वच भागांमध्ये थोड्या प्रमाणात केली जाते. आता शेत जमीन ओली असल्याने कडधान्य व भुईमुगाची लागवड कशी करायची हा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे भात पिकाचा पाठोपाठ जाता शेतकऱ्याला कडधान्ये आणि भुईमूग पिकाच्या आर्थिक उत्पन्नाचा फटका बसणार आहे.

## औषध सुरक्षिततानिमित्त जनजागृती

**पनवेल** : महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या औषध माहिती केंद्राच्या माध्यमातून राज्यभर मेडी सेफ्टी विक उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षीची मुख्य संकल्पना रिपोर्टिंगमुळे औषधे अधिक सुरक्षित होतात. अशी होती त्यानुसार जनजागृती आणि प्रबोधन करण्यात आले. पनवेल परिसरात कामोठे आणि खांदा कॉलनी अशा प्रकारचे चर्चासत्र घेण्यात आले. त्याचबरोबर महाराष्ट्रभर जनजागृती करण्यात आली. उपक्रमामध्ये गणेश बंगाळे, जगन्नाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली औषध सुरक्षिततेचे संदेश सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा विशेष प्रयत्न केला गेला.

या मोहिमेअंतर्गत ५० हून अधिक फार्मसी प्राध्यापक आणि समन्वयक यांना आरोग्य क्षेत्राबाहेरील संस्था, महाविद्यालये, उद्याने, बसस्थानके, जिम, ग्रामपंचायती अशा विविध ठिकाणी जनजागृती सत्रे घेण्याचे आवाहन करण्यात आले. राज्यभर तब्बल ४१० सत्रे घेण्यात आली. यामध्ये औषधांचा सुरक्षित वापर, दुष्परिणाम, अहवाल नोंदविण्याची पद्धत, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी फार्मासिस्टची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील नागरिकांना औषधांचा तर्कसंगत फार्मासिस्टचा सक्रीय सहभाग वाढवणे आणि औषध सुरक्षा संस्कृतीला बळकट करणे हे उद्दिष्ट साध्य झाले.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सर्वप्रकारचे विवाह/आजार, संतानप्राप्ती/सोनेतारणावर बिनव्याजी कर्ज/शेतकरी/निराधार विधवा महिलांना दरमहा ३०००/-ठेवीदारांना दरमहा ८,०००/- घरबसल्या कायमस्वरुपी लाखो कमविण्यासाठी डॉ. नथुराम धायाशेठ मोकल, इंटरप्रायझेस शिहू (पोयनाड-नागोठणा) रायगड ४०२१०६/८२६३८९०४२३(वेळ ठरवूनच)
- SALE OF BAGAYATI WADI. 13 GUNTHE, @26 Lakh per Guntha, 200 Mtr. (meter) from. sea Beach. Village-THAL, Gunjal Ali, Alibag, M. 8779805353
- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- Vacancy for, office staff ,for office in Alibag Attractive salary Call 9923750549
- गिरीष एंटरप्रायझेस येथे ऑफीस कामासाठी मुलगी पाहिजे. शैक्षणिक पात्रता : १२ वी उत्तीर्ण, टु व्हीलर चालवता येणे आवश्यक. स्थानिक उमेदवारास प्राधान्य. संपर्क -८२३७३१६२१८. ऑफीस वेळ :- ९-३० ते ६-३०
- कन्स्ट्रक्शन ऑफीस अलिबाग येथे ३ महिन्याकरिता अकाऊंटच काम करण्यासाठी तात्पुरती मुलगी पाहिजे. संपर्क-८८०६७५९०९०
- अंश एन्टरप्रायजेस सोलर ऑफीसमध्ये ऑफीस कामाकरिता १ मुलगी आणि १ मुलगा पाहिजे. शिक्षण कमीत कमी १२ वी पास किंवा पदवीधर पाहिजे. मो. नं. ८४८३९९९२२९
- Driver पाहिजे ८०८७५७२७४७
- नामांकित खाद्य तेल कंपनीत सेल्समन आवश्यकता आहे. स्वत:ची टूव्हीलर आवश्यक मोबाईल - ९४२२६९११४७
- पाहिजेत- अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब्स करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी - १५०००, २००००, २५००० + सुपर इन्सेंटीव्ह. विविध शाखांसाठी Home Revise Education Pvt.Ltd. या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counselors / Sales Executive-20, Franchise-20, Telecaller-03. **Contact** : 8419940004 / 9372071769

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९० / २२२७६१


# पाणोसे पुलाजवळ कॉईलचा ट्रेलर पलटी



। माणगाव । प्रतिनिधी ।

पुणे दिघी महामार्गावर गेले काही दिवस सतत विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातून येणारा जाणाऱ्या ट्रेलर कॉईलचे अपघात होत आहेत. अशाच एक ट्रेलर कॉईलचा अपघात निजामपूर रोडवर पाणोसे पुलाजवळ झाला असून नागरिकांच्या प्रसंगवधानाने चालकाचे प्राण वाचले आहेत.

सविस्तर वृत्त असे की, (दि.२१) नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३० वा. च्या सुमारास निजापमूर कडून माणगाव दिशेने येणाऱ्या ट्रेलर क्रमांक एम एच ४६ सी यू ३८९१ चा पाणोसे पुलाजवळील वळणावर अपघात झाला. अपघातात ट्रेलर पूर्णतः रस्त्याच्या एक बाजूला पलटी झाला होता. ट्रॅक चालक कॅबिनचा पूर्णपणे चक्काचूर झाल्याने ट्रॅक चालक केबिन खाली अडकून पडला होता. चालक जीवाच्या आकांताने मला वाचवा असे ओरडत होता. नागरिकांनी प्रसंगावधान दाखवत जेसीबी व कटरच्या सहाय्याने ट्रॅक चालकाचा बाहेर काढण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. नागरिक व पोलिसांच्या अथक प्रयत्नाने २ तासांनी ट्रॅक चालकाला सुखरूप बाहेर काढण्यात आले असून पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे पाठविण्यात आले आहे.

## गणेश काळे यांना पितृशोक



**माणगाव** : माणगावचे रहिवाशी तथा रोटरी क्लब ऑफ माणगाव माजी अध्यक्ष गणेश काळे यांचे पिताश्री अशोक काळे यांचे रविवार (दि.१६) नोव्हेंबर रोजी त्यांच्या राहते घरी निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय - ८२ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून, जावई, पाच नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने काळे कुटुंबियांबरोबरच मित्रपरिवार यांच्यावर शोककळा पसरली आहे. काळे त्यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात ४० वर्ष नोकरी केली. सन १९९५ ते २००२ याकालावधीत त्यांनी माणगाव एसटी आगारात कंट्रोलर म्हणून काम करताना प्रवाशांना चांगली सेवा दिली. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार दि.२५ नोव्हेंबर रोजी तर उत्तरकार्य विधी तेरावे शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर २०२५ रोजी राहते घरी पोलीस ठाणे जवळ माणगाव येथे होणार असल्याचे त्यांचे पुत्र गणेश काळे यांनी सांगितले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे- जिते ता.कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | हिस्सा नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १) सुषमा शाम गोपने<br>२) शाम सिद्धराम गोपने | १०६ | २ | २२९ चौ.मी. | २२.९० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

# फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून चिकित्सा शिबीर




। खांब । प्रतिनिधी ।

दीपक नायट्राईट कंपनी, धाटाव आणि दीपक फाऊंडेशन, रोहा यांच्या माध्यमातून फिरता दवाखाना प्रकल्पाद्वारे तालुक्यातील भिसे, भातसई, देवकान्हे आणि तळाघर आदी ठिकाणी मोफत अस्थिरोग आणि नेत्र तपासणी शिबिर संपन्न करण्यात आले.

या शिबिरांमध्ये ५३४ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. तर १६० रुग्णांचे एक्स-रे करून त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ३०० रुग्णांना मोफत चष्मा वाटप करण्यात आले. २० ज्येष्ठ नागरिकांना चालण्यासाठी सहाय्य करणाऱ्या काठीचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे कमरेचे दुखणे टाळण्यासाठी बेल्ट आणि हात-पाय दुखू नये म्हणून बँडेजही वाटप करण्यात आले.

या शिबिरासाठी अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. आशिष मिश्रा, अजय आवाडे, प्रियंका धनावडे, उत्कर्षा मस्के, अश्विनी म्हसकर, अंकिता ठाकूर, मारुती निगडे तसेच सर्व समुदाय कार्यकर्ते उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य वाटप

**तळा** : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तसेच ज्येष्ठ नागरिक संघटनेचे तळा तालुका अध्यक्ष मंगेश प्रभाकर देशमुख यांचा ७२ वा वाढदिवस संस्थेच्या सभागृहात साजरा करण्यात आला. शिक्षण, क्रीडा, सामाजिक बांधिलकी आणि ज्येष्ठ नागरिक चळवळीमध्ये सातत्यपूर्ण योगदान देणाऱ्या देशमुख यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त मारुती शिर्के, अध्यक्ष चंद्रकांत रोडे, गो. म. वेदक विद्यामंदिरचे चेअरमन महेंद्र कजबजे, मुख्याध्यापक दिलीप ढाकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक सिसील बरनार्ड परेरा, जेनिव्हीव्ह सिसील परेरा, रा. टेरेसा अपार्टमेंट, १०४/अे, बि-विंग, लेपोरा स्ट्रीट भाईदर मुंबई यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेली आहेत. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे गोंधळपाडा, ता.अलिबाग जि.रायगड येथील स.नं.९५, पो.नं.४ क्षेत्र ०-४४-०० हे.आर या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या बेवूड्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, गोंधळपाडा, पो.वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं.२०१, डि-विंग, क्षेत्र ५०१ चौ.फुट, (ग्रामपंचायत वेश्वी, मालमत्ता क्रमांक ८०५ डी २०१) ही मिळकत

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्युपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २३.११.२०२५

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९८९००७९३०२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे वरसोली ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली ता.अलिबाग | ४२/३/२ | जिरायत ०-५८-४०<br>पो.ख. ०-०१-६०<br>एकुण ०-६०-०० | ३.५४ |

वर वर्णन जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक १) अंजली अशोक केळुस्कर, २) चारू संतोष बादल, ३) मिलन मनोज पुजारी, ४) सुलोचना मधुकर गावडे, ५) संतोष मधुकर गावडे, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे, असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक - २२/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७९८५२८

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. चिंचपागल्ली पो.नागाव
ता.अलिबाग, जि.रायगड,

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक सौ.सानिका संजय चौलकर यांच्यामध्ये बोलणी करण्यात आलेली आहेत. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग. | ९५ | ०-१६-२० | ३.२५ |

वर वर्णन केलेल्या मिळकती पैकी सौ. सानिका संजय चौलकर यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०-०७-३० हे. आर. आकार १.४९ रू. पैसे ही मिळकत व मौजे नागाव ग्रामपंचायत मिळकत घर क्रमांक २०३८, १०X१० फुट ही घर मिळकत या मिळकती नोटीसचा विषय आहे.

संदर्भित मिळकत पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १४ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २३/११/२०२५

**ॲड. किशोर म. हजारे**
बी. कॉम. एल. एल. बी.
००१, वैद्यबाग को. ऑप
हौ. सो.कामत आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची जमिन मिळकत १. श्री. हरिभाऊ गणपत कर्णेकर, २. श्री. बळीराम गणपत कर्णेकर, ३. सौ.नंदा चंद्रकांत धसाडे, रा. मु. वनवली, पो. नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे व त्या अनुषंगाने जमीन मालक व आमचे अशिल यांच्यामध्ये दि.२०/११/२०२५ रोजी साठेकरार झालेला आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भादाणे, ता.अलिबाग | ९५/२ | क्षेत्र ०-४४-९०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-४४-९० | ३.४२ |

वर नमुद सामाईक मिळकतीमधील १. श्री.हरिभाऊ गणपत कर्णेकर, २. श्री.बळीराम गणपत कर्णेकर, ३. सौ.नंदा चंद्रकांत धसाडे यांच्या हिश्श्याचे क्षेत्र ०-२८-९० हे. आर. ही जमिन मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २१/११/२०२५

सही /-
**ॲड. अभिजीत बाळाराम पाटील**
जिल्हा सत्र न्यायालय अलिबाग-रायगड
मो. नं. ७३९११९६०३०

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे भोईघर, ता. मुरुड, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भोईघर ता.मुरूड | १६ | जिरायत ०-०५-६०<br>वरकस ०-२७-००<br>पो.ख. क्षेत्र ०-०१-४०<br>एकुण क्षेत्र ०-३४-०० | ०.७९/- |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती हया विद्यमान मालक १) अ. लतीफ अ. कादिर वरवंडे २) नजमुनिसा अ. लतीफ वरवंडे, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक - २२/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-कोल्हारे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | हिस्सा नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| जीवन वासुदेव पाटगावकर | ७८ | २० | ३३४ चौ.मी. | ३३.४० |
| | ७८ | २१ | ३१९ चौ.मी. | ३१.९० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विकी, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (०७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-कवठेवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री.नितीन दामू मते उर्फ पाटील यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| १० | ६अ | २-५०-० | १-५० |

वरील जमिन मिळकतीमध्ये जमिन मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-५०-० हे.आर.पॉ ऐवढे असून त्यापैकी जमिन मालक विकत देत असलेले क्षेत्र ०-२०-० हे.आर.पॉ

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३/११/२०२५

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९९४१८५२


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : शैक्षणिक तसंच संशोधन क्षेत्रात अनुकूलता राहील. अपेक्षित भेटी लाभदायक ठरतील. चिंता नसावी.
- **वृषभ** : अपेक्षेपेक्षा अधिक मेहनत करावी लागेल. द्विधा मनस्थिती राहील. शब्दांचा वापर विचारानं करावा.
- **मिथुन** : परिश्रमाचं योग्य फळ प्राप्त होईल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. आध्यात्मिक कार्याकडे ओढा राहील.
- **कर्क** : भलतं साहस करू नका. दूरच्या पाहुण्यांच्या भेटी होतील. व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल.
- **सिंह** : भाग्योदयाचा कालावधी आहे. अप्रत्यक्ष लाभ होणार आहे. विवाहाच्या बोलण्याबाबत विचार करावा.
- **कन्या** : उत्पन्नापेक्षा खर्चाचं प्रमाण वाढेल. कोणाच्याही आश्वासनांना भुलू नका. वरिष्ठांची मर्जी राखावी.
- **तूळ** : मुलांची चिंता राहील. शारीरिक दुखापत वा आर्थिक नुकसान संभवते. प्रवासात विशेष काळजी घ्या.
- **वृश्चिक** : आर्थिक व्यवहाराबाबत घाई करू नका. शारीरिक त्रास संभवतो. नवे करार लांबणीवर पडतील.
- **धनु** : शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. वैवाहिक जीवनात समाधान लाभेल. वाहन जपून वापरावं.
- **मकर** : जवळच्या व्यक्तिशी मतभेद संभवतात. स्वाभिमान दुखावला जाईल. पुरेसा संयम बाळगायला हवं.
- **कुंभ** : वाद-विवादापासून दूर रहावं. व्यवसायातील अडचणी दूर होतील. खर्च वाढला तरी प्राप्तीही वाढेल.
- **मीन** : प्रतिष्ठा वाढीस लागेल. मान-सन्मानाचे योग आहेत. जुनी येणी पुन्हा प्रलंबित राहू शकतात.

## सौंदर्यसाधना — केसांसाठी नैसर्गिक सनस्क्रीन

तीव्र उन्हामुळे केसही खराब होतात. म्हणूनच केसांसाठीची सनस्क्रीनही बाजारात आली आहेत. हेअर सनस्क्रीनवाले शँपूही बाजारात आले आहेत. अशा उत्पादनांमुळे सूर्याचा अतिनील किरणांपासून केसांना सुरक्षा मिळते. केसांना मूळ रंग टिकून राहतो. तुम्हाला बाजारात मिळणारा सनस्क्रीन शँपू वापरायचा नसेल तर काही नैसर्गिक उपाय करता येतील. बरेच नैसर्गिक घटक केसांसाठी सनस्क्रीन म्हणून काम करतात. त्याविषयी...

* कोरफडीत सूर्याच्या अतिनील किरणांचा प्रभाव कमी करण्याची क्षमता असते. तुम्ही सतत उन्हात जात असाल तर केसांना कोरफडीच्या गराने नियमित मसाज करा. ताज्या कोरफडीचा गर असेल तर अधिक उत्तम. काही वेळानंतर केस थंड पाण्याने धुवून घ्या. कोरफडीच्या गरामुळे केसांना ओलावाही मिळेल.

* चहाचं पाणी हा अजून एक उपयुक्त घटक आहे. पाण्यात थोडा चहा घालून उकळून घ्या. थंड होऊ द्या. पाणी गाळून घ्या. आता या पाण्याने केस धुवा. काही वेळ केसांना शॉवर कॅप घालून ठेवा. साधारण १५ ते २० मिनिटांनी केस साध्या पाण्याने धुवा. (क्रमश:)

## दिनविशेष — २३ नोव्हेंबर

१९२६ : अध्यात्मिक गुरु सत्य साईबाबा यांचा जन्म.
१९५५ : युनायटेड किंग्डमने कोकोस द्वीपसमूह ऑस्ट्रेलियाच्या हवाली केला.
२००० : प्रख्यात चित्रकार बाबुराव सडवेलकर यांचे निधन.
२०१३ : शारदा चिटफंड गैरव्यवहारप्रकरणी पोलिसांनी तृणमूल काँग्रेसचे निलंबित खासदार कुणाल घोष यांना अटक केली.
२०१३ : धनुष्य क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी.
२०१५: माजी मंत्री छगन भुजबळ यांची ११० कोटींची मालमत्ता जप्त.

## न्यू टेक — रंजक ईसीजी पॅच

जगभरात हृदयविकाराचं प्रमाण वाढत आहे. आयुष्यात ताणतणाव वाढले आहेत. लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकालाच ताण येतो. मुलांना अभ्यासाचा, परीक्षेचा ताण असतो. हा ताण पटकन लक्षात येत नाही. याचा त्रास नंतर जाणवू लागतो. जगभरातच ताणतणावांची वाढती समस्या पाहता तंत्रज्ञानाच्या मदतीने अशा रूग्णांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ताणतणावाच्या रूग्णांसाठी ईसीजी पॅच तयार करण्यात आला आहे. हा पॅच छातीवर बसवण्यात येतो. त्यानंतर हृदयाची धडधड मोजून रूग्णाला ताण आहे किंवा नाही हे हा पॅच दाखवू शकतो. व्हायटल स्काउट असं या पॅचचं नाव आहे. आपल्या आरोग्याबाबतची माहिती स्मार्टफोनवर मिळू शकेल. हा पॅच स्मार्टफोनला कनेक्ट करता येईल. एकदा चार्ज केल्यानंतर हा पॅच ७२ तासांपर्यंत काम करेल. रूग्णाच्या आरोग्याबाबत माहिती जाणून घेण्यासाठी हा पॅच किमान ४८ तासांसाठी छातीवर चिकटवून ठेवावा लागतो. या पॅचमध्ये ईसीजी पॅचर्स बसवण्यात आले आहेत. हे पॅचर्स हृदयावर लक्ष ठेऊन असतात. हृदयाच्या दोन धडधडींमधल्या कालावधीवरून ताणाचं प्रमाण जाणून घेता येतं.

## आरोग्यमंत्र — गुडघेदुखी होईल कमी

गुडघेदुखीमुळे त्रस्त असणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. यावर तज्ज्ञांकडून उपचार घेतले जातातच, पण काही घरगुती उपायांनीही गुडखेदुखीवर उत्तम परिणाम होऊ शकतो.

* पारिजातची पांढऱ्या रंगाची फुलं रात्री उमलतात आणि सकाळी गळून जातात. या झाडाची सहा ते सात पानं वाटून पेस्ट तयार करा आणि एक ग्लास पाण्यात उकळवा. पाणी उकळून अर्धे राहील तेव्हा गॅस बंद करा. हे पाणी कोमट करून दररोज रिकाम्या पोटी प्यावं. यामुळे गुडघ्यातील वेदनेपासून आराम मिळेल. हा एक प्रभावी उपाय आहे.



* कण्हेरीची पानं उकळून बारीक पेस्ट करा आणि तिळाच्या तेलात मिसळून त्यानं गुडघ्यावर मसाज करा. असं केल्यामुळे वेदनेपासून सुटका मिळेल.

* गुडघ्यामध्ये वेदना होत असतील तर रोज रात्री दोन चमचे मेथ्या एक ग्लास पाण्यात भिजत ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी मेथ्या चावून खात हे पाणी प्या. यामुळे तुम्हाला कधीच गुडघे दुखण्याचा त्रास होणार नाही.

* एक ग्लास दुधात चार-पाच लसणाच्या काड्या टाकून उकळवा आणि कोमट झाल्यावर हे पाणी प्या. यामुळेही गुदाघादुखीमध्ये आराम मिळतो. दररोज थोडा नारळ खाणं हाही एक चांगला उपाय आहे.

## पंचांग

**रविवार, २३ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष शु. ३, चंद्रराशी : धनु, नक्षत्र : मूळ, योग : धृति, सूर्योदय ६.५३, सूर्यास्त ५.५७

## फॉरवर्डस

**मददगार थें हम उनके ज़ब वो ग़रीब थें...**

**मिन्नतें करवा रहें अब वों ज़ब से ख़ुदा बनें हैं...!**

## फॅशन पॅशन

* कॅज्युअल पार्टीचा मूड असेल तर फुलाफुलांचा शर्ट आणि पँट घालता येईल. त्यावर साजेशी हॅट घाला. न्यू ईयर पार्टीसाठी हा लूक बेस्ट आहे.

* इंडो-वेस्टर्नचा पर्याय तुमच्याकडे आहे. हा लूक कॅरी करण्यासाठी हटके रंग निवडा. सण असो वा लग्न, इंडो वेस्टर्न लूक कुठेही चालून जातो. रस्ट ब्राउनसोबत गोल्डन शेड असलेलं फॉर्मल जॅकेट घ्या. लाँग लाईन शर्ट किंवा कुर्त्यावर ते कॅरी करा.

## करिअरवाटा — ऑक्शनरची वेधक कारकिर्द

आजकाल आव्हानात्मक क्षेत्रात कारकिर्द करण्याकडील तरूणाईचा ओढा वाढू लागला आहे. अशांसाठी ऑक्शनर हा उत्तम पर्याय आहे. ऑक्शनरच्या वाट्याला ऑफिस मॅनेजर, पब्लिक रिलेशन मॅनेजर, अकाऊंटंट, को-ऑर्डिनेटर अशा वेगवेगळ्या भूमिका येतात. त्यामुळे या क्षेत्रात कारकिर्द करणाऱ्यांसाठी प्रत्येक दिवस वेगळा आणि नवा असतो. त्यामुळे कामाच्या स्वरूपानुसार



वेळेतही बदल होत असतो. या संदर्भात आपल्या देशात डिग्री किंवा डिप्लोमाची सुविधा नाही. परंतु म्युझियम कल्चरल हेरिटेजशी संबंधित ट्रेनिंग प्रोग्राम, शॉर्ट टर्म कोर्स यामध्ये इंटर्नशिप करता येते. अँटीक ऑक्शनर बनण्याची इच्छा असेल तर व्हिजुअल आर्टसमध्ये पदवी किंवा पदविका असेल तरी चालते. ऑक्शनर म्हणून कारकिर्द करू इच्छिणाऱ्यांसाठी चॅरिटी फर्मस, बॅंक, म्युझियम, रियल इस्टेट फर्म यामध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. एंटरप्रियोर म्हणून शिक्षण घेण्याबरोबर कमाई करण्याची संधीही उपलब्ध होऊ शकते. या क्षेत्रात अनुभवानुसार भरभक्कम वेतनाच्या संधी आहेत. मात्र कामावर, व्यवसायावर मनापासून प्रेम करणाऱ्या आणि त्यासाठी आवश्यक त्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर मेहनतीची तयारी असणाऱ्यांना यश मिळू शकते. ग्राहकांशी उत्तम, दृढ संबंध प्रस्थापित करण्याची कला आणि उत्तम संवाद कौशल्य असणाऱ्यांसाठी ही चांगली संधी आहे.

## खेचाखेची — दुखवू नका

आयुष्यात त्या व्यक्तीला कधीच

दुखवू नका...

जी व्यक्ती तुम्हाला
.
.
.
वेळेवर तंबाखू देते...!


**- एक गायछाप प्रेमी...**

## वेगळं काही

चीनमधल्या शांघायमधल्या सोंगजियांग क्षेत्रात भूमीगत हॉटेलची निर्मिती करण्यात आली आहे. हे हॉटेल बांधण्यासाठी १२ वर्षांचा काळ लागला. हे १८ मजल्याचं हॉटेल असून त्याचे १६ मजले जमिनीच्या खाली आहेत. हे हॉटेल बांधण्यासाठी तब्बल २ हजार कोटी रूपयांचा खर्च आला. तर ५ हजार कर्मचारी राबले. या हॉटेलच्या सर्वात महागड्या खोलीत राहण्यासाठी १४ हजार डॉलर खर्च करावे लागतील. ब्रिटिश वास्तुरचनाकार मार्टिन जोकमॅन यांच्या मार्गदर्शनाखाली या हॉटेलची रचना करण्यात आली आहे. हॉटेलचे सर्वात खालचे दोन मजले तलावाच्या आत आहेत. त्यामुळे या मजल्यांवरच्या खोल्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना मस्त्यालयात राहत असल्यासारखं वाटेल.

## महिलायन — संसारापासून फारकत नको

मला लहानपणापासून समाजकार्याची आवड आहे. पण विसाव्या वर्षी लग्न होऊन आले त्या घरामध्ये या विचारांचा आदर करणारं कोणी नव्हतं. संकुचित आणि बाळबोध विचारांनी भारलेल्या या घरात काटकसरीत संसार करणं भाग पडलं. नाईलाजाने नोकरी करावी लागली. पतीची यथातथा साथ असताना दोन मुलांना मोठं केलं. आता ती स्वावलंबी झाली आहेत. असं असताना आता वयाच्या पन्नाशीत तरी मनाजोगं जगायला मिळावं अशी इच्छा आहे. काय करु? संसारातून बाजूला होत वेगळी राहू का? ही कृती योग्य ठरेल का?



- वयाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर, विशेषत: शारीरिकदुष्ट्या मोठ्या बदलाला सामोरं जाताना आत्तापर्यंत काहीच न मिळवल्याची भावना दाटून येणं, आयुष्याची संध्याकाळ जवळ येत असल्याची हूरहूर आणि स्वप्नांच्या अपूर्णतेचं दु:ख कुरवाळणं यामुळे विचित्र मानसिक कोंडी अनुभवायला मिळते. तुम्ही या कोंडीत अडकला आहात. पण निराश होऊ नका. अपूर्ण स्वप्नं पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ आहे हे लक्षात घ्या. त्यासाठी संसारापासून फारकत घेण्याची गरज नाही. हा कम्फर्ट झोन सोडला तर वेगळ्याच समस्या भेडसावू लागतील. त्यामुळे आधी कामाची सुरूवात करून नंतरच योग्य निर्णय घ्या.

## सुडोकू ३२


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ४ | ७ | | | | २ | १ | |
| | | | २ | ४ | ९ | | ५ | |
| | | ६ | १ | | ३ | | | ९ |
| | ९ | | | | ७ | | | ८ |
| | | | | | | | | |
| ६ | | | ५ | | | | ४ | |
| २ | | | ४ | | १ | ३ | | |
| | ५ | | ७ | ३ | ८ | | | |
| | ३ | ४ | | | | ८ | ९ | १ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ३१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५ | ६ | ७ | ८ | ३ | ४ | २ | ९ |
| ७ | ९ | ८ | ६ | २ | ४ | ५ | १ | ३ |
| ४ | ३ | २ | १ | ५ | ९ | ८ | ६ | ७ |
| ८ | ७ | ९ | ५ | ४ | ६ | १ | ३ | २ |
| ३ | २ | १ | ८ | ९ | ७ | ६ | ५ | ४ |
| ५ | ६ | ४ | ३ | १ | २ | ७ | ९ | ८ |
| २ | ८ | ५ | ९ | ७ | १ | ३ | ४ | ६ |
| ६ | ४ | ७ | २ | ३ | ५ | ९ | ८ | १ |
| ९ | १ | ३ | ४ | ६ | ८ | २ | ७ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक ३२



**आडवे शब्द :-**
१) एकमेकावर अवलंबून असणे
७) सांप्रत दिवस
९) सूर्याचे एक नाव
११) ढीग
१२) करपलेला भाग
१३) पालिकेतील लोकप्रतिनिधी
१५) देवाला निरांजनाने ओवाळताना म्हणावयाचे स्तुतीगीत
१६) ठोक! हाण!
१७) वस्त्र
१८) हावरटपणा
२०) माळ (हिं)
२१) भावाची पत्नी
२२) मोठी बहीण.
२३) आठवण
२४) धक्का, अनर्थ (हिं.)
२५) लेखणी
२७) वजन, बोजा
२८) निवासस्थान
३०) फुटकी कवडी
३३) श्रीकृष्णाचे एक नाव
३५) बोकड
३६) गूळ-साखरेचा रस
३७) उत्तराधिकारी
३८) दुलई
४०) तलाव
४१) प्राप्ती
४२) श्वासोच्छ्वास
४३) हाताचा तळवा
४६) शेवटच्या श्वासांचा आवाज
४७) एक रंग
४८) निरर्थक बडबड
४९) आकाश
५१) मालक
५२) पंकज
५३) आयुष्य, पाणी
५५) सुसंस्कृत
५७) टवाळकी करणारा
५८) पावसाची धार
६०) बातमीचे शीर्षक
६१) कावळा
६२) सरळ वासा
६३) गणपती

**उभे शब्द :-**
१) पराजय
२) द्रव पदार्थ
३) मीठ
४) खालतीच्या विरुद्ध
५) जंगली फुलांची माळ
६) शहर, गाव
७) हिंदी महासागरापासून हिमालयापर्यंत
८) सातू
१०)आकाशयान
१४) मिठी
१५) अफवा
१९) एक तारवाद्य
२०) आई (ग्रा.)
२१) चेहरा, मुख
२३) टोळीचा प्रमुख
२५) मनाचा ओढा
२६) भ्रमर
२७) हमाल
२९) जेवण
३१) चर्मासन
३२) व्यायाम
३४) पराग, मातीचा कण
३६) पर्जन्यकाळ
३९) परमेश्वर
४१) लघळपणा, पाल्हाळ
४४) चंद्र ४५) चटकन, त्वरित
४७) चिंता
४९) सुस्ती
५०) अंत:करण
५२) शिखराचे टोक
५४) वागणूक
५६) घसा, अन्नमार्ग
५७) एकाग्र नजर
५९) मस्ती, जोम.

(उत्तर उद्याच्या अंकात)


### मागील शब्दकोड्याचे उत्तर



**सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांची वर्णी लावण्याची संधी राजकीय पक्षांना मिळाली आहे. लोकसभा आणि विधानसभेची निवडणूक नेत्यांची असते. त्या जिंकण्यासाठी कार्यकर्त्यांची फौज लागते. ही फौज स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या मैदानातून तयार होत असते. त्यांना संधी देताना आता विविध पक्षांमध्ये वर्चस्वाची लढाई सुरु झाली आहे.**

प्रा. अशोक ढगे

# वर्चस्ववादाची लढाई



पाच-सात वर्षांनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. न्यायप्रविष्ट बाबीमुळे या निवडणुका लांबल्या होत्या. या काळात एक पिढी गारद झाली. आता निवडणूक होत असल्याने तरुण, महिलांना नेतृत्वाची संधी मिळणार आहे. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका जिंकून देणाऱ्या कार्यकर्त्यांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या माध्यमातून राज्याच्या सत्तेतील तीन प्रमुख राजकीय पक्षांनी २०२९ च्या विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. कार्यकर्त्यांची निवडणूक असली, तरी ती आता राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या नेत्यांनी निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. महाराष्ट्रात विरोधकांचे राजकीय अवकाश मर्यादित आहे. त्यातच महाविकास आघाडीतही बिघाडी होण्याच्या मार्गावर आहे. राज ठाकरे यांना बरोबर घ्यायची उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांची तयारी असली, तरी काँग्रेसची तयारी नाही. त्यामुळे काँग्रेसने निवडणुकीच्या रिंगणात स्वबळावर उतरण्याची घोषणा केली आहे. विदर्भात तर काँग्रेसमध्ये सुनील केदार यांच्याविरोधात नाराजी उफाळून आली. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सामूहिक राजीनाम्याचे अस्त्र उगारले आहे. दुसरीकडे गेल्या ३५ वर्षांपासून संगमनेर नगरपालिकेवर काँग्रेसच्या बाळासाहेब थोरात यांचे वर्चस्व होते. त्यांच्या भगिनी दुर्गा तांबे नगराध्यक्ष होत्या. आता त्यांची भाचेसून निवडणुकीच्या रिंगणात असून, आमदार सत्यजीत तांबे यांनी नगरपालिकेसाठी व्यूहरचना केली आहे. श्री. थोरात निवडणुकीपासून अलिप्त असून, प्रथमच काँग्रेसच्या चिन्हावर निवडणूक लढवली जाताना दिसत नाही.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत महायुती अभेद्य राहण्याची शक्यता असली, तरी राज्याच्या अन्य भागात महायुतीच्या ठिकऱ्या झाल्या आहेत. काही प्रमाणात शिंदे गट आणि भाजपचे काही लोकही त्यांच्या पक्षात सोईसाठी प्रवेश करत आहेत. सत्तेत येताना मित्रपक्षांमध्ये एक अलिखित करार झालेला असतो. या करारानुसार, परस्परांचे नेते, कार्यकर्ते फोडायचे नाहीत, मित्रपक्षाचा कुणी येत असेल, तर प्रवेश द्यायचा नाही, असा संकेत असतो; परंतु शत-प्रतिशत भाजप असा निर्धार कायम असल्याने भाजपमध्ये भरतीची त्सुनामी आली आहे. सत्तेसाठी भाजपने विधिनिषेध न बाळगता तडजोडी करायला सुरुवात केली आहे. धाराशिव जिल्ह्यात तर पक्षाने गंभीर गुन्हे दाखल झालेल्यांना उमेदवारी दिली आहे.

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ही कोकणपट्टी एके काळी शिवसेनेचा बालेकिल्ला मानली जायची. मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यात शिवसेनेची मोठी ताकद होती.

त्याअगोदर ठाणे जिल्ह्यातील काही भागांमध्ये भाजपचे वर्चस्व होते; परंतु एकत्रित शिवसेना आणि भाजपने त्या काळात सत्तेसाठी केलेल्या तडजोडीत हे मतदारसंघ शिवसेनेला सोडावे लागले. त्यात कल्याणचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. शिवसेना फुटल्यानंतर या पक्षाचे काही नेते भाजपमध्ये आले. यावेळी फुटीचा फायदा घेण्याची व्यूहनीती भाजपने आखली. पालघर जिल्ह्यात लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघ भाजपने जिंकले. या जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण होते. शिवसेना एकजूट असताना चव्हाण यांनी एकनाथ शिंदे यांच्यांशी जुळवून घेतले होते; परंतु शिंदे यांनी त्यांचा मुलगा डॉ. श्रीकांत यांना राजकारणात पुढे आणले. त्यानंतर ठाणे आणि कल्याण परिसरात त्यांचा हस्तक्षेप वाढत गेला. लोकसभा आणि विधानसभेच्या वेळी राज्यात कुठे वाद झाला नसला, तरी कल्याण आणि ठाण्याचा वाद चांगलाच गाजला. ठाणे हा एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असला, तरी कल्याण-डोंबिवलीत आतापासूनच भाजप शिंदे यांना आव्हान देऊ पाहात आहे. नवी मुंबई, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर ही शहरे असोत वा रत्नागिरी, खेड, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नगरपालिका; भाजप शिंदे यांच्या शिवसेनेचा प्रभाव मान्य करण्यास तयार नाही. त्यातूनच भाजप आणि शिवसेना यांच्यातील वाद वाढत गेला.

अलीकडेच उल्हासनगरमध्ये शिंदे यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना गळाला लावले, तर अन्य ठिकाणी शिंदे यांच्या महत्त्वाच्या नेत्यांना भाजपने प्रवेश देऊन ‘एकला चलो रे’ म्हणत तयारी सुरू केली. त्यामुळे शिंदेंच्या काही मंत्र्यांचे मतदारसंघ अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यातून भाजप आणि शिवसेनेच्या शिंदे गटात कमालीची दरी निर्माण झाली. शिंदेसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांची संतप्त प्रतिक्रिया महायुतीतील दोन घटक पक्षांमध्ये किती बिनसले आहे, हे दाखवण्यासाठी पुरेशी होती. त्यातूनच शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळाच्या कामकाजावर बहिष्कार टाकून आपले उपद्रवमूल्य दाखवून दिले. निधी मिळत नाही, सन्मान ठेवला जात नाही अशी कारणे पुढे केली असली, तरी खरे कारण शिवसेनेच्या नेत्या, कार्यकर्त्यांनी हाती घेतलेले कमळ हेच होते. शिंदे गटाने नाराज नसल्याचे सांगितले असले, तरी प्रत्यक्षात वस्तुस्थिती काय होती, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. नाराजी व्यक्त करायला गेलेल्या मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांनीच सुनावले. भाजपकडून सध्या मुंबईपाठोपाठ झपाट्याने विस्तारणाऱ्या मुंबई महानगर प्रदेशातील सर्वच शहरांवर ताबा मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू आहे. नवी मुंबई, पनवेल, उरणसारखी शहरे यापूर्वीच भाजपच्या ताब्यात आली. या भागात विमानतळ, तिसरी मुंबईसारख्या मोठ्या प्रकल्पांची पायाभरणी सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांना पालघर जिल्ह्यात चौथ्या मुंबईची पाळेमुळे रोवायची आहेत. येथेच देशातील सर्वात मोठे वाढवण बंदर उभे राहणार आहे. गुजरात-महाराष्ट्राचा सीमावर्ती भाग असलेल्या या प्रदेशात बुलेट ट्रेन, मुंबई-बडोदे महामार्ग, लॉजिस्टिक पार्क, विरार-जेएनपीटी एक्स्प्रेस कॉरिडॉर अशा उद्योगभिमुख प्रकल्पांची आखणी सुरू आहे.

नागरीकरणाच्या या वेगात या शहरांचा मराठी चेहराही मागे पडत आहे. नागरीकरण आणि स्थलांतरितांचा हा प्रदेश भाजपसाठी सुपीक जमीन ठरेल, अशा पद्धतीची आखणी सुरू आहे. या वेगात स्वत:चे वेगळे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे आव्हान विरोधकांपेक्षा शिंदे यांच्यापुढे अधिक आहे. मुंबई, ठाणे परिसरावर लक्ष केंद्रीत करणाऱ्या भाजपवर नांदेड जिल्ह्यात मात्र नामुष्कीची वेळ आली आहे. राज्यसभेचे दोन खासदार, त्यातील एक राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि प्रभावशाली नेते तसेच वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये पाच आमदार अशा भक्कम बळावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमधून जिल्ह्यात अव्वल स्थान प्राप्त करण्याचा निर्धार करणाऱ्या भारतीय जनता पक्षाने बिलोली नगरपालिकेच्या निवडणुकीत शेवटच्या क्षणी पळ काढल्यानंतर राजकीय वर्तुळात तसेच पक्षातही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपालिकेत भाजपचे सर्व म्हणजे १७ उमेदवार एकीकडे बिनविरोध विजयी झाले असताना नांदेड जिल्ह्यात मात्र नगरपालिकेत उमेदवार न देण्याची नामुष्की पक्षावर ओढवल्यामुळे समाजमाध्यमांतून त्यावर बरीच चर्चा होत आहे. महायुतीतील अंतर्गत तणाव शिगेला पोहोचला असतानाच शिवसेना (उबाठा)चे माजी उपनेते तथा मालेगावचे बडे नेते अद्वय हिरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. हिरे यांच्या या घरवापसीमुळे मालेगाव आणि नाशिक जिल्ह्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. हिरे यांच्या प्रवेश सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला.

भाजपकडून शिंदे गटाच्या नेत्यांची मोठ्या प्रमाणात फोडाफोडी सुरू असल्याचा आरोप करत शिंदे गट सध्या संतापला आहे. नाशिक-मालेगाव परिसरात हिरे कुटुंबीयांचा राजकीय दबदबा गेल्या अनेक दशकांपासून आहे. मालेगाव बाह्य मतदारसंघात सध्या शिंदे गटाचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांची पकड मजबूत मानली जाते. हिरे पुन्हा भाजपमध्ये आल्याने २०२९ मध्ये ‘भुसे विरुद्ध हिरे’ हा सामना रंगणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यातील अनेक ठिकाणी शिंदे गटाच्या आमदार-नेत्यांच्या विरोधात भाजप मजबूत पर्याय तयार करत असल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी शिवसेनेचे दोन्ही गट, तर काही ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आले आहेत. सोयीचे राजकारण केले जात आहे. कुटुंबशाही आणि घराणेशाहीवर टीका करणाऱ्या भाजपने एका नगरपालिकेत एकाच कुटुंबातील सहाजणांना उमेदवारी देऊन आपले पायही मातीचे असल्याचे दाखवून दिले आहे. भाजप तसेच मित्रपक्षांनी महाविकास आघाडीवर घराणेशाहीचे राजकारण करताना स्वतःच कुटुंबशाहीला प्राधान्य दिले आहे. ●●

---

**काल सहज इंस्टाग्राम उघडले तर एक सँडी नावाचा तरुण आपल्या जिममध्ये आपले कसलेले अ‍ॅप्स दाखवतो आहे. त्याचे मेहनतीचे कसदार, पिळदार शरीर सर्वांचे लक्ष्य वेधून घेत होते आणि साहजिकच हजारोंच्या वर लाईक्स होत्या. असे मेहनती, जिमला सकाळी-सकाळी जाणारी तरुणाई बघून फार बरं वाटलं. असं वाटत की आपल्या देशाला खूप उज्वल आरोग्यदायी भविष्य आहे. खरोखर अशा तरुणाईचा आपल्याला अभिमान आहे.**

अरविंद मोरे

# आरोग्यदायी जीवनाचा वर्क आऊट



दुसऱ्या क्षणाला न कळत व्हॉट्सअप स्टेटसवर बोट गेलं आणि ते उघडल्या गेलं. बघतो तर काय, एक तरुणी सकाळी-सकाळी ट्रॅक सूट, टी शर्ट, स्पोर्ट शूज, काळा चष्मा परिधान करून अगदी रुबाबात लांब सडक काळ्या रंगाच्या स्कोडा कारमधून उतरते आणि जिममध्ये प्रवेश करते. जिमचा दरवाजा उघडल्यावर एकदम आल्हादी वातावरण, सुगंधी सुवास, मंद-मंद ढिक छाक, ढिक छाक म्युझिक. आपल्या कोचच्या सहाय्याने सहजरित्या समोर भल्यामोठ्या स्वच्छ आरशात आपले वर्क आऊट करताना बघते. एक समाधानाची लहर स्वतःसाठी काही तरी करते, आपल्या आरोग्यासाठी वेळ देते. आपल्या स्वास्थ्यासाठी सजग असलेली. आपल्या संसारापासून काही वेळ दूर, नवऱ्यापासून, घरापासून, सासू-सासऱ्यापासून, आई-वडिलांपासून व मुलाबाळांच्या कटकटीपासून दूर. एक समाधानाची झालर तिच्या चेहऱ्यावर वर्क आऊट करून घाम आलेला, थोडी थकलेली. लगेच भल्या मोठ्या आरशात आपले प्रतिबंब बघते आणि मनातल्या मनात हलकेसे स्मित करते. बाजूला असलेल्या आपल्या मैत्रिणीला व्हिडीओ काढायला लावते आणि जिम सोडायच्या आत आपल्या स्टेटसवर व्हिडीओ अपलोड करते आणि स्वतःला धन्य समजते.

हल्ली हे खूपच फॅड निघाले आहे की, आपण काही तरी केले की समाज माध्यमांवर अपलोड करायचे. उद्देश हाच असेल की, मी काही तरी नवीन केले आहे. तुम्ही बघा, माझे कौतुक करा, तुम्ही पण करा, माझ्या कडून प्रेरणा घ्या!

हल्ली वजन कमी करण्याचे जणू फॅडच निघाले आहे. ज्याला त्याला वजन कमी करायचे आहे. सुंदर दिसायचे आहे. शेपमध्ये राहायचे आहे. इकडे काही प्रॉडक्ट्स बाजारात वजन कमी करण्याचा दावा करीत आहेत आणि आपले जाळे टाकून एक-एक जण टिपण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. सोबतच वर्क आऊटच्या कार्यशाळेचे पण पेव फुटलेले आहे. जिकडे तिकडे वर्क आऊटचा सुळसुळाट झाला आहे.

हे एक जीवनचक्र आहे. लग्नाच्या अगोदर मुलगी सुंदर, चवळीची शेंग, तर तिकडे तरुण पिळदार, कसलेले शरीर, पोट न सुटलेले आणि लग्नाच्या बेडीत अडकल्यानंतर कधी चाळीशी ओलांडते हे कळतसुद्धा नाही. तो तरुण व्यायाम, खेळापासून दूर जातो आणि कधी पोट सुटतं, हेसुद्धा त्याला कळत नाही आणि एकदम विचार येतो पोट कमी करण्याचा आणि मग सुरु होतो पोट कमी करण्याचा महासंग्राम. इकडे तुमच्या पोटाची कॅच घेण्यासाठी मार्केटमध्ये टपलेलेच आणि मोफतमध्ये वेळोवेळी सल्ला देणारे ते फ्रीमध्ये वेगळेच.

आता या असल्या तरुणी सकाळी-सकाळी जिममध्ये जातात, व्यायाम करतात, आपले आरोग्य चांगले ठेवतात, ही चांगली बाब आहे. पण, या तरुणी कशा जाऊ शकतात जिमला? तर ह्यांना सहकार्य असतं त्यांच्या आई-वडिलांचं, सासू-सासऱ्यांचं. बरं काय गरज पडली या तरुणाईला जिममध्ये जाण्याची, वजन कमी करण्याची? आपण जरा ६० वर्षे मागे वळून बघू या. काय होती महिलांची दिनचर्या? सकाळी लवकर उठणे, पाणी विहिरीवरून ओढणे, भरणे, सडा सारवन करणे, फरशी पुसणे, भांडी-धुणे करणे, झाडझूड करणे. ही सगळी कामे महिला स्वतः घरी करायच्या. तेव्हा मेड हा प्रकार नव्हता. बरं हे सर्व करून काही महिला शिकल्या, उच्च विद्या विभूषितसुद्धा झाल्या. ३०-४० वर्षे नोकऱ्या करून मुलांची शिक्षणंसुद्धा केली. या महिलांचे जीवनमान कसे होते तर नो बी.पी., नो शुगर, नो सिझरिंग, नॉर्मल डिलिव्हरी, नो फॅटनेस आणि आता अगदी असा काय बदल झाला की, या ५० वर्षात बी.पी., शुगर, सिझरिंग आणि आता तर आय.व्ही.एफ.पर्यंत मजल गेली.

कारण एकच ते म्हणजे बदललेली जीवनशैली, आरामदायीपणा. प्रत्येक कामाला बाई. शरीराला व्यायाम नाही, हालचाल नाही, घाम नाही की चरबीचे विसर्जन होत नाही. त्यामुळे चरबी (फॅट्स) वाढते आणि रोगांची निर्मिती होते.

पूर्वी पुरुष माणसाची दिनचर्या काय होती? सकाळी लवकर उठणे. पायी शेतात जाणे, पाणी भरणे, लाकडे तोडणे, झाडावर चढणे, सगळी शेतातील शारीरिक कामे करणे, ह्या सर्व क्रियांमुळे फॅट्सचे ज्वलन व्हायचे. त्यामुळे नो बी.पी., नो शुगर, तो कॉलेस्ट्राल, नो युरिक ॲसिड आणि नो ॲसिडिटी. लहान मुलं शारीरिक खेळ खूप खेळायची. आता पुरुष माणसानेसुद्धा आरामदायी काम करणे सुरु केले आहे. त्यामुळे विविध व्याधींनी, रोगांनी माणसाला घेरले आहे. कारण की, मानवाने आता स्वतः कामे करणे बंद केले आहे. त्यांच्या सोबतीला आता यंत्रं आली आहेत. आता त्याने वर्कला आऊट केले आहे. त्यामुळे आता मानवाला वर्क आऊट करावे लागत आहे. फॅट बर्नसाठी झटावे लागत आहे.

पूर्वी माणसाची दिनचर्या काय होती? भैरू उठला. त्याने जनावरांना चारा घातला आणि दिवसभर राबराब राबून रात्री ७ वाजताच झोपला. सकाळी पाचला उठला. आणि, आता तर भैरू सकाळी अकरा वाजेपर्यंत उठतच नाही आणि रात्री झोपतच नाही. दिवस-रात्र मोबाईलच्या मागेच असतो. त्याला मोबाईल, व्हॉट्स ॲप्स, रील्स, फेसबुक आणि इंस्टाग्राम सुचूच देत नाही. यामुळे त्याचा फॅटनेस वाढला आहे व तो आरोग्यासाठी झगडत आहे. मेडिक्लेम आणि विम्याचा सहारा तो घेत आहे. जसा की डुबत्याला काडीचा आधार.

महिला सर्वप्रथम एकत्र आल्या त्या भिशी या उपक्रमाखाली आणि नंतर बचत गट. या महिला पुढाकार घेऊन नवीन-नवीन उपक्रम हाती घेऊ लागल्या आणि यशस्वी होऊन आपल्या पायावर उभ्यासुद्धा राहिल्या, याचा आपल्याला सार्थ अभिमानसुद्धा आहे.

नुकताच एक व्हिडिओ माझ्या बघण्यात आला. त्यात ह्या महिला त्या हालचाली करत होत्या; ज्या की आपल्या प्राचीनकाळी महिला करीत होत्या. यात विहिरीचे पाणी ओढणे, जात्यावर दळण दळणे, रई लावणे, दूध काढणे, कपडे धुणे, फारशी पुसणे आदी ह्या सर्व ॲक्शन करत होत्या, व्यायामाच्या त्या स्टेप्स होत्या. म्हणजे, परत एकदा आपल्या शरीराला ज्या हालचाली अपेक्षित आहे, त्या दिशेने आपण वाटचाल करत आहोत ह्याची ही नांदी तर नव्हे ना?

असो, हे मात्र नक्की, मानवाने वर्कला आऊट केल्यामुळे आता त्याला वर्क आऊट करावे लागत आहे. सर्वांना चांगले आरोग्य लाभो, हीच सदिच्छा. ●●

---

धनंजय शेटये

# मार्गशीर्ष गुरुवार व्रत आणि झाडांचे महत्त्व!

मार्गशीर्ष महिना भक्तीचा, पवित्रतेचा आणि समृद्धीचा अधिष्ठान असलेला काळ. देवाधिदेव विष्णू आणि महालक्ष्मीचा हा आवडता महिना म्हणून ओळखला जातो. या महिन्यातील प्रत्येक गुरुवार हा स्त्रियांसाठी एक अलौकिक आध्यात्मिक अनुभव घडवून आणणारा दिवस. घरात पिवळ्या पुष्पांचा सुगंध, तुपाच्या दिव्याची मंद ज्योत. अशा मंगलमय वातावरणात मार्गशीर्षी गुरुवार व्रत पार पडते.

या व्रतामागील उद्देश फक्त पूजा-अर्चा नसून घरात सुख, समाधान आणि ऐश्वर्य टिकवणे हा असतो. स्त्री शक्तीची अंतःप्रेरणा, तिचे कुटुंबासाठीचे निःस्वार्थ प्रेम आणि घरातील मंगलमय वातावरण जपण्याची तिची नितांत इच्छा. या सर्वांचा एक सुंदर संगम म्हणजे हे व्रत. परंतु, या दिवसात एक विशेष गोष्ट काटेकोरपणे पाळली जाते; ती म्हणजे झाडांच्या फांद्या न कापणे. आजच्या आधुनिक जगात या प्रथेकडे केवळ अंधश्रद्धा म्हणून पाहिले जाते; पण प्रत्यक्षात त्यामागे आहे गाढ सांस्कृतिक भूमिका आणि निसर्गाशी असलेली एकात्म नाळ.

वृक्ष म्हणजे देवत्वाचं निवासस्थान. भारतीय संस्कृतीत प्रत्येक वृक्षाला देवत्व लाभलेलं आहे. वडामध्ये ब्रह्मदेव, पिंपळात विष्णू, औदुंबरात दत्त, तुळशीमध्ये लक्ष्मी अशी देवत्वाची प्रेरणा पिढ्यान्‌पिढ्या प्रवाहित झाली आहे. गुरुवार हा विष्णूचा दिवस, आणि मार्गशीर्ष हा लक्ष्मी-विष्णूचा परम प्रिय महिना. अशा शुभकाळात वृक्षांच्या फांद्या कापणे म्हणजे त्यांच्या देवत्वाला



बाधा पोहोचवणे, असा लोकांचा भावार्थ आहे. निसर्गाला तडा द्यायचा नाही, हिरवाईला दुखवायचं नाही. हीच खरी सांस्कृतिक मर्मकथा. समृद्धीचे प्रतीक म्हणजे वाढ, कत्तल नाही! गुरुवार व्रत हे वाढ, ऐश्वर्य आणि शुभतेचे प्रतीक आहे. फांदी कापणे म्हणजे वाढ कापणे. घरातील समृद्धीवर कात्री फिरवण्यासारखं मानलं गेलं. स्त्रियांना घरातील सुख-शांती जपायची असते. त्या नजरेतून ही प्रथा म्हणजे वाढ जपण्याची, समृद्धी सांभाळण्याची एक भावनापूर्ण आठवण. निसर्गसंरक्षणाचा सुंदर संदेश मार्गशीर्ष हा हिवाळ्याच्या प्रारंभाचा काळ. झाडांमध्ये नव्या कळ्यांचा श्वास उमलत असतो. अशावेळी फांद्या कापणे म्हणजे झाडाला वेदना देणे.

आपले पूर्वज या नाजूक भावनेला धर्म आणि व्रत यामध्ये गुंफून निसर्गरक्षणाचा संदेश देऊन गेले. आज पर्यावरण, हवामान बदल, वृक्षतोड या मोठ्या समस्या आपण भोगत आहोत. या पारंपरिक नियमांचे आधुनिक वैज्ञानिक महत्त्व लक्षात येते. निसर्गाची काळजी घ्या, त्याच्या वाढीत हस्तक्षेप करू नका. संस्कृती म्हणजे केवळ नियम नव्हेत ती आहे जपणूक आज अनेक घरात व्रत होते, पूजा होते, पण परंपरेमागील अर्थ कळला तर श्रद्धा अधिक दृढ होते. मार्गशीर्ष गुरुवार आणि झाडांच्या फांद्या न कापण्याची प्रथा सांगते. निसर्ग हा आपला देव आहे, वाढ ही शुभता आहे, आणि घरातील शांतता हीच खरी पूजा आहे.मार्गशीर्ष गुरुवार व्रत म्हणजे स्त्रीशक्तीचा मंगल संकल्प, घरात सुखसमृद्धीची अखंड अखंड दीपज्योत, आणि वृक्षांना देवस्थानी मानणाऱ्या भारतीय संस्कृतीची हिरवी शिकवण.

‘देवत्व आणि निसर्ग यांचा संगम’ याहून सुंदर, याहून पवित्र असा संदेश दुसरा कोणता असू शकतो? पर्यावरण संरक्षक बनून आपण पर्यावरणाचे संवर्धन व जतन करायला हवे. सण, उत्सव साजरे करताना आपण पर्यावरणाचे आभार मानले पाहिजेत. कारण, पर्यावरण हेच खरे दैवत आहे. पर्यावरणात प्राणवायू म्हणजे ऑक्सिजन आहे म्हणून आपण जीवित आहोत. ●●

---

# फ्लाईंग शीख मिल्खा सिंग

श्याम ठाणेदार



भारतातीलच नव्हे तर, जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांची जयंती नुकतीच झाली. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले.

मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदके मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५.७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एवढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली. विशेष म्हणजे, त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटू आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे प्रमुख पाकिस्तानचे माजी प्रमुख आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित ‘भाग मिल्खा भाग’ हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अखतर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षांपूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. ●●

# वडापावचे चुलत नातलग

निलेश साठे



मुंबई आणि संपूर्ण महाराष्ट्रातून देश विदेशात प्रसिद्ध पावलेला तुमचा आमचा सर्वांचा लाडका आवडता झणझणीत आणि खुसखुशीत खाद्यपदार्थ म्हणजे वडापाव. या वडापावला सर्वात जास्त प्रसिद्ध मिळण्याचे कारण म्हणजे त्याची किंमत चव आणि सहज उपलब्धता. गरिबांचा पिझ्झा म्हणून ओळखला जाणारा वडापाव गरिबापासून श्रीमंतापर्यंत सगळेच अगदी चवीने खातात. गरिबांसाठी तर वडापाव म्हणजे पूर्ण अन्न आहे. दोन वडापाव खाल्ले तरी संपूर्ण पोट भरलेल्याचा अनुभव येतो. वडापाव आता फक्त वडापाव राहिला नाही. त्याला चुलत नातलग तयार झाले आहेत. जसे की चिकन पाव, अंडा पाव, भुर्जी पाव, वजडी पाव, मटण पाव, आमलेट पाव, भाजी पाव, खडा म्हणजे उलटा वडा आणि वडा उसळ पाव. खरे तर, हे जे पदार्थ तयार झालेत त्यासाठी कोणी काही डिग्री घेतलेली नाही काही उच्च शिक्षण घेतलेले नाही सहज सुचले म्हणून प्रयोग केला अशातून त्यांचा जन्म झालेला आहे. आणि त्यांचा हा प्रयोग यशस्वी होतानासुद्धा दिसत आहे. मुंबई पुणे सारख्या शहरांमध्ये अनेक गर्दीच्या ठिकाणी असे पदार्थ सहज उपलब्ध होत आहेत. ज्यांना काही काम धंदा नाही, बेरोजगार आहेत, भांडवल कमी आहे, अशा लोकांनी हे व्यवसाय चालू केलेले आहेत. अगदी सहज घरातून केले जाऊ शकणारे हे व्यवसाय आहेत. घरामधून बनवून आणून गर्दीच्या आणि मोक्याच्या ठिकाणी उभे राहून विकले तरी चालतात. आणि, यातील बऱ्याच पदार्थांची उत्पत्ती ही महाराष्ट्राच्या बाहेरून आलेल्या लोकांनी केलेली आहे. ते इथं आले त्यांनी पाहिलं लोक खाण्याच्या पदार्थावर तुटून पडत आहेत, मग एक छोटीशी आयडिया घेऊन प्रत्यक्ष कृती करायला सुरुवात केली आणि पाहता-पाहता त्यांचं व्यवसायात रूपांतर झालेलं आहे. तुम्हाला जो पदार्थ चांगल्या प्रकारे बनवता येतो चविष्ट स्वादिष्ट रुचकर बनवता येतो, त्या पदार्थाला पावामध्ये टाकून त्या वस्तूला नाव द्या आणि विक्रीस उपलब्ध करा. इतकी सरळ, साधी सोपी प्रक्रिया आहे. वडापाव अजून तरी प्रसिद्धीच्या शिखरावर आहे; परंतु खवय्येगिरींची संख्या पाहता आणि त्यांच्या आवडीनिवडी पाहता चिकन पाव, मटण पाव लवकरच वडापावला टक्कर देण्याच्या तयारीमध्ये दिसत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील छोट्या-मोठ्या शहरांमध्ये असे वेगवेगळे प्रयोग करून बघायला काही हरकत नाही. निदान ज्यांच्याकडे काम धंदा नाही बेरोजगार आहेत नोकरी मिळत नाही नोकरी मिळेपर्यंत किंवा उदरनिर्वाहाचा दुसरा मार्ग मिळेपर्यंत तरुणांनी हा प्रयोग करायला काहीच हरकत नाही. परप्रांतातून लोक इथे येतात ते इथे नोकरी मागत बसत नाहीत, स्वतःच नवीन पर्याय उपलब्ध करतात.

हे जे वडापावला नातलग तयार झाले आहेत, त्यांना चुलत म्हणण्यामागचं कारणसुद्धा हेच आहे की दुर्दैवाने या व्यवसायात आपल्या माणसांपेक्षा परप्रांतातून आलेली माणसंच जास्त दिसत आहेत. ते आपले आहेत की नाहीत हे काळ ठरवतो. म्हणून चुलत. हे व्यवसाय जरी छोटे वाटत असले, तरी आपण आपला स्वतःचा घरपरिवार नक्कीच चालू शकतो एवढा तर पैसा हमखास मिळतो आहे. भविष्यात एखाद्याने एखादे रताळे भाजून त्यावर मीठ मसाला मिरची आणि वेगवेगळे सॉस चटणी वापरून रताळे पाव बनवले तर आश्चर्य वाटू नये. वडापावचे स्थान जरी सध्या वरच्या क्रमांकावर असले, तरी त्याला जबरदस्त स्पर्धा निर्माण झाली आहे एवढं मात्र निश्चित. ●●

# दूरदृष्टीचा, समाजहितैषी

मुक्तांगण

प्रा. शाम जोगळेकर

मो. ९२७३३४३१७७

'समाजस्वास्थ्य'कार, संततिनियमनाचे आद्य पुरस्कर्ते र.धों.कर्वे, हे डॉ. अनंत देशमुख यांचे पुस्तक संधिकाल प्रकाशनने प्रकाशित केले आहे. सुरुवातीला प्रस्तावनामध्ये अनंत देशमुख यांनी, र.धों.कर्वे यांच्या, त्यांनी लिहिलेल्या तीन चरित्रांचे, अन्य उपलब्ध तीन चरित्रांशी तुलना करून, सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे. या पुस्तकात एकूण अठरा प्रकरणे आहेत. शेवटी रघुनाथ कर्वे यांचा जीवनपट सविस्तरपणे उलगडला आहे. सूची आणि संदर्भ ग्रंथ यांची उपयुक्त माहिती दिली आहे. अनंत देशमुख यांच्या, रंगीत छायाचित्रासह त्यांच्या लेखनाविषयीची माहिती, पुस्तकात शेवटी दिली आहे. पुस्तकाचे रंगीत आणि सुयोग्य मुखपृष्ठ सतीश खानविलकर यांचे आहे.




पहिल्या प्रकरणात, इंग्रजी राजवटीखालील एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील विविध घडामोडींचा थोडक्यात आढावा घेतला आहे. 'प्रारंभीचे दिवस'मध्ये धोंडो केशव कर्वे यांचे लग्न राधाबाई यांच्याशी झालेले होते. राधाबाईंच्या पोटी १८८२ सालच्या १४ जानेवारीला रघुनाथ यांचा जन्म झाला. त्या काळातील रत्नागिरी जिल्ह्यातील कोकणातील बहुसंख्य व्यक्ती शिक्षणासाठी आणि नोकऱ्यांसाठी मुंबईकडे समुद्रमार्गाने जात होते. १८९७ मध्ये रघुनाथ मॅट्रिक झाला. तेव्हा महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर या ठिकाणी महाविद्यालये होती. उच्च शिक्षण घेणारांची संख्या हळूहळू वाढत होती. त्याकाळी श्रीमंत कुटुंबांतील, कॉलेजमध्ये शिकणारी, हॉस्टेलवर राहणारी मुले, लग्न झालेली असत. लैंगिक शिक्षणाच्या अभावामुळे काही विवाहित विद्यार्थी, घरापासून दूर शहरात असल्याने गुप्तरोगांना बळी पडत असत. त्याच काळात वाढत्या लोकसंख्येची समस्या रघुनाथ यांना जाणवू लागली. १९०५ मध्ये पुण्यात बी.ए. झाल्यावर शिक्षण शास्त्रातील पदविका घेण्यासाठी त्यांनी मुंबईतील कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. रघुनाथ यांनी फ्रेंच भाषेचे शिक्षण, प्रा. पेल्तिए यांच्याकडून घेतले. लवकरच ते त्यांचे लाडके विद्यार्थी झाले. १९०८ साली रघुनाथ यांची एल्फिन्स्टन कॉलेजात गणिताच्या प्राध्यापकाचे सहाय्यक म्हणून नेमणूक झाली. त्याच वर्षी ते गणित विषय घेऊन एम.ए. झाले. परंतु, त्यांना क्लास मिळाला नाही. १९१० साली रघुनाथ यांचा, मालतीबाई यांच्याशी प्रेमविवाह झाला. १९१४ पासून रघुनाथ यांनी, आपल्या स्वतंत्र लेखनाला सुरुवात केली.

१९१७ नंतर दीड वर्ष, रजा घेऊन रघुनाथ गणित विषयात पीएच.डी. करण्यासाठी आणि संतती नियमन, गुप्तरोग, स्त्री-पुरुषसंबंध या विषयांचा अभ्यास करण्यासाठी पॅरिसला गेले. तेथे त्यांनी, तेथील वातावरणाप्रमाणे राहण्याचा प्रयत्न केला. मात्र, मार्गदर्शक प्राध्यापकाशी मतभेद झाल्याने, त्यांचे डॉक्टरेटचे काम पूर्ण झाले नाही. सरकारी नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर रघुनाथरावांनी परळ भागात संततिनियमनाचे केंद्र सुरू केले. कोणाही पुरुषाने येऊन या विषयासंबंधात आपल्या अडचणी सोडवून घ्याव्यात, अशी त्यांची अपेक्षा होती. हळूहळू लोकांचा प्रतिसाद मिळू लागला. रघुनाथरावांनी आपल्या पत्नीला पद्धतशीर शिक्षण देऊन, त्यांच्याद्वारे स्त्रियांसाठी हेच कार्य सुरू केले. पुण्यात शकुंतलाबाईंनी हे कार्य सुरू ठेवले, तसेच त्या खेड्यापाड्यात जाऊन यासंबंधीची माहिती देत असत. संततिनियमनाची साधने उपलब्ध व्हावीत म्हणून रघुनाथ यांनी 'राईट एजन्सी' निर्माण केली होती. १९२६ मध्ये रघुनाथराव, त्यांचे बंधू डॉ. शंकरराव यांच्याकडे नैरोबीला नोकरीसाठी गेले होते. परंतु, तेथेही त्यांना अपेक्षित नोकरी न मिळाल्याने रघुनाथ साडेपाच महिन्यांनी मुंबईला परतले. संततिनियमनाच्या कार्यात रघुनाथ यांना डॉ. रॉबिन्सन, डॉ.नॉर्मन हेअर, हॅवलॉक एलिस,सिग्मंड फ्रॉइड यांच्याकडून प्रेरणा प्राप्त झाली.

मार्गारेट सँगर, हाऊ मार्टिन या विदेशातील संततिनियमनाचे कार्य करणाऱ्या स्त्रिया, त्यांच्या हितचिंतक होत्या. १९२१ साली रघुनाथ यांनी 'संततीनियमन' नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले. १९२३ साली त्यांनी परळ भागात आपले क्लिनिक सुरू केले.१५ जुलै १९२७ पासून, 'समाजस्वास्थ्य' हे मासिक रघुनाथ यांनी सुरू केले. समाजाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने, ज्या विषयांची चर्चा व्हावी असे त्यांना वाटे, त्या सर्व विषयांचा अंतर्भाव त्यांनी आपल्या नियतकालिकात केला होता. त्यामध्ये बुद्धिप्रामाण्यवादी विचारांना प्राधान्य दिले. समाजातील अंधश्रद्धा, जुन्या रूढी आणि परंपरा यांच्यावर हल्ला करण्यावर त्यांचा भर राहिला. साहित्य समीक्षा, पुस्तक परीक्षणे, आरोग्य, व्यायाम, गृहकर्मे अशी विविध सदरे होती. वाचकांच्या पत्रव्यवहारालाही स्थान दिले गेले. विरोधी छापून येणाऱ्या विचारांचा समाचार घेण्यासाठी, त्यांनी 'शारदेची पत्रे' हे स्वतंत्र सदर सुरू केले. सत्य नेहमीच कटू असते, हे स्पष्ट करण्यासाठी मासिकाच्या मुखपृष्ठावर नग्न, अर्धनग्न स्त्रियांची चित्रे देण्यावर त्यांचा कटाक्ष राहिला. रघुनाथरावांची समाजस्वास्थ्यविषयक भूमिका अतिशय स्पष्ट आणि रोखठोक होती. पहिल्या अंकाच्या आरंभी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. समाजस्वास्थ्यचा अंक २४ पानांचा असायचा. बहुतेक सर्व मजकूर रघुनाथ यांचाच असायचा. कारण, त्यांना लेखकांना मानधन देणे परवडणारे नव्हते. फ्रान्समध्ये मुक्त स्त्रीसंबंधाला आणि तशा विचारांना स्वातंत्र्य होते. पॅरिसच्या फूटपाथवर त्या विषयाला वाहिलेली पुस्तके, नियतकालिके, चित्रसंग्रह सहजपणे उपलब्ध होत असत. त्यातील मजकुराचा आणि चित्रांचा रघुनाथ आपल्या प्रकाशित होणाऱ्या अंकांमध्ये उपयोग करून घेत असत. विविध प्रकारचे अंक रघुनाथ यांनी काढले होते. त्यांची माहिती सविस्तरपणे डॉ. देशमुख यांनी दिली आहे. त्यामधून रघुनाथ यांचे बुद्धिप्रामाण्यवादी विचार दिसून येतात. रघुनाथ यांना कला, साहित्य, संगीत या विविध विषयांमध्ये रस होता. त्यामध्ये ते वेळोवेळी सहभागी होत असत.

समाजस्वास्थ्यमधील प्रकाशित मजकुरावर अश्लीलतेच्या मुद्द्यांवर, वेळोवेळी खटले दाखल केले गेले. या खटल्यांचा सविस्तर ऊहापोह देशमुख यांनी केला आहे. अहिताग्नी राजवाडे, मनोरमाबाई थत्ते, मनोरमाबाई खाबडे, कॅप्टन पिल्ले, डॉ. स्टोन हे समाजस्वास्थ्यचे विरोधक का होते, हे देशमुख यांनी सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. रघुनाथ यांच्या ग्रंथ लेखनाविषयी आणि रीझन या इंग्रजी नियतकलिकातील कार्याविषयी देशमुख यांनी माहिती दिली आहे. रघुनाथ यांचा स्वभाव कसा होता, याचे सुंदर विश्लेषण अनंत देशमुख यांनी केले आहे. त्यामध्ये त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू वाचकांसमोर उलगडत जातात. १९४४ मधील दिवाळीच्या पहिल्या दिवशी, रघुनाथ यांच्या पत्नी, मालतीबाईंचा, दीर्घ आजारानंतर मृत्यू झाला. १९३७ पासून रघुनाथ यांना रक्तदाब विकाराचा त्रास सुरू झाला होता. शारीरिक दुखणी असतानाही, त्यांची व्याख्याने, लेखन नियमितपणे चालू होते. नोकरीविना त्यांचे सारे आयुष्य प्रचंड हलाखीचे, खडतर होत होत गेले. त्यांच्या जीवनकाळात समाजाने त्यांची आणि त्यांच्या कार्याची यथोचित दखल घेतली नाही. परंतु, १९५२ साली त्यांनी वयाची सत्तरी पूर्ण केली. तेव्हा न्या.एम.सी. छगला यांच्या अध्यक्षतेखाली रघुनाथ यांचा सत्कार केला गेला. यावेळी रघुनाथरावांच्या कार्याविषयी समुचित व्याख्याने झाली. त्यांचा गौरव करणारे लेखही लिहिले गेले. १४ ऑक्टोबर १९५३ रोजी त्यांचे निधन झाले. धोंडो केशव कर्वे आणि रघुनाथ हे पितापुत्र, आपापल्या कार्याशी आयुष्यभर एकनिष्ठ राहिले. परस्परांचे महत्त्व ते जाणून होते. म्हणूनच अण्णांनी रघुनाथ यांना वेळोवेळी आर्थिक मदत केल्याचे, उल्लेख आहेत.

समाजहिताची जाण असणाऱ्या, दूरदृष्टीच्या, भारतातील एका महान समाजसुधारकाचा डॉ.अनंत देशमुख यांनी उत्तम प्रकारे, समग्र परिचय करून दिला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात, भारत सरकारने, शासकीय पातळीवर जगभरात सर्वप्रथम, कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम स्वीकारला. यातूनच रघुनाथ कर्वे यांच्या महान कार्याचे महत्त्व स्पष्ट होते. या पुस्तकात राहून गेलेले, लहान-मोठे मुद्रणदोष खटकतात, ते टाळले असते तर उत्तम झाले असते. ●●

**पुस्तकाचे नाव : र. धों. कर्वे.**
**लेखक : डॉ.अनंत देशमुख**
**प्रकाशक : संधिकाल प्रकाशन, नवघर, भाईंदर (पू). ९८२०५९५२८२**
**प्रथमावृत्ती : ऑगस्ट, २०२५**
**पृष्ठे :१४३ मूल्य : रु.२५०/- ❋❋**

# काही कायदे बदलण्याची गरज?

अंकुश शिंगाडे

आज काही कायदे असेही आहेत की जे खरंच बदलवावेत असे वाटते. तसं पाहिल्यास बदलत्या परिस्थितीनुसार कायदेबदल व्हावाच, असं अपेक्षित आहे. परंतु, असं असतानाही जेव्हा कायदा हा स्थितप्रज्ञ उभा राहतो, तेव्हा विचार येतो. कारण, त्यातून काही गैरमार्ग पत्करणारी मंडळी ही वाममार्ग पत्करुनही फायद्यात असतात व सामान्य जनता ही मात्र नुकसान सहन करीत असते.

अलीकडील काळात कायद्याला मोठे महत्त्व आलेले आहे व कायदे हे लोकांच्या बोकांडी बसत आहेत. असे दिसत आहे. देशात कायदे भरपूर आहेत व देशात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टींचे कायदे संविधानात नमूद आहे व हे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले आहेत.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहिलं. ते लिहायचा काळ होता सन १९४९. २६ नोव्हेंबर हा संविधान लिहून पूर्ण करण्याचा दिवस. संविधान लिहून पूर्ण करायला दोन वर्ष, अकरा महिने व अठरा दिवस लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान बनवलं. ते ज्यावेळेस बनवलं, त्यावेळेस भविष्याचा वेध, वर्तमानकाळ आणि भूतकाळात घडलेल्या घटना, या सर्व गोष्टींना विचारात घेऊन बनवलं होतं. ज्यातून भविष्यात कोणत्या गोष्टी घडू शकतील व कोणत्या गोष्टीची गरज भासेल? याचाही संविधान लिहितेवेळी विचार केला गेला होता व तशी तरतूद करुन त्या तरतुदी संविधानात नमूद केल्या गेल्या. तसं पाहिल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे काही भविष्यवेत्ते नव्हते की येणारी परिस्थिती तशीच राहणार होती. ज्या आधारावर संविधान बनलं होतं, त्यासाठी त्यांनी संविधानात लवचिकता ठेवली व घटनादुरुस्तीची प्रक्रिया सांगितली. ती प्रक्रिया घटनेच्या कलम ३६८ नुसार राबवली जाते. अन् त्याच प्रक्रियेनुसार आज घटनेत हवे तेव्हा, हवे तेवढे बदल करता येतात. मात्र, ते संसदेच्या अधीन राहून. संसदेत तशा प्रकारचा ठराव हा जनतेने निवडून आणलेल्या प्रतिनिधींसमोर मांडण्यात येतो. त्याच ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहांत चर्चा होते व ठराव संमत झाला की मतदान होऊन तो ठराव राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीसाठी पाठवला जातो. राष्ट्रपती महोदयांची त्यावर स्वाक्षरी झाली की मग त्याचं रुपांतर अध्यादेशात होतं व तो अध्यादेश देशात कायदे रुपानं लागू होतं. एवढी कठीण प्रक्रिया आहे एखादा कायदा बनविताना वा एखाद्या कायद्याला बदलविताना. म्हणूनच सहजासहजी कोणीही देशातील १९४९ ला बनविलेल्या व संविधानात अंतर्भूत असलेल्या कायद्यात बदल करण्याचा विचार करीत नाहीत. कारण, असा बदल करीत असताना जर एखादं विधेयक संसदेच्या एखाद्या सभागृहात पडलं वा अंतिम समयी राष्ट्रपती महोदयांनी स्वाक्षरीच केली नाही तर त्या विधेयकासाठी एवढा केला गेलेला खटापोह वा मेहनत ही वाया जात असते. याचा अर्थ असा नाही की, कायद्यात बदल होऊ नये. कायदे बदलू नयेत.

कायदा काही कोणाच्या आईवडिलांची जहांगीर नाही की तो बदलू शकत नाही. तो बदलू शकतो, जर आवश्यकता असेल तर. बदलत्या परिस्थितीनुसार माणूस बदलला. तो माकडापासून रुपांतरीत होऊन माणूस बनला. सुरुवातीला तो झाडावर राहायचा. त्यानंतर तो जमिनीवर राहायला आला. तो जमिनीवर राहू लागला. त्याचबरोबर त्यानं आपलं हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण कसं करायचं? याबाबत कला हस्तगत केली. तो खाणे, पिणे, घर बांधणे शिकला. एवढंच नाही तर, आपल्या जीवांच्या संरक्षणासोबत आपल्या शरीराचं संरक्षणही शिकला. एकंदरीत, सांगायचं झाल्यास बदलत्या हवामानानुसार तो आपले रहनसहन बदलवायला शिकला. आज त्याच्या घराचाच विचार केल्यास पूर्वी तो एखाद्या आयत्या बनलेल्या गुहेत राहायचा. आज तो स्वतः सिमेंटनं बांधलेल्या घरात राहतो. म्हणजेच बदलत्या परिस्थितीनुसार त्याच्यात बदल झाला. असे असताना त्याने जे पूर्वी नियम बनवले होते, तेही बदलत गेले. बदलत्या परिस्थितीनुसार त्यानं हवे ते नियमही बनवले नव्हे तर, नियमात बदल केला. असे असताना कालचे सन १९४९ ला बनविलेले काही कायदे बदलण्याची गरज आहे. संविधानातील काही कायदे आज दुरुस्त करण्याची गरज आहे. ज्याचा त्रास नागरीकांना होतोय. जसे. विवाहासंबंधीचे कायदे. नियुक्तीसंबंधीचे कायदे. मजुरीसंबंधीचे कायदे, महसूल कायदे, रहदारीसंबंधीचे कायदे, प्राणीसंरक्षण कायदे. असे बरेच कायदे आहेत की ज्या कायद्यांना आज बदलण्याची गरज आहे.



विवाह कायद्याचा विचार केल्यास सन १९४९ च्या काळातील बऱ्याचशा स्त्रिया या अज्ञानी त्यांना हवा तो आधार नसायचा. त्यातच त्या आपल्या पायावर उभ्या नसायच्या. म्हणूनच विवाहसंबंधीचे कायदे करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या कलम २५ अ नुसार खावटी प्रावधान घटनेत नमूद केलं. अन् ते बरोबरही होतं, त्यावेळची परिस्थिती पाहता. कारण एक पुरुष त्यावेळेस अनेक पत्नी करीत होते, आपल्या अस्तित्वात असलेल्या पत्नीची परवानगी न घेता. त्यातच जोर जबरदस्तीनं दुसरी पत्नी करताच पहिल्या अस्तित्वात असलेल्या पत्नीला सोडून देत होते. त्यावेळेस अशा पतीनं, परित्याग केलेल्या स्रीसमोर भीक मागणे वा आत्महत्या करणे. या दोन पर्यायाशिवाय दुसरा पर्याय नसायचा. आज तसं नाही. आज काळ बदलला आहे व आजची परिस्थिती तशी राहिलेली नाही. आज स्रिया पती अस्तित्वात असताना दुसरा विवाह करतात आणि न्यायालयात आपल्याला पती नाही असं सिद्ध करीत आयुष्यभर घटनेच्या कलम २५ अ अंतर्गत खावटी वसूल करीत असतात. आजच्या स्रिया स्वतः आत्मनिर्भर असूनही आपण आत्मनिर्भर नाही, असा देखावा करतात. आजच्या स्रिया पुरुषांवरच अत्याचार करतात व सांगतात की आपण अतिशय लाचार आहोत. असं करुच शकत नाही. न्यायालय फक्त पुरावे पाहतो. असे पुरावे पुरुषांजवळ नसल्यानं पुरुष वर्ग फसतो. त्यामुळंच याही प्रकारच्या कायद्यात सुधारणा करण्याची गरज आहे. दुसरा कायदा आहे नियुक्तीसंबंधांचा. बाबासाहेबांनी संविधान लिहिलं, त्यावेळेसही खासगी संस्थान होते व खासगी संस्थानात कोणतेच कर्मचारी काम करायला पाहात नसत आणि एखादा कर्मचारी नियुक्त झालाच तर तो काही मालकांना ऐकत नसे.

म्हणूनच नियुक्ती व निलंबनाचे अधिकार घटनेत कलम टाकून बाबासाहेबांनी संस्थाधीशांकडे अबाधित ठेवले. कर्मचारी नियुक्त झाल्यानंतर त्यानं चांगलं वर्तन ठेवावं, हा उद्देश होता. अन् तसे ठेवणे बरोबरच होते. तसं पाहिल्यास त्यावेळचे संस्थाधीश हे अतिशय इमानदार होते. परंतु, जसजसा काळ गेला; तसतसा संस्थाचालकांचा स्वभाव बदलत गेला व संस्थाचालकांनी निलंबन व नियुक्तीतून नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून बराच पैसा कमवला व ते कोट्यधीश बनले. आजही अशा नियुक्त होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना पन्नास लाख रुपये नियुक्तीसाठी द्यावे लागतात. तसंच आज चांगल्या वर्तनाला महत्त्व नाही. महत्त्व आहे, त्याचं संस्थाचालकासोबत पटण्याला. ते तेव्हाच पटतं; जेव्हा एखादा कर्मचारी संस्थाचालकासोबत चापलूस वा गुलाम पद्धतीने वागतो. जो नातेवाईक वा अशा स्वरुपाचा गुलाम असतो. त्यालाच नोकरीमध्ये स्थैर्य मिळते व पदोन्नत्या मिळतात. त्यामुळंच अशाही स्वरुपाचे कायदे बदलण्याची गरज आहे.

महत्त्वाचं सांगायचं झाल्यास असे बरेचसे कायदे आहेत की ज्या कायद्यात काही सूक्ष्म सुक्ष्म गोष्टी आहेत की ज्या गोष्टी आज काळानुसार बदलविण्याची गरज आहे. काहीजण जुन्या कायद्याचा लाभ घेत असून ते त्याच कायद्याचा गैरफायदा घेऊन श्रीमंत बनत आहेत आणि काहीजण खऱ्या स्वरुपाचे वागूनही त्यांना जुन्या कायद्याचा अतिशय त्रास होत आहे. त्यातच काही कायदे धर्माबाबतही सहिष्णुता बाळगणारे नसून, धर्माबाबत भेदभाव करणारे आहेत. असे कायदे हे बदलत्या परिस्थितीनुसार बदलण्याची गरज आहे. जर बदलत्या परिस्थितीनुसार असे कायदे बदलले गेले नाही तर उद्या या कायद्यातून गैरफायदा घेणाऱ्यांची संख्या वाढेल. त्यांचाच बोलबाला होईल. कायद्यावरचा लोकांचा विश्वास उठेल व कायदे कुचकामी व निरुपयोगी ठरतील यात शंका नाही. तेव्हा वेळीच त्यावर सावधान होऊन त्यातील कलमात हवी ती दुरुस्ती करण्याची गरज आहे. ज्यातून सर्वसामान्य जनता सुखी होऊ शकेल. यात दुमत नाही. ●●

# सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका

श्याम ठाणेदार

एकदा वापरून फेकून देण्याजोग्या (सिंगल यूज) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल यूज प्लास्टिकमध्ये प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, पाण्याची बाटली, प्लेट, अन्नपदार्थ ठेवण्यासाठी झाकण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग कागद, प्लास्टिकचे ग्लास, पत्रावळ्या यांचा समावेश होतो. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल यूज प्लास्टिकचा वापर करतो. सहज आणि कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल यूज प्लास्टिकचा वापर वाढला आहे. आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल यूज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

सिंगल यूज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडिबल म्हणजे कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल यूज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून आस्तित्वात राहतो. सिंगल यूज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायू प्रदूषण होते. हा कचरा जमिनीखाली दबला तर पाण्याच्या स्त्रोतांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल यूज पलिस्टक नदी, विहीर, तलावात टाकले तर जलस्त्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल यूज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल यूज प्लास्टिकमुळे जलचारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल यूज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. सिंगल यूज प्लास्टिक नष्ट होत नाही. पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्षे राहतात. सिंगल यूज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल यूज प्लास्टिक कचराकुंडीत टाकला जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच, सिंगल यूज प्लास्टिकमुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल यूज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल यूज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल यूज प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याच्या वापरावर सरकारकडून टप्प्या-टप्प्याने निर्बंध लादले जात आहेत.

निर्बंधासोबतच सिंगल यूज प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचिण्यासाठी सरकारने जनजागृती करायला हवी. सरकारने सिंगल यूज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवेत. शाळा-कॉलेजमधूनदेखील याबाबत प्रबोधन करायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन कारणे आणि सिंगल यूज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे, या दोन्हीविषयी जाणीव जागृती होणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सिंगल यूज प्लास्टिकमुळे संपूर्ण सजीवसृष्टीलाच धोका निर्माण झाल्याने नागरिकांनीच सिंगल यूज प्लास्टिकपासून दूर राहायला हवे. सरकारने सिंगल यूज प्लास्टिकवर निर्बंध लादले जात असेल तरी त्याचा वापर कमी होताना दिसत नाही. त्यामुळे या प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनी सिंगल यूज प्लास्टिकचा वापर बंद करणे, हाच भविष्यात मानवजीवन व जैवविविधता राखण्याचा मार्ग आहे. ●●

## निवडक



### घनश्याम मशिलकरला सुवर्णपदक

**रसायनी :** संयुक्त भारत खेल फाऊंडेशनची बारावी आंतरराष्ट्रीय अँथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ ची स्पर्धा नोव्हेंबर २०२५ रोजी भूतान थिंपू येथे चार दिवस आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत भारत, भूतान, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार बांगलादेश, मलेशिया, सिंगापूर, इंडोनेशीया, फिलीपाईन्यू या देशातीन सुमारे ८०० खेळाडूचा सहभाग होता.यात रसायनी येथील रायगड जिल्ह्यातील घनःस्याम मशीलकर यांनी रिलायन्स इंडस्ट्रीज पाताळगंगा याचे कडून ५५ वर्षा वरील गटात भारतीय संघामध्ये सहभाग घेवून तीन सूवर्ण पदकांचा मान मिळवला.यात शंभर मीटर धावणे प्रथम क्रमांक,लांब उडी प्रथम क्रमांक, तीहेरी उडी प्रथम क्रमांक या तिन्ही खेळात त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करुन सुयश संपादन केले. त्याबद्दल भूतान येथे तीन सुवर्णपदक मान्यवरांच्या उपस्थितीत देऊन त्यांचा सन्मान करण्यात आलात्यांच्या या सुवर्णमय कामगीरी बद्दल त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### किकबॉक्सिंग समीक्षाला सुवर्णपदक




**पनवेल :** अस्मिता खेलो इंडिया वुमन्स लीग किकबॉक्सिंग स्पर्धेत डीएवी न्यू पनवेल शाळेच्या क्रीडा शिक्षिका समिक्षा दीपक कायंदेकर हिने शानदार कामगिरी करत सुवर्ण पदकाची कमाई केली. १९ वर्षांवरील ५० किलो वजनी गटातील पॉइंट प्रकारात तिने सर्व प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत अव्वल क्रमांक पटकावला. पनवेल शहर किकबॉक्सिंग संघटनेच्या वतीने कार्याध्यक्ष निलेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. पनवेल, रायगड, नवी मुंबई, ठाणे, वसई-विरार, पालघर, पिंपरी चिंचवड आणि पुणे या जिल्ह्यांतून तब्बल ३४२ खेळाडूंनी सहभाग घेतल्याने स्पर्धा अत्यंत रंगतदार झाली. स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई करणाऱ्या समिक्षाचा विशेष सत्कार डॉ. मंदार पनवेलकर, स्मिता पनवेलकर, कार्याध्यक्ष निलेश भोसले, पियुष सदावर्ते आणि प्रतीक कारंडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी समीर ठाकूर, अॅड. मनोज भुजबळ, दिलीप पाटील, संदीप पाटील, मयुरेश नेटकर आणि दशरथ म्हात्रे उपस्थित होते.

### ५२ वी कुमार/कुमारी गट राज्य अजिंक्यपद कबड्डी चाचणी आयोजन

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने, पुणे जिल्हा कबड्डी असो. च्या यजमान पदाखाली पिंपरी चिंचवडच्या बोपखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान तसेच महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. २५ ते २९ नोव्हेंबर २५ या कालावधीत रंगणाऱ्या या स्पर्धेत २५ संलग्न जिल्ह्याचे ३१ कुमार व ३१ कुमारी गटाचे संघ सहभागी होणार आहेत. यास्पर्धेतून महाराष्ट्राचे दोन्ही गटाचे संघ निवडण्यात येतील. डिसेंबर २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात पश्चिम बंगाल राज्यात होणाऱ्या राष्ट्रीय कुमारी गट स्पर्धेत महाराष्ट्राचा प्रतिनिधीत्व करेल. तर आंध्र प्रदेश येथे जानेवारी २०२६ च्या मध्यावर होणाऱ्या राष्ट्रीय कुमार गट स्पर्धेत महाराष्ट्राचा हा संघ प्रतिनिधित्व करेल. गतवर्षी सांगली येथे झालेल्या या स्पर्धेतील कुमार गटात ठाणे शहर संघ विजेता,तर पुणे ग्रामीण संघ उपविजेता ठरला होता. कुमारी गटात मात्र पुणे ग्रामीणने जेतेपद पटकाविले होते. तर पिंपरी चिंचवड संघ उपविजेता ठरला होता. आता तर पुण्यातच स्पर्धा होत आहे. त्याचा फायदा पुण्याच्या तीन संघाला पैकी कोण उठवतो हे पहाणे औत्सुक्याचे ठरेल. स्पर्धेकरिता मॅटची ६ क्रीडांगणे तयार करण्यात येणार आहेत. सामने शक्यतो सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळविण्यात येतील. पण हिवाळा असल्याने दव पडण्याची शक्यता लक्षात घेऊन सामने सकाळच्या सत्रात देखील खेळविले जातील. स्पर्धेची तयारी उत्साही वातावरणात सुरू आहे. लवकरच स्पर्धेची गटवारी जाहीर करण्यात येईल. अशी माहिती राज्य संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी सर्व प्रसार माध्यमांना दिली.

# दक्षिण आफ्रिकेचा अर्धा संघ तंबूत

## ॥ ६ गडी गमावून केल्या २४७ धावा ॥ पहिल्या सत्रात गडी झटपट बाद करण्याचे आव्हान

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

**गुवाहाटीतील बसरापारा क्रिकेट स्टेडियमवर भारत-दक्षिण आफ्रिका कसोटी सामन्याला शनिवारी सुरुवात झाली. पहिल्या दिवशी भारतीय गोलंदाजांनी दक्षिण आफ्रिकेचा अर्धा संघ बाद केला. कुलदीप यादवने ३ विकेट्स घेतल्या आहेत. गुवाहाटीमधील बसरापारा क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका संघात कसोटी मालिकेतील दुसरा सामना शनिवारी २२ नोव्हेंबर सुरू झाला आहे. गुवाहाटीत खेळवला जाणारा हा पहिलाच सामना असून पहिल्या दिवशी दक्षिण आफ्रिकेचा अर्धा संघ बाद करण्यात भारतीय गोलंदाजांनी यश मिळवले आहे.**



भारतासाठी फिरकीपटू कुलदीप यादव पहिल्या दिवशी चमकला..या सामन्यात दुखापतग्रस्त शुभमन गिलच्या जागेवर रिषभ पंत भारतचा कर्णधार म्हणून मैदानात उतरला. तो भारताचा ३८ वा कसोटी कर्णधार ठरला. पण नाणेफेकीत मात्र भारताचे नशीब पालटले नाही. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेकडून एडेन मार्करम आणि रायन रिकल्टन सलामीला फलंदाजीला उतरले. त्या दोघांनीही चांगली सुरुवात दक्षिण आफ्रिकेला करून दिली. दोघांनी सुरुवातीपासून संयमी खेळ करताना ८२ धावांची भागीदारी केली.

अफ्रिकेने दुसऱ्या कसोटी पहिल्या दिवशी तशीच रणनिती आखली होती. फलंदाजांनी अमलबजावणी केली. दक्षिण अफ्रिकेने पहिल्या डावात ८१.५ षटकांचा सामना करत ६ गडी गमवून २४७ धावा केल्या. अजूनही दक्षिण अफ्रिकेच्या हाती ४ विकेट आहेत. त्यामुळे दुसऱ्या दिवशी ३०० पार धावा होतील असा क्रीडाप्रेमींचा अंदाज आहे. जर तसे झाले तर भारताला मालिका जिंकणं कठीण जाईल. भारताला पहिल्या डावात ६०० धावा करण्याची गरज भासेल. तरच सामन्यावर पकड निर्माण होईल.

भारताकडून कुलदीप यादवची फिरकी प्रभावी ठरली. त्याने तीन जणांना तंबूचा रस्ता दाखवला. त्याने १७ षटकात ४८ धावा देत ३ गडी तंबूत पाठवले. यात रियान रिकलटन, ट्रिस्टन स्टब्स आणि वियान मुल्डरला बाद केलं. तर जसप्रीत बुमराह, रवींद्र जडेजा आणि मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. दक्षिण अफ्रिकेकडून मोठी खेळी तर कोणी केली नाही. पण आश्वासक सुरुवात आणि दुहेरी आकडे गाठले आहेत. त्यामुळे दक्षिण अफ्रिकेला २४७ धावांपर्यंत मजल मारता आली.

दक्षिण अफ्रिकेने पहिल्या विकेटसाठी ८२ धावांची भागीदारी केली. २७ षटकापर्यंत पहिल्या विकेटसाठी भारतीय गोलंदाजांना झुंज द्यावी लागली. जसप्रीत बुमराहने एडन मार्करमला बाद केलं. त्याने ८१ चेंडूत ५ चौकारांच्या मदतीने ३८ धावा केल्या. त्यानंतर यादवने दुसरा झटका दिला आणि भारतीय संघाला ट्रॅकवर आणलं. पुन्हा तिसऱ्या विकेटसाठी स्टब्स आणि टेम्बा बावुमा यांच्या ८४ धावांची भागीदारी झाली.

जडेजाने बावुमाला मैदानात पाठवले आणि भारतीय संघाच्या जीवात जीव आला. बावुमा ९२ चेंडूत ४१ धावा करून बाद झाला. पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा सेनुरन मुथुसामी नाबाद २५, तर कायल व्हेरेन नाबाद १ धावांवर खेळत आहे. आता उर्वरित ४ गडी पहिल्या सत्रात झटपट बाद करण्याचे आव्हान भारतीय संघासमोर आहे.

### नवीन परंपरा सुरु

**गुवाहाटी स्टेडियमवर हा पहिला कसोटी सामना आहे. यात टॉस सकाळी ८:३० वाजता झाला आणि सामना सकाळी ९ वाजता सुरु झाला. पाचही दिवसांचे पहिले सत्र सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत असेल. यानंतर २० मिनिटांचा चहापानाचा ब्रेक. दुसरं सत्र सकाळी ११:२० ते दुपारी १:२० पर्यंत . दुसऱ्या सत्राच्या समाप्तीनंतर ४० मिनिटांचा जेवणाचा ब्रेक. त्यानंतर शेवटचं सत्र दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत. जर दिलेल्या वेळेत पूर्ण षटकं पूर्ण झाली नाहीत तर खेळ अर्धा तास वाढवला जाईल, म्हणजेच सामना दुपारी ४:३० पर्यंत चालू शकतो.**

# लक्ष्य,आयुष उपांत्यपूर्व फेरीत

**| सिडनी | वृत्तसंस्था |**

भारतीय बॅडमिंटनपटूंना गुरुवारी ऑस्ट्रेलियन ओपन या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये संमिश्र यशाचा सामना करावा लागला. एकीकडे लक्ष्य सेन, आयुष शेट्टी यांनी पुरुषांच्या एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, तर दुसरीकडे एच. एस. प्रणोय, किदांबी श्रीकांत, तरुण मानेपल्ली यांचे आव्हान पराभवामुळे संपुष्टात आले. दुहेरीत सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीनेही पुढे पाऊल टाकले. भारताच्या आयुष शेट्टी याच्यासमोर कोडाय नाराओका या चौथ्या मानांकित खेळाडूचे आव्हान होते.



आयुष शेट्टी व कोडाय नाराओका यांच्यामध्ये पहिल्या गेममध्ये कमालीची झुंज दिसून आली. भारतीय खेळाडूकडे १८-१७ अशी एका गुणाची आघाडी होती.

त्यानंतर पुढील तीन गुण कमवत आयुषने पहिला गेम २१-१७ असा आपल्या नावावर केला. पुढील गेममध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये १४-१४ अशी बरोबरी झाली. या गेममध्येही चुरस होईल, असे वाटत असतानाच आयुषने सलग पाच गुण कमवत आघाडी मिळवली आणि दुसरा गेम २१-१६ असा जिंकत सामन्यावरही नाव कोरले.

लक्ष्य सेन-ची युन जेन यांच्यामध्ये लढत रंगली. लक्ष्य सेन याने पहिल्या गेममध्ये १४-४ अशी आघाडी मिळवली. त्यानंतर चीन युन जेन याने झोकात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. त्याने १७-२० अशी आघाडी कमी करण्याचा प्रयत्न केला. लक्ष्य सेन याने पहिला गेम २१-१७ असा जिंकत १-० आघाडी घेतली. चीन युन जेन याने दुसऱ्या गेममध्ये २१-१३ असे यश मिळवताना १-१ अशी बरोबरी साधली.

लक्ष्य सेन याने अखेरच्या गेममध्ये वर्चस्व प्रस्थापित केले. त्याने २१-१३ असा हा गेम पटकावला. सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या भारताच्या अनुभवी व या स्पर्धेतील पहिल्या क्रमांकाच्या जोडीने सू चिंग हेंग-वु गुन शून या चीन तैपईच्या जोडीवर सरळ दोन गेममध्ये मात करीत आगेकूच केली. भारतीय जोडीने २१-१८, २१-११ असा अवघ्या ३७ मिनिटांमध्ये विजय संपादन केला.

### युवा कॅरमपटूंना सावंतवाडीत प्रशिक्षण

**| सावंतवाडी | प्रतिनिधी |**

सिंधुदुर्ग कॅरम असोसिएशनतर्फे येथील भरत कॅरम अॅकॅडमी येथे ज्युनिअर (युवा) खेळाडूंसाठी कॅरम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी हे विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.प्रशिक्षक योगेश फणसळकर हे या शिबिरात खेळाडूंना मार्गदर्शन करतील. प्रशिक्षण वर्ग दर शनिवारी आणि रविवारी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत होणार आहेत.जर इच्छुक खेळाडूंची संख्या वाढली तर रविवारी प्रशिक्षणासाठी जादा वेळ दिला जाईल. त्यामुळे अधिकाधिक ज्युनिअर खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. इच्छुक कॅरम खेळाडूंनी अधिक माहितीसाठी आणि नावनोंदणीसाठी भरत कॅरम अॅकडमीशी संपर्क साधावा, असे आवाहन फणसळकर यांनी केले आहे. या उपक्रमामुळे सावंतवाडीतील कॅरम खेळाडूंना त्यांच्या क्रीडा प्रवासात नक्कीच मोठा फायदा होईल, असे भरत सावंत यांनी सांगितले आहे.

### तायक्कांदो स्पर्धेत शुभ्राला रौप्यपदक

**राजापूर :** तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या मान्यतेने आणि अहिल्यानगर तायक्कांदो असोसिएशनच्या सहकार्याने ८ व्या क्युरोगी व ५ व्या पुमसे राज्यस्तरीय कॅडेट तायक्कांदो स्पर्धा नुकतीच झाली. यास्पर्धेमध्ये राजापूरची शुभ्रा गुरव हिने रौप्यपदक पटकावले.शिर्डी अहिल्यानगर या स्पर्धेमध्ये तालुक्यातील तायक्कांदो अॅकॅडमी राजापूर व नॅशनल इंग्लिश स्कूल व ए. इ. काळसेकर कॉलेज रानतळे या प्रशालेतील खेळाडू शुभ्रा सहभागी झाली होती. २९ किलोखालील वजनीगटांमध्ये तिने रत्नागिरी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना उत्कृष्ट खेळाच्या जोरावर रौप्यपदकाची कमाई केली. राजापूर प्रशा-लेचा खेळाडू आयुष बावकरने ६१ किलोखालील वजनीगटात जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता.

# अजय दडसचे आयर्नमॅन स्पर्धेत यश

**| बिजवडी | वृत्तसंस्था |**

गोवा येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय आयर्नमॅन या स्पर्धेत पांगरी ता. माण येथील अजय दडस यांनी यश संपादन केले आहे. शारीरिक क्षमतेची आणि मानसिक संयमाची परीक्षा घेणाऱ्या आयर्नमॅन या स्पर्धेत ३३ देशांतील सुमारे १३०० खेळाडू सहभागी झाले होते. दडस हे सध्या वडोदरा गुजरात विमानतळ येथे असिस्टंट या पदावर कार्यरत आहेत. ही नोकरी सांभाळत त्यांनी फिटनेससाठी वेळ काढत स्पर्धा पूर्ण केली. गोवा येथे पार पडलेल्या या स्पर्धेत १.९ किमी समुद्रात पोहणे, ९० किमी सायकलिंग आणि २१.१ किमी धावणे या तिहेरी आव्हानात्मक टप्प्यात त्यांनी आपली क्षमता आणि दृढनिश्चय सिद्ध केला. ही स्पर्धा ७.४८ मिनिटांमध्ये पूर्ण करत आपल्या पहिल्याच प्रयत्नात आयर्नमॅन हा किताब पटकावला. भारतीय विमानपतन प्राधिकरणमधील देशातील पहिलाच खेळाडू होण्याचा बहुमान देखील त्यांनी प्राप्त केला.



# भारताची वर्ल्ड बॉक्सिंगमध्ये विक्रमी कामगिरी

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

वर्ल्ड बॉक्सिंग कप फायनलच्या शेवटच्या दिवशी भारताने नऊ सुवर्णपदके जिंकून इतिहास रचला. भारताने एकूण नऊ सुवर्ण, सहा रौप्य आणि पाच कांस्यपदके जिंकली.

भारतीय महिलांनी शेवटच्या दिवशी वर्चस्व गाजवले, नऊपैकी सात सुवर्णपदके जिंकली.

मीनाक्षी (४८ किलो), प्रीती (५४ किलो), अरुंधती चौधरी (७० किलो) आणि नुपूर (८०+ किलो) यांनी प्रभावी कामगिरी करत सुवर्णपदके जिंकली. महत्त्वाचे म्हणजे, हे सर्व वजन गट २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिंपिकसाठी पात्र आहेत.



पुरुष गटात सचिन (६० किलो) आणि हितेश (७० किलो) यांनी भारतासाठी दोन सुवर्णपदके मिळवली आहेत.

सचिनने किर्गिस्तानच्या सेयितबेकचा ५-० असा पराभव केला, तर हितेशने कझाकस्तानच्या मुरसलचा ३-२ असा पराभव केला. दरम्यान, जादुमणी सिंग, पवन बर्टवाल, अभिनाश जामवाल आणि अंकुश यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश केला पण सुवर्णपदकापासून वंचित राहिले. या स्पर्धेत १८ देशांतील १३० खेळाडूंनी भाग घेतला होता.




**महिलांत पश्चिम विभाग स्वराज्य स्पोर्टस् अजिंक्य. पुरुषांत जॉली स्पोर्टस्, पार्ले महोत्सव स्पोर्टस् अंतिम विजेते**

# मुंबई उपनगर कबड्डी असो. कबड्डी स्पर्धा २०२५

**| मुंबई | प्रतिनिधी |**

जॉली स्पोर्टस्, पार्ले महोत्सव स्पोर्टस् अकॅडमी यांनी ४३ व्या मुंबई उपनगर कबड्डी असो. ने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पश्चिम विभागात अनुक्रमे प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी पुरुषांत अंतिम विजेते ठरले. गजानन मंडळ व पार्ले महोत्सव स्पोर्टस् अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आ. पराग आळ-वणी, आयोजक मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार्ले येथील प्ले-ग्राउंडवर हे सामने सुरु आहेत. पश्चिम विभाग प्रथम श्रेणी पुरुषांच्या अंतिम फेरीत जोगेश्वरीच्या जॉली स्पोर्टस्ने गोरेगावच्या स्पर्श फाऊंडेशनला ३४-१८ असे नमवीत विजेत्यापदाची किमया साधली. पहिल्या डावात चुरशीने खेळलेल्या या सामन्यात जॉलीने १६-१३ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात जॉलीने खे-ळाची गती वाढवीत जेतेपद-ावर शिकामोर्तब केले. रजत सिंग, दिनेश यादव यांच्या चढाई पकडीच्या झंझावाती खे-ळाला या विजयाचे श्रेय जाते. पूर्व विभाग महिलांच्या अंतिम सामन्यात कांजूरच्या स्वराज्य स्पोर्टस्ने कुर्ल्याच्या स्वस्तिक मंडळावर ३७-१३ अशी सहज मात करीत विजयाचा चषक उंचाविला. आक्रमक सुरुवात करीत स्वराज्यने विश्रांतीला २२-११अशी आघाडी घेतली. विश्रांतीनंतर खेळाची गती कायम राखत आपला विजय सोपा केला. याशिका पुजारी, राधिका सिंग यांच्या सर्वांगसुंदर खेळाला या मोठ्या विजयाचे श्रेय जाते. स्वस्तिकच्या दिक्षा तिरवडकर, कोमल मानवे यांचा या सामन्यात म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. पश्चिम विभाग द्वितीय श्रेणी पुरुषांत यजमान पार्ले महोत्सव स्पोर्टस् अकॅडमीने बांद्राच्या शिवनेरी मंडळाचा प्रतिकार ३४-२२ असा मोडून काढत या गटाचे विजेतेपद आपल्या नावे केले. विश्रांतीपर्यंत अत्यंत चुरशीने खेळल्या गेलेल्या या सामन्यात १८-१६ अशी आघाडी यजमान संघाकडे होती. नंतर मात्र घरच्या मैदानांवर खेळणाऱ्या पार्लेकरानी टॉप गिअर टाकत सामना १२ गुणांच्या फरकाने आपल्या बाजूने झुकवीला. या स्पर्धेचे बक्षीस वितरण आ.पराग आळवणी, मिलिंद शिंदे, सुधाकर घाग, सचिव राजेश पडेलकर, मिनानाथ धानजी, रविंद्र करमरकर यांच्या उपस्थितीत पार पडला.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)